जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१ । अंक : १९५। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

**ऑनलाईन पुरवठा करणाऱ्या डिलिव्हरी बॉयचा जीव धोक्यात**

वाचा पान ३ वर

# ‘काँग्रेसी बुद्धिमत्ते’चे प्रदर्शन

## • एआय परिषदेत काँग्रेसचा गोंधळ • देशाची प्रतिमा मलिन केल्याचा भाजपाचा आरोप

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारत मंडपम् येथे झालेल्या जागतिक एआय परिषदेच्या व्यासपीठावर युवा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात निदर्शने करीत गोंधळ घातला. या घटनेवर भारतीय जनता पक्षाने जोरदार टीका केली असून देशाला बदनाम करण्याचा हा प्रकार राहुल गांधी यांच्या इशाऱ्यावरून झाल्याचे म्हटले आहे.

१६ फेब्रुवारीला एआय जागतिक परिषदेला सुरूवात झाली. शुक्रवारी परिषदेचा शेवटचा दिवस होता पण गर्दी आणि कार्यक्रमांमुळे उद्या, शनिवारी समारोप होणार आहे. दरम्यान, शुक्रवारी युवा काँग्रेसच्या १० ते १५ कार्यकर्त्यांनी परिषदेच्या व्यासपीठावर जात शर्ट काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. या टी शर्टवर पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे फोटो आहेत. याप्रकरणी आतापर्यंत चार ते पाच जणांना ताब्यात घेतले आहे. एवढी सुरक्षा व्यवस्था असताना हे कार्यकर्ते मंडपम्मध्ये घुसलेच कसे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रवेशासाठी पास किंवा कोड अनिवार्य असतानाही काँग्रेस कार्यकर्ते आतमध्ये घुसल्याने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. या कार्यकर्त्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे दिल्ली पोलिसांनी म्हटले आहे.



भारत मंडपम्मध्ये निदर्शने करताना युवक काँग्रेसचे कार्यकर्ते

दिल्लीचे अतिरिक्त आयुक्त देवेश कुमार महाला यांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना शुक्रवारी साडेबाराच्या सुमारास घडली. युवकांनी स्वेटर आणि जॅकेटच्या टी शर्ट घातले होते. पाच क्रमांकाच्या सभागृहाजवळ येताच युवकांनी टी शर्ट बाहेर काढून घोषणाबाजीला सुरूवात केली. याप्रकरणी कृष्णा हरी, कुंदन यादव, अजय कुमार आणि नरसिम्हा यादव या चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. हरी हा काँग्रेसचा राष्ट्रीय सचिव तर नरसिम्हा पक्षाचा राष्ट्रीय संयोजक आहे. हरी आणि कुंदन हे बिहारचे रहिवासी आहेत. उर्वरित कार्यकर्त्यांची शोध सुरू आहे. या सर्वांविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्यात येईल, असे महाला यांनी सांगितले.

### कार्यकर्ते राहुल गांधींचे सैनिक

आंदोलन करणारे कार्यकर्ते हे राहुल गांधी यांचे सैनिक आहेत. आमचा भारत-अमेरिका व्यापार कराराला विरोध आहे. जेव्हा राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल झाला नाही तेव्हा कार्यकर्ते तर नुसते आंदोलन करीत होते. देश आणि युवकांसाठी आम्ही आवाज उठवत राहू, अशी प्रतिक्रिया युवक काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब यांनी दिली आहे.

### काँग्रेसचे वागणे देशविरोधी

काँग्रेसचे वागणे देशविरोधी प्रकार असल्याची परखड टीका भारतीय जनता पक्षाने केली आहे. काँग्रेससाठी एआय म्हणजे अॅन्टी इंडिया आहे, अशी टीका भाजपा प्रवक्ते शहजाद पुनावाला यांनी केली आहे. काँग्रेसने केलेला हा निषेध भाजप किंवा पंतप्रधानांच्या विरोधात नव्हे तर देशाच्याविरोधात आहे, असेही पुनावाला म्हणाले.


### विमान अपघाताचा अहवाल सार्वजनिक करणार

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथे झालेल्या विमान अपघाताच्या तपासाला गती आली आहे. लिअरजेट ४५ (व्हीटी एसएसके) विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल ३० दिवसांच्या आत प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती केंद्र सरकारच्या नागरी उड्डान मंत्रालयाने दिली आहे.

तपास तांत्रिक आणि पुराव्यांच्या आधारे केला जात असून, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अहवाल जाहीर केला जाईल. विमानात बसवलेल्या दोन फ्लाईट रेकॉर्डर्सपैकी डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर (डीएफडीआर) मधील माहिती मिळवण्यात यश आले. मात्र कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डरचे (सीव्हीआर) आगीमुळे मोठे नुकसान झाले, त्यामुळे डेटा मिळवण्यासाठी मूळ उत्पादक कंपनी आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. विमानाच्या अवशेषांची प्रयोगशाळेत चाचणी सुरू आहे. व्हीएसआर व्हेंचर्स या ऑपरेटर कंपनीच्या कामकाजाच्या विशेष ऑडिटचे काम अंतिम टप्प्यात आहे. यात सुरक्षितता मानके, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि देखभाल पद्धतींची कसून तपासणी केली जात आहे.

### विचारपुष्प




तपस्वी व्यक्तीच्या स्वभावाचे सर्वांत मोठे आणि दुर्लभ वैशिष्ट्य म्हणजे अहंकाराचा नाश. सामान्य व्यक्ती कार्य केल्यानंतर श्रेय मिळण्याची अपेक्षा करतो, परंतु एक तपस्वी 'नेति-नेति' अर्थात् मी काहीही नाही, सर्व काही तुझे आहे या भावनेने जगतो. त्याला ना सन्मानाचा आनंद होतो ना अपमानाचे दुःख.
**- सोहनसिंग**
पूर्व प्रचारक, उत्तर क्षेत्र

### महत्त्वाचे

#### शेअर बाजार पुन्हा तेजीत; सेन्सेक्स-निफ्टीत उसळी

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी जोरदार तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्स आणि निफ्टी ५० हे दोन्ही निर्देशांक तेजीसह बंद झाले. शेअर बाजारात सुरुवातीच्या



घसरणीनंतर पुन्हा तेजी दिसून आली. अमेरिका- इराण यांच्यातील वाढता तणाव, कच्च्या तेलाच्या दरातील तेजी, आयटी शेअर मधील घसरण, यामुळे सुरुवातीला बाजारावर परिणाम दिसून आला. मात्र, खरेदीदारांनी शेअर खरेदी करण्यास सुरु केल्यामुळे बाजारात तेजी दिसून आली. आज शेअर बंद झाला तेव्हा सेन्सेक्स ३१६.५७ अंकांच्या तेजीसह ८२८१४.७१ वर बंद झाला. त्याचवेळी निफ्टी ५० निर्देशांक ११६.९० अंकांच्या तेजीसह २५५७१.२५ वर बंद झाला. या आठवड्यात सेन्सेक्स आणि निफ्टी ५० मध्ये तेजी दिसून आली.निफ्टी मिडकॅप निर्देशांकात ०.५ टक्क्यांची वाढ दिसून आली.

#### तहसीलदार व्यंकटेश मुंडे एसीबीच्या जाळ्यात

**बीड** : ऐपत प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजारांची लाच मागणारा तहसीलदार एसीबीच्या जाळ्यात अडकला. एसीबीच्या पथकाने बीड जिल्ह्यातील परळीतून चक्क तहसीलदारच अटक केली आहे. परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी तक्रारदारास ऐपत प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाच मागितली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र, तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने रंगेहात पकडण्यासाठी सापळा रचला होता. मात्र, तक्रारदाराच्या हालचालीवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केली. मात्र, एसीबीने आवश्यक ते सर्व पुरावे संकलित करून व्यंकटेश मुंडेंना ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे महसूल प्रशासनात खळबळ उडाली आहे.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९
(जेवण पार्सल उपलब्ध)
शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.
वरण, बट्टी ३० रु.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रु.
पार्सल मिळेल.
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा पुन्हा सुरू

## • बांगलादेश सरकारचा निर्णय • द्विपक्षीय संबंध सुधारण्याचे संकेत

◆ **ढाका, २० फेब्रुवारी**

दोन महिन्यांपासून निलंबित असलेली व्हिसा सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय बांगलादेशचे नवनिर्वाचित पंतप्रधान तारिक रहमान यांनी घेतला. राजधानी दिल्लीतील बांगलादेश उच्चायोगाने भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा सुरू करण्यात येत असल्याचे शुक्रवारी जाहीर केले. हा निर्णय भारत आणि बांगलादेशमधील संबंध सुधारण्याचे संकेत आहे.

भारतविरोधी विद्यार्थी नेता उस्मान हादी यांच्या हत्येनंतर झालेल्या देशव्यापी निदर्शनामुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले आणि यातूनच बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे सल्लागार मोहम्मद युनूस यांनी भारतीय नागरिकांसाठी व्हिसा सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी कोलकात्ता, मुंबईतील व्हिसा प्रदान करणारी कार्यालये बंद करण्याचे निर्देश दिले होते. भारताने देखील ढाका येथील भारतीय व्हिसा अर्ज केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशात तारिक रहमान यांच्या नेतृत्वात नवीन सरकार स्थापन झाल्याच्या चार दिवसांतच भारतीय नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. भारत-बांगलादेश संबंध सुधारण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. बांगलादेश उच्चायुक्तालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारतीय नागरिकांसाठी निलंबित केलेली व्हिसा सेवा पुन्हा सुरू करण्यात येत आहे. द्विपक्षीय संबंध सुधारण्यास सरकारचे प्राधान्य आहे. भारतानेही बांगलादेशी नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा पूर्णपणे पुनर्संचयित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे म्हटले आहे.

### रहमान यांना भारत भेटीचे निमंत्रण



लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वतीने रहमान यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थिती लावली आणि त्यांची भेट घेतली. बिर्ला यांनी मोदींचे पत्र सादर केले आणि रहमान यांना भारत भेटीचे आमंत्रण दिले. तारिक रहमान यांच्या नेतृत्वात दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याच्या दिशेने याकडे पाहिले जात आहे.

# ठाकरेंच्या बंधुप्रेमाचा फुगा फुटणार?

## स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीवरून ठिणगी

**मुंबई, २० फेब्रुवारी**

मुंबई महापालिकेत ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता उलथवून लावत महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले. मुंबई महापालिकेच्या महापौरपदी भजपाच्या रितू तावडे विराजमान झाल्या. त्यानंतर, आता स्वीकृत नगरसेवकपदासांठीही हालचाली सुरू झाल्या आहेत. 'स्वीकृत'वरून





उबाठा आणि मनसे यांच्यात कलगीतुरा रंगला असून ठाकरे बंधूंमध्ये राजकीय वाद पेटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेने मोठे मन करून आमचा एक स्वीकृत नगरसेवक करावा, अशी आग्रही मागणी मनसेने केली होती. दरम्यान, गुरूवारी सायंकाळी ठाकरेंच्या शिवसेनेकडून तीन स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर करण्यात आली. अशातच, मनसे नेते संदीप देशपांडे यांनी 'कोत्या मनाच्या प्रवृत्तीकडून कधीही स्वीकृतीची अपेक्षा बाळगू नये,' असे व्हॉट्सअप स्टेटस ठेवत उद्धव ठाकरेंना टोला लगावला. त्यामुळे स्वीकृत नगरसेवकांवरुन ठाकरे बंधूंमध्ये ठिणगी पडल्याचे बोलले जात आहे.

# भारत-अमेरिका करारावर मार्चमध्ये स्वाक्षरी

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारत-अमेरिका व्यापार करारावर मार्च महिन्यांत स्वाक्षरी होणार आहे, तत्पूर्वी सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाची बैठक होणार असून, त्यावेळी स्वाक्षरीची तारीख निश्चित केली जाईल.

परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो भारत दौऱ्यावर येणार असून त्यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी होईल ,अशी माहिती भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी दिली. प्रस्तावित अंतरिम व्यापार करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर एप्रिलपासून तो लागू होईल. भारत आणि अमेरिका यांच्यात सहकार्याच्या प्रचंड संधी आहेत आणि दोन्ही देश या संधींचा सक्रियपणे लाभ घेण्यास इच्छुक आहेत, असे गोर म्हणाले.

### दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला, शस्त्रसाठा जप्त

**राजौरी** : जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ शोध मोहिमेदरम्यान शुक्रवारी सुरक्षा दलांनी शस्त्राचा मोठा साठा जप्त केला. काश्मिरात हल्ला घडविण्यासाठी दहशतवाद्यांनी शस्त्रांची जमवाजमव केली होती. गोपनीय माहितीच्या आधारे या भागात राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेत हल्ल्याचा कट उधळला.

# २५० अब्ज डॉलर्सची ‘एआय’ क्षेत्रात गुंतवणूक

## • अश्विनी वैष्णव यांची माहिती • ७० हून अधिक देशांची स्वाक्षरी

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

भारत एआय शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाकरिता पायाभूत सुविधा उभारण्यासाठी २५० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे करार झाले. याशिवाय एआयचा सुरक्षित आणि मानवी विकासासाठी वापर करण्याच्या घोषणापत्रावर ७० हून अधिक देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षरी केल्याची माहिती शुक्रवारी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

पत्रपरिषदेत बोलताना वैष्णव म्हणाले, एआय शिखर परिषद भारताच्या तांत्रिक आणि आर्थिक विकासासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. भारताला तंत्रज्ञानाच्या जगात नवी ओळख निर्माण करण्याची संधी या परिषदेमुळे मिळाली. करारासाठी अनेक




कंपन्या आणि देशांसी वाटाघाटी सुरू आहेत. घोषणापत्राची सविस्तर रूपरेषा आणि त्यातील महत्त्वाचे मुद्दे शनिवारी जाहीर केले जातील. भारताच्या वाढत्या तांत्रिक कौशल्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. प्रदर्शनीला आतापर्यंत पाच दशलक्षाहून अधिक नागरिकांनी भेट दिली. एआय पायाभूत सुविधांशी संबंधित २५० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिकचे करार झाले आहे. यात गुगल आणि अल्फाबेट, रिलायंस इंडिया लिमिटेड, अदानी समूह, टाटा समूह, ओपन एआय यांचा समावेश आहे. ही गुंतवणूक भारतीय अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी मोठी संधी आहे. विदेशी आणि देशातील गुंतवणूक देशाच्या तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधांना अभूतपूर्व गती देईल आणि विकासासाठी नवीन मार्ग उघडेल. घोषणापत्रावर झालेल्या स्वाक्षऱ्या आंतरराष्ट्रीय एआय धोरणे आकार देण्यात भारताची प्रमुख राजनैतिक नेता म्हणून भूमिका दर्शवते.

जळगाव जनता सहकारी बँकेचे माजी संचालक
**स्व. पहलाजराय चंदूमल हासवानी**
यांना
**विनम्र श्रद्धांजली**



नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥
केशवस्मृती परिवार
जळगाव जनता सहकारी बँक लि.,जळगाव
(शेड्यूल्ड बँक)
मुख्य कार्यालय : 'सेवा' ११७/११९, नवी पेठ, जळगाव– ४२५००१.
(0257) 2223699 www.jjsbl.bank.in jjsbl_jal@jjsbl.bank.in
सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।

# वसाका कारखान्यासाठी ५३ कोटींचे मुल्यांकन

## जिल्हा बँक संचालक मंडळाच्या सभेत चर्चा ; गटसचिवांसाठी बैठक



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २० फेब्रुवारी**

कासोदा येथील वसंत सहकारी साखर कारखाना विक्रीचा निर्णय जिल्हा बँकेने घेतला असून या कारखान्याच्या विक्रीसाठी ५३ कोटींचे मुल्यांकन प्राप्त झाले आहे. या विषयावर शुक्रवारी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत चर्चा करण्यात आली असून लवकरच त्यावर निर्णय होणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची बैठक चेअरमन संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (२० फेब्रुवारी) पार पडली. या बैठकीला ज्येष्ठ संचालक चिमणराव पाटील, एकनाथराव खडसे, गुलाबराव देवकर, प्रताप हरि पाटील, मेहताबसिंग नाईक, विनोद पाटील, नाना राजमल पाटील, कार्यकारी संचालक जितेंद्र देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर चेअरमन संजय पवार यांनी सांगितले की, वसंत सहकारी साखर कारखाना विक्रीचा निर्णय झाला आहे. त्यासाठी मुल्यांकन मागविण्यात आले होते. जवळपास ५३ कोटी रूपयांचे मुल्यांकन प्राप्त झाले आहे. त्यावर चर्चा होऊन निर्णय घेतला जाणार आहे. तसेच खडका येथील सूतगिरणीचेही मुल्यांकन मागविण्यात आले आहे. जिल्हा बँकेत राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तैलचित्र लावण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच गटसचिवांच्या पगारासंदर्भात येत्या १ मार्च रोजी बैठक बोलाविण्यात आली असल्याचे चेअरमन संजय पवार यांनी सांगितले.

**नोकर भरतीला ब्रेक**

जिल्हा बँकेचे मनुष्यबळ कमी असल्याने बँकेला २२० जागा भरती करण्याची परवानगी मिळाली होती. जिल्हा बँकेने अमरावती येथील महाराष्ट्र हार्डवेअर या एजन्सीला भरतीचे काम दिले होते. त्यानुसार बँकेकडे तब्बल ६९०० अर्ज प्राप्त झाले. मात्र दरम्यानच्या काळात शासनाने सूचविलेल्या एजन्सीमार्फतच भरती करावी असे परिपत्रक काढण्यात आले होते. या परिपत्रकामुळे जिल्हा बँकेच्या नोकर भरतीला ब्रेक लागला आहे.

**८१ हजार सभासदांची माहिती प्राप्त**

राज्य शासनाने कर्जमाफी करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यातील जिल्हा बँकांकडून थकबाकीदार शेतकरी सभासदांची माहिती मागविली आहे. जिल्हा बँकेकडे आत्तापर्यंत ८१९७८ शेतकरी सभासदांची माहिती प्राप्त झाली असून १२१४२ शेतकऱ्यांची माहिती अप्राप्त असल्याचे चेअरमन संजय पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी किंवा त्यांच्या वारसांनी तातडीन ही माहिती बँकेस द्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

# चोरटी वाळुचे डंपरसह चालक ताब्यात म्हसावद वावडदा रस्त्यावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,२० फेब्रुवारी :**

नदीपात्रातून अवैधरित्या उत्खनन करुन तिची चोरटी वाहतूक सुरुच आहे. उत्खनन करुन वाळुची चोरटी वाहतूक डंपरमधुन करत होते. संध्याकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास गस्तीवरील पथक याठिकाणी आले होते. तेव्हा म्हसावदकडून वावडदाकडे जाणाऱ्या रेल्वे उड्डानपुलाजवळून डंपर येताना दिसला. वाहन चालकास थांबवून चौकशी केली असता विना परवाना वाळु वाहतूक करताना मिळुन आला. गौण खनिज तसेच डंपर चालक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र उगले यांनी पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला. याप्रकरणी चालक कृष्णा जगन्नाथ पवार (वय ४३,रा. छत्रपती संभाजीनगर) याच्या विरोधात गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.

दहा हजार रुपये किमतीची पाच ब्रास वाळु, ४० लाखाचे ट्रॉला असलेला विना क्रमांक डंपर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी हवालदार समाधान टहाकळे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान एरंडोल तसेच जळगाव तालुक्यात गिरणा नदीपात्रातून उत्खनन करुन वाळुची रात्री बेरात्री चोरटी वाळू केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. या उपशामुळे शेतशिवारातील विहिरींच्या पाण्याची पातळी खोल जात असुन गावातही पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. बांभोरी, आव्हाणे, निमखेडी, बांभोरी, टाकरखेडा, वैजनाथ, खेडी कढोली या संपूर्ण पट्ट्यात वाळु उपश्याने गिरणानदी पात्राती पुरती वाट लागल्याचे वास्तव क्लेशदायी असल्याचे दिसुन येत आहे.

बांभोरी येथील राष्ट्रीय महामार्गाला लागुन वाळु उपशातून मोठ मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. त्याबरोबरच चोरी छुपे वाळु उचलली जात आहे. याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचा सूर उमटतो आहे. महमार्गाच्या पुलास धोका होणार नाही, याची खबरदारी घेतली जाणे आवश्यक आहे.



# मेथी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

**शिंदखेडा** : शिंदखेडा तालुक्यातील मेथी येथे मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी विश्वनाथ बोरसे, रमाकांत बागले (मा. सरपंच ), गणेश गिरासे लोटन धोबी, धनराज चौधरी रणजीत गिरासे, प्रमोद गिरासे व नागरिकांची उपस्थिती होती.

भगवा चौकात शिवाजी महाराजांच्या फलकाचे नूतनीकरण करण्यात आले. सायंकाळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले याप्रसंगी हेमंत गोसावी , शामराव माळी, गवा माळी, आनंदगिर गोसावी, महेश माळी, गोपाल गोसावी ( जिल्हा मजूर फेडरेशन संचालक), गोलू माळी, संदीप माळी, भास्कर माळी, धनराज गोसावी, किशोर माळी, जगदीश गोसावी, नरेंद्र माळी, चेतन माळी, महिला वर्गाची ही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मेथी येथील प्रवेशद्वारावर असलेल्या शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भटेसिंग गिरासे दीपक गोसावी, राजेंद्र गिरासे, गुलाबराव पाटील, भैय्या पाटील सुरेश पाटील, गणेश गिरासे उत्तम नेरकर, बन्सीलाल सोनवणे, सतीश आगळे, गणेश आगळे, निंबा पाटील, ललित पाटील, दादू पाटील, विजय कोळी समाधान कोळी, संदीप पाटील, दिलीप पाटील, प्रेम सिंग गिरासे, मालती ताई पाटील, वैशाली पाटील, सविता पाटील, सरला पाटील रत्ना पाटील, नर्मदा माळी, मंदा कोळी, सुनिता कोळी कविता कोळी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# भुसावळ - दादर दरम्यान गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ

**भुसावळ** : भुसावळ आणि दादर पश्चिम रेल्वेमार्ग दरम्यान चालविण्यात येत असलेल्या दोन विशेष गाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०४९/०९०५० दादर - भुसावळ (त्रि-साप्ताहिक) व्हाया नंदुरबार विशेष गाडी क्रमांक ०९०४९ दादर भुसावळ विशेष सेवा दिनांक २७ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९०५० भुसावळ दादर विशेष सेवा दिनांक २७ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे., गाडी क्रमांक ०९०५१/०९०५२ दादर भुसावळ (त्रि-साप्ताहिक) विशेष गाडी क्रमांक ०९०५१ दादर भुसावळ विशेष सेवा दिनांक २८ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०९०५२ भुसावळ दादर विशेष सेवा दिनांक २८ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. वरील विशेष गाड्यांच्या वेळापत्रकात, थांब्यांमध्ये व रचनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रवाशांनी या विशेष गाडी सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०९०५० व ०९०५२ साठीचे आरक्षण दिनांक २०.०२.२०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर ,प्रवासी तिकिट आरक्षणासाठी ॲप देखील डाउनलोड करू शकतात.

# सोयगाव तालुक्यात कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या घरातच घेतला गळफास: जरंडीतील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव,२० फेब्रुवारी**



तालुक्यातील जरंडी येथील आर्थिक विवंचनेत असलेल्या अल्पभूधारक कर्जबाजारी शेतकऱ्याने राहत्या घरातच गळफास घेत जीवन संपविल्याची खळबळ जनक घटना गुरुवारी (१९) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास घडली गळफास घेतलेल्या शेतकऱ्याने खासगी सावकाराच्या फोन वरील छळ करण्याचे वर्णन चक्क चिठ्ठीत कथित केले आहे.पोलीसांनी ती चिठ्ठी हस्तगत केली

दत्तात्रय रघुनाथ मुठ्ठे(वय.६१) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. मुठ्ठे यांच्याकडे शिवारात दोन एकर शेती आहे. शेतीच्या मशागत आणि पेरणीसाठी त्यांनी बँका आणि खासगी सावकारी कर्ज रक्कम असे एकूण पाच लाख रु कर्ज होते. परंतु खासगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम फेडण्यासाठी त्यांना वारंवार फोनवर त्रास देण्यात येत होता.त्यामुळे वैतागून गेलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांने गळफास घेतला आहे. घरातील पत्राच्या शेडमध्ये गळफास घेतला दरम्यान घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला. मृताच्या खिशात सापडलेली चिठ्ठी व मोबाईल पोलीसांनी जप्त केला. सोयगाव ग्रामीण रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन डॉ.शैलेश खंदारे यांनी केले. सायंकाळी पाच वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, एक मुलगी सुना,नातवंडे असा परिवार आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल, उपनिरीक्षक गजानन आरेकर, नारायण जिरी, अजय कोळी, सादीक तडवी, गजानन दांडगे, संजय सिंगल आदी करत आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे....

### एमपीएससी परीक्षेत विद्यानंद देठे यांचे यश



**जामनेर** : तालुक्यातील निमखेडी पिंप्री येथील रहिवासी विद्यानंद रामलाल देठे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागात उपअभियंता (श्रेणी- १) पदी निवड झाली आहे. राज्यातून द्वितीय क्रमांक संपादन केला आहे. तो निवृत्त सैनिक रामलाल कडू देठे यांचा चिरंजीव आहे. याच कुटुंबातील त्यांचे चुलत बंधू व न्यू इंग्लिश स्कूल फत्तेपूरचे माजी विद्यार्थी सागर देठे यांचीही दोन वर्षांपूर्वी भारतीय लोकसेवा आयोगामार्फत जिल्हाधिकारीपदी निवड झाली होती. निमखेडीसारख्या छोट्या गावातून एकाच कुटुंबातील दोघांनी भारतीय व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यानंद रामलाल देठे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### भाजपाचे स्व. वसंतराव भागवत यांची आज जयंती



**जळगाव** : भाजपातर्फे 'वसंतराव भागवत' यांची जयंती शनिवारी २१ स. १० वा. जुने भाजपा कार्यालय वसंत स्मृती कार्यालय, बळीराम पेठ होणार आहे. भारतीय जनसंघ व भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक उभारणीत मोलाचे योगदान असलेले वसंत भागवत यांची जयंती 'कार्यकर्ता दिवस' म्हणून भाजपा कडून साजरा करण्यात येतो. याच निमित्ताने यांची जयंती साजरी करण्यात येणार. भारतीय जनता पार्टी जळगाव महानगर यांच्या वतीने 'स्व. वसंतराव भागवत' यांच्या प्रतिमेचे माल्यार्पण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे व भाजपा जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दिपक सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी जिल्हा महानगरचे प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, मोर्चा, आघाडी, प्रकोष्ठ पदाधिकारी, नगरसेवक, मंडल अध्यक्ष व पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख तसेच सर्व कार्यकर्त्यांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### चाळीसगावात वकीलावर प्राणघातक हल्ला

**चाळीसगाव** : शहरातील न्यायालय परिसरात एका वकीलावर प्राणघातक हल्ला झाल्याने न्यायाच्या दालनातच हा प्रकार घडल्याने गुन्हेगारांना आता पोलिसांची देखील भिती राहिलेली दिसून येत नसल्याचे बोलले जात आहे. शहरातील न्यायालय परिसरात शुक्रवार रोजी दुपारी ३ वाजेच्या सूमारास ॲड समिर शेख हे आपल्या कामकाजानिमित्तं आले असता त्यांच्यावर काही अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला. यावेळी समिर शेख हे बचाव करत असतांना त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर बापजी हॉस्पिटल येथे उपचार सूरू आहे. दरम्यान या घटनेचा चाळीसगाव वकील संघाकडून निषेध व्यक्त केला असून गुन्हेगारांना आता कायदाचा वचक राहिलेला नसल्याचे बोलले जात आहे. यावेळी वकील संघाकडून वकील संरक्षण कायदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.




### योगमाया प्रतिष्ठानतर्फे निबंध स्पर्धा

**मुक्ताईनगर** : येथील योगमाया प्रतिष्ठान वतीने युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांनी केलेला संघर्ष, स्वराज्य निर्मिती, महाराजांचे लोककल्याणकारी नेतृत्व अशा सर्व बाबींचा अभ्यास चिंतन आणि लेखन व्हावे या दृष्टिकोनातून निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. निबंध लेखन स्पर्धा ही मुक्ताईनगर येथील सहा केंद्रांवर घेण्यात आली. प्रत्येक परीक्षा केंद्रावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करीत स्पर्धा घेण्यात आली. यात इयत्ता पाचवी ते आठवी प्रथम गटातून एकूण ३२१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यासाठी शिवराय माझे आवडते राजे, छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण आणि जिजाऊंचे संस्कार, छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले संवर्धन काळाची गरज. इयत्ता नववी ते बारावी - द्वितीय गटातून ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.यात छत्रपती शिवाजी महाराज आणि पर्यावरण, आजच्या काळात शिव विचारांची गरज, भारतीय नौदलाचे जनक : छत्रपती शिवाजी महाराज, वरिष्ठ महाविद्यालय - तृतीय गटातून २९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात स्वराज्य ते सुराज्य : एक प्रवास, शिवराय : एक सर्वसमावेशक लोककल्याणकारी राजा, शिवरायांचे लष्करी व्यवस्थापन आणि गनिमी कावा या विषयांवर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकूण ४०५ विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. स्पर्धा यशस्वीतेसाठी योगमाया प्रतिष्ठानचे अध्यक्ष अश्विन सुरवाडे, संकेत कपले, मयूर पाटील, सनत जैन, प्रवीण राठोड, मनीष महाजन, तेजस सापधरे, वैभव इंगळे, रूपेश कोळी, विश्वजित देशमुख, अनिल गवते आदींनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### पहलाजराय हासवानी



जळगाव : येथील सिंधी कॉलनीतील, अम्मा बिल्डिंग जवळील रहिवासी, पांचाली साडीचे संस्थापक व जळगाव जनता बँकेचे माजी संचालक पहलाजराय चंदूमल हासवानी (वय ८४) यांचे शुक्रवार (दि. २०) रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून शंकर व सुशील हासवानी यांचे ते वडील होत.

# आमदार म्हणून अवमान केल्याप्रकरणी विधानसभेत आवाज उठविणार

## आमदार एकनाथराव खडसे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सावदा, २० फेब्रुवारी**

तासखेडा शिवारात गौण खनिज प्रकरणी दाखल गुन्ह्याबाबत माहिती मागितली असता आमदार असल्यावर देखील त्यांनी योग्य तो सन्मान न देता गुन्ह्या बाबत माहिती देता येणार नाही अजून तपास सुरू आहे असे सांगितले. त्यावर दोन महिने होऊन देखील अद्याप तपास कसा नाही असे विचारले असता त्यांनी माझा अपमान केला. तसेच माझेकडून काही चुकीचे शब्द बोलतांना गेले असले तरी मी त्याच वेळी तेथे माफी मागितली होती. पण एका आमदाराचा अपमान केल्याबद्दल मी विधानसभेत याबाबत प्रश्न मांडणार असल्याचे आमदार एकनाथराव खडसे यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले.



सावदा येथे आ एकनाथराव खडसे यांनी एक पत्रकार परिषद घेत सावदा व परिसरात चालणाऱ्या अवैध धंद्याबाबत नावा सहित माहिती मांडली. सावदा व परिसरात एकूणच बोकाळले अवैध धंद्या बाबत त्यांनी एक जंत्रीच वाचून दखवत त्यात अवैध पत्याचे क्लब चालक, सट्टा चालणारे, तसेच गुटखा विक्रेते आदींच्या यादी वाचून दाखवित कोणाकडून किती रक्कम यापोटी पोलिसांना हप्ता मिळतो हे देखील रकमे सह सांगितले. तसेच सावदा पोलीस स्टेशन मध्ये अनेक गुन्हे दाबले गेले तर काहींची ठिकाणे बदलली गेली. मागील काही महिन्यांपूर्वी सावदा येथील फैजपूर रोडवरील एका पत्याचे क्लबवर मध्यप्रदेश मधील एक गुंड अज्जू डॉन याने जाऊन लूट केली होती. पण ती तेथे न दाखवता घटनेचे ठिकाण तर बदलले पण ही रस्ता लूट दाखविली. तसेच त्या पत्याचे क्लबवरील लाखो रुपये देखील कोठे गेले ? हे समजू शकले नाही असा प्रश्न आ. खडसे यांनी उपस्थित केला. तसेच मागील दोन दिवसांपूर्वी सावदा पोलीस स्टेशनला एका गावातील एक महिला तिच्यावर अत्याचार झाल्याची फिर्याद घेऊन आली पण ती फिर्याद न घेता त्या महिलेस सकाळी ११ पासून सायंकाळी ५ पर्यन्त बसवून ठेवले व तिचा गुन्हा दाखल न करता शेवटी तिला परत पाठविल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. तसेच सावदा पोलीस स्टेशन अंतर्गत सावदा सह चिनावल, सावखेडा, व अन्य गावात देखील अवैध धंदे तसेच अवैध दारू व अन्य धंदे सुरू असून सोबत अवैध गोवंश वाहतूक देखील होत असते याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे आरोप केले, एकूणच त्यांनी सावदा पोलिसांवर व त्यांचे कार्यपद्धतीवर या पत्रकार परिषदेत मोठे प्रश्न ठेवले आहेत.




# पुराण, वेद, उपनिषद माणसाला जीवन जगण्याची कला शिकवतात - हभप पराग महाराज चोपडे

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर - दि.२० फेब्रुवारी**

रामायण, महाभारत, श्रीमद् भगवतगीता, श्री शिवमहापुराण यासारखी सनातन हिंदू धर्मातील सर्वच पवित्र ग्रंथ, वेद उपनिषद व पुराणे आधुनिक काळात माणसाला आनंदी, समाधानी, भरभराटीचे आयुष्य व माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण देतात असे उद्गार ह भ प पराग महाराज चोपडे (भालोदकर) यांनी काढले.

ते श्रीकृष्ण प्रतिष्ठान आयोजित अखंड हरिनाम संगीतमय श्री महाशिवपुराण कथेच्या सांगता प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी सनातन हिंदू धर्माचे सखोल संस्कार, गणेशोत्सव दुर्गा उत्सव पारंपरिक पद्धतीने च साजरे केले पाहिजे ,या उत्सवाचे इव्हेंट रूपांतर मोठं खंत जनक लाजिरवाणे असून सनातन पवित्र हिंदू संस्कृती चा ऱ्हास होत असल्याचे कथाकार पराग महाराजांनी व्यक्त केले

श्रीकृष्ण नगर परिसरातील ॐ श्री चंद्रशेखर महादेव मंदिर संस्थान आयोजित सात दिवशीय श्री शिवमहापुराण कथा पार पडली. कलश यात्रा काढून कथेत सती देहत्याग, कार्तिकीय जन्म कथा, श्री गणेश जन्म कथा, बारा ज्योतिर्लिंग कथा यांच्या माध्यमातून भगवान सदाशिवाचे स्वरूप सांगण्यात आले.काल्याचे किर्तन, महाप्रसाद व धार्मिक आणि सांस्कृतिक भव्य दिंडी ने कथा समाप्ती करण्यात आली. कथेच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीकृष्ण प्रतिष्ठान चे सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# खडसे महाविद्यालयात माती आणि पाणी परीक्षण प्रमाणपत्र उपक्रम

**मुक्ताईनगर** : येथील श्रीमती जी.जी. खडसे महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाद्वारे पी.एम. उषा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी माती आणि पाणी परीक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना माती आणि पाणी यातील सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म घटकांवर शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील प्रा. डॉ. रवींद्र जाधव यांनी मार्गदर्शन केले. हे महाविद्यालय ग्रामीण भागात असून बहुतांश विद्यार्थी शेतीशी निगडित आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांना या उपक्रमानंतर माती आणि पाणी परीक्षण संदर्भात जागरूकता व सक्षमता वाढेल. तसेच, त्यांना आपल्या जमिनीची गुणवत्ता व पाण्याची शुद्धता तपासता येईल जेणेकरुन त्यांच्या पिकांच्या उत्पादनात सुधारणा करता येईल. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. सोमेश्वर भले यांनी तसेच संयोजन उपप्राचार्य प्रा. डॉ .संजीव साळवे, प्रा.डॉ. वंदना चौधरी यांनी केले. अभ्यासक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.हेमंत महाजन यांचे मार्गदर्शन केले.




# माळीवाडा परिसर नागेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिर

**नंदुरबार** : येथील माळीवाडा परिसरातील नागेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिन व महाशिवरात्री महोत्सवनिमित्त निम्स मेडिकेअर सर्जिकल अँड डेंटल हॉस्पिटल व लायन्स क्लब तसेच कांता लक्ष्मी आय हॉस्पिटल नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने नागेश्वर महादेव मंदिर येथे मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे उत्साहात पार पडले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महादेवाचे महाआरती करण्यात आली लायन्स क्लबचे पदाधिकारी डॉ, शिरीष कुमार शिंदे, डॉ. चेतन बच्छाव, दिनेश वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. गौरव साखरे, एमडी डॉ. प्रवीण पाटील, बालरोग तज्ञ तसेच डॉ दीपिका वसावे, डॉ. वानखेडे या तज्ञ डॉक्टर्सनी शिबिरात आलेले रुग्णांची रक्तदाब, मधुमेह, अस्थीरोग, लहान मुलांची तपासणी आदी सर्व आजारांचे तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात येवून मार्गदर्शन केले.

नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया योग्य रुग्णांना कांता लक्ष्मी आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात येवून शिबिराच्या ठिकाणी २०३ रुग्णांनी आरोग्य तपासणीसह औषधी व उपचाराच्या लाभ दिला. मोफत रोग निदान आरोग्य शिबिराचे व्यवस्थापन रवींद्र तमायचेकर यांनी केले. सूत्रसंचालन जगन्नाथ माळी यांनी केले. शिव सावता फक्त परिवार. नागेश्वर महादेव सेवा समिती. समाजभूषण राजेंद्र भाऊ माळी सेवा मंच. अखिल भारतीय माळी महासंघ माळीवाडा परिसर तर्फे शिबिर पार पडले. यशस्वीतेसाठी युवक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.




**पब्लीकेशन नोटीस**

प्रकरण तेरा नमुना क (परिच्छेद २६०, पृष्ठ ८७) — ॲड. एस. आर. राउत

**१९२५ च्या अधिनियम एकोणचाळीस याचे कलम २८३ याद्वारे आवश्यक असलेल्या नोटीशीचा नमुना कलम ३७३**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय क स्तर, बोदवड न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०६/२०२६ निशाणी क्रमांक- ०७**

सामान्यतः रा. मौजे बोदवड, ता. बोदवड, जि जळगाव, संपत्ती बाळगणार मयत सुभाष गोविंदराव देशमुख व त्याची पत्नी शांताबाई सुभाष देशमुख- च्या मृत्यूपत्राचे संप्रमाण यावरुन व्यक्ती च्या इस्टेटीचे प्रशासनपत्र बाबाबत च्याउत्तराधिकारी

**अर्जदार - १) आशिष संतोष देशमुख,** वय २१, धंदा- खाजगी नोकरी, **२) निशा संतोष देशमुख,** वय ३९, धंदा- घरकाम **३) सृष्टी संतोष देशमुख,** वय १५, धंदा शिक्षण, अ.क.३ ची अ.पा.क म्हणून अ.नं. २ अ.नं १ ते ३ रा. केळवद, ता. चिखली, जि बुलढाणा. **४) ज्योति कपिल देशमुख,** वय ४१, धंदा- घरकाम **५) गौरव कपिल देशमुख,** वय १८, धंदा- शिक्षण **६) हर्षल कपिल देशमुख,** वय १७, धंदा- शिक्षण, अ.नं. ६ ची अ.पा.क म्हणून अ.नं ४ अ.नं ४ ते ६ रा. रेणुका नगर, बोदवड, जि. जळगाव **७) संगिता शरद पांढरे,** वय ४७, धंदा- घरकाम रा. पहूर पेठ, ता. जामनेर, जि. जळगांव **८) सुरेखा अनिल पांढरे,** वय ४९, धंदा- घरकाम रा. चित्रकुट सोसायटी, एसटी डेपो रोड, नवबाजार, कारजन, वडोदरा, गुजरात,

**// विरुध्द //**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

यांस याद्वारे पुढील प्रमाणे नोटीस देण्यात येत आहे की, यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम ३ व ४ प्रमाणे मृत व्यक्ती **मयत सुभाष गोविंदराव देशमुख** रा बोदवड यांचा मृत्यू दाखल अर्जातील दि ०९/०६/२०२१ रोजी मृत्यू झाला. (दि. ०९/०६/२०२१ रोजीचे मृत्युदाखला जोडून) व त्यांची पत्नी शांताबाई सुभाष देशमुख रा. बोदवड यांचा मुत्यू दि. १८/०५/२०२१ रोजी झाला (दि.१८/०५/२०२१ रोजीचे मृत्युदाखला जोडून) यांना त्यांचे मृत्यूपश्चात हिंदु वारसा प्रमाणे वर्ग- १ मधील यांच्या मृत्यूपश्चात **१ संतोष सुभाष देशमुख, २. कपिल सुभाष देशमुख, ३. संगिता शरद पांढरे, ४. सुरेखा अनिल पांढरे** अशी चार अपत्य होती. त्यांपैकी संतोष सुभाष देशमुख हा दिनांक १२/०२/२०२२ रोजी लोहारा ता, पाचोरा जि जळगांव येथे मयत झालेला असून मयत मुलगा संतोष सुभाष देशमुख याला त्याचे मृत्युपश्चात पत्नी निशा संतोष देशमुख, मुलगा आशिष संतोष देशमुख, मुलगी सृष्टी संतोष देशमुख असे अर्ज नं १ ते ३ कायदेशीर वारस आहे. मयत सुभाष गोविंदराव देशमुख व शांताबाई सुभाष देशमुख यांचा दुसरा मुलगा कपिल सुभाष देशमुख हा दिनांक १२/०४/२०२१ रोजी बोदवड ता. बोदवड येथे मयत झालेला असून मयत कपिल सुभाष देशमुख याला त्यांचे मृत्युपश्चात त्यांची पत्नी ज्योति कपिल देशमुख, मुलगा हर्षल कपिल देशमुख व मुलगा गौरव कपिल देशमुख असे अर्ज नं ४ ते ६ कायदेशीर वारस आहेत. मयत सुभाष गोविंदराव देशमुख व शांताबाई सुभाष देशमुख यांच्या मुली अर्जदार नं ७ संगिता शरद पांढरे व अर्जदार नं ८ सुरेखा अनिल पांढरे विवाहित असून दोघही त्यांच्या सासरी नांदत आहेत. अर्जदार नं १ ते ३ हे मयत सुभाष गोविंदराव देशमुख यांचा मयत मुलगा संतोष सुभाष देशमुख यांच्या मृत्युच्यापश्चात त्यांचे कायदेशीर वारस आहेत अर्जदार नं ४ ते ६ हे मयत सुभाष गोविंदराव देशमुख यांचा मयत मुलगा कपिल सुभाष देशमुख यांच्या मृत्युच्यापश्चात त्याचे कायदेशीर वारस आहेत तसेच अर्जदार नं ७ व ८ ह्या मयत सुभाष गोविंदराव देशमुख व शांताबाई सुभाष देशमुख यांच्या मुली म्हणून कायदेशीर हिस्सा आहेत. त्यामुळे अर्जदार १ ते ८ हे मयत सुभाष गोविंदराव देशमुख यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार हे शासकीय व निमशासकीय कार्यालयात गेले असता संबंधीत अधिका-यांनी अर्जदार यांना में कोर्टातून शासकिय व निम्न शासकिय वारस लावण्यासाठी वारस दाखला में कोर्टातून आणण्यास सांगितले. तसेच सदर वारस प्रमाणपत्रा शिवाय शासकिय व निम्न शासकिय कार्यालयामध्ये वारस लावणे शक्य नसल्याने सदर अर्जास कारण घडतेते आहे. त्याकरीता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी या न्यायालयात दि. १०/०२/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, सदर मृत व्यक्ती मयत सुभाष गाविंदराव देशमुख व शांताबाई सुभाष देशमुख हे रा. मौजे बोदवड, ता. बोदवड, जि. जळगाव, येथे सामान्यतः राहत होते (किंवा संपत्ती बाळगून होते) व ते दि. ०९/०६/२०२१ व दि. १८/०५/२०२१ रोजी बोदवड, ता. बोदवड, जि. जळगांव येथे मयत झालेले असुन (अर्जदार यांनी मृताचे वारस म्हणून) वारस दाखला मिळणेकामी या अधिकाराने मे. दिवाणी व फौजदारी न्यायालय, बोदवड येथे सदर अर्जाच्या चौकशीसाठी व सुनावणीकरीता **दि. २३ माहे मार्च २०२६** हा दिवस निश्चीत केलेला आहे. सदर अर्जदार हे मयतांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास सदर अर्जदारांना मयत मयत सुभाष गाविंदराव देशमुख व शांताबाई सुभाष देशमुख यांचे वारस दाखला देण्यात येईल. आज दि. १४/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली असे

शिक्का

**आदेशावरुण**
**सही/-**
**सहायक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय. बोदवड**

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



## महत्त्वाचे

### बेपत्ता दोन तरुणी तपासात मिळाल्या

**जळगाव** : घराबाहेर पडुन वेगवेगळ्या ठिकाणाहून बेपत्ता झालेल्या दोन तरुणी मिसिंग तपासात मंगळवारी (१७ फेब्रुवारी) पोलिसांना मिळुन आल्या. १९ वर्षीय तरुणी रावेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सोमवारी (१६ फेब्रुवारी) तसेच १८ वर्षीय तरुणी गुरुवारी (१२ फेब्रुवारी) सावदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली होती. या दोन्ही तरुणी मंगळवारी मिळुन आल्या. कुटुंबियांना बोलवून दोघांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

### कार घेऊन चोरटे फरार

**जळगाव** : मंदिराच्या मागे लावलेली सुमारे दोन लाख १० हजार रुपये किमतीची मारुती कार (एमएच १९ सीयू ६३५३) चोरट्यांनी चोरुन नेली. शहरातील गणेशवाडी, पंचमुखी हनुमान मंदिराच्या मागे ही घटना मंगळवारी ( १७ फेब्रुवारी) सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी मुस्तफा निरुद्दीन मकरा (वय ६२,रा. ओंकारनगर ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक प्रदीप चौधरी हे तपास करीत आहेत.

### घराबाहेर पडलेली तरुणी बेपत्ता

**जळगाव** : घरात कोणाला काही एक न सांगता घराबाहेर पडलेली १८ वर्षीय तरुणी बेपत्ता झाली. मंगळवारी (१७ फेब्रुवारी) सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ही घटना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी तक्रारीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली.

### चालकांच्या वादातून बस पोलीस ठाण्यात

**जळगाव** : नवीन बस स्थानकातून मार्गस्थ होणारी जामनेर आगाराची बस व रस्त्यावरुन जात असलेल्या चारचाकी वाहन यांच्यात किरकोळ धडक झाली. त्यानंतर चालकांमध्ये वाद निर्माण झाला. हा वाद थेट जिल्हा पेठ पोलीस ठाणे येथे पोहोचला. या साऱ्या प्रकारात बसमधील विद्यार्थी व इतर प्रवाशांना तब्बल अर्धा तास नाहक ताटकळत बसावे लागले. ही घटना शुक्रवारी (ता. २०) रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडली. बसस्थानकाबाहेर वाहतूक कोंडी होती. तेव्हा बस आगारातून बाहेर येत असताना किरकोळ अपघात झाला. तो वादाला कारण ठरला. दोन्ही वाहन चालकांच्या चर्चेअंती वादावर पडदा पडला.

### गळफास घेत तरुणाची आत्महत्या

**जळगाव** : राहत्या घराच्या एका रुममध्ये तरुणाने गळफास घेत आत्महत्या केली. प्रवीण तुलसीदास राठोड (१९, रा. आदर्श नगर) असे मयताचे नाव आहे. गुरुवारी (१९ फेब्रुवारी) रात्री ही घटना उघडकीस आली. या तरुणाने राहत्या खोलीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १९ फ ेब्रुवारी रोजी रात्री उघडकीस आली. प्रवीण हा मूळ धानवड येथील रहिवासी आहे. कामानिमित्त तो भाडेतत्वार एका घरात वास्तव्य करत होता. हॉटेलमध्ये काम करुन तो उदरनिर्वाह करत होता. या प्रकरणी रामानंद नगर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. तपास पोहेकॉ प्रवीण जगदाळे हे तपास करीत आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क - (०२५७)
२२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# ऑनलाईन पुरवठा करणाऱ्या डिलिव्हरी बॉयचा जीव धोक्यात

## सुसाट दुचाकीवरुन जाताना सुरक्षेच्या सुविधेचा अभाव

**आर. आर. पाटील**
**जळगाव,२० फेब्रुवारी :**

तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईनचा सर्वत्र झपाट्याने विस्तार झाला. विविध कंपन्यांनी ग्राहकांनी केलेली ऑर्डर वस्तूची थेट त्यांच्या घरी पोहोचविण्याची सेवा उपलब्ध करुन दिली. या वस्तू पोच करण्यासाठी त्या त्या कंपनींनीने डिलिव्हरी बॉयची नेमणूक केली. एका बॅगमध्ये वस्तू भरुन हे बॉय पाठीवर भार ठेवत त्या वस्तु पोचसाठी दुचाकीने गल्लोगल्लीत जावुन घरपोच सेवा देत आहे. दुचाकीने नेहमी फिरणाऱ्या या बॉयना सुरक्षिततेच्यादृष्टीने सुविधांचा अभाव असल्याचे दिसते आहे.

एका मोबाईलवरुन केलेली वस्तुंची ऑर्डर विनाविलंब घरपोच मिळत असल्याने तरुण तरुणींकडून ऑनलाईन खरेदीला मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. जसे जसे ऑनलाईन ग्राहक वाढले तसे तसे कंपनीकडून सेवा देणाऱ्या डिलिव्हरी बॉयच्या बॅगमध्ये वस्तुंचे वजन वाढत गेले. ऑर्डर कुठली का असेना, ती घरपोच देण्यासाठी ते दिवसभर शहरासह परिसरात फिरतांना दिसुन येतात.

**वेळीच कृतीची गरज**

आर्डरच्या वस्तू प्राप्त होताच डिलिव्हरी बॉय दुचाकी घेऊन त्या इच्छित परिसरात वेगाने जातात. त्याठिकाणी वस्तू दिल्यानंतर अन्य ग्राहकांची वस्तू देण्यासाठी पुढचा प्रवासाला निघतात. दिवसभर ते दुचाकीने शहरात वावरतात. रस्त्यावर समोरुन कोणते वाहन कसे येईल, याची शाश्वती नसते. अप्रिय घटना टाळण्याच्याअनुषंगाने वेळीच दखल घेत कंपन्यांनी त्यांच्या डिलिव्हरी बॉयच्या जिवीताच्या सुरक्षेकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तीन चार दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात ऑनलाईन वस्तू पोच देण्यासाठी डिलिव्हरी बॉय दुचाकीवरुन फिरत होता. दुचाकीने जात असताना अचानक अपघात होवुन तो रस्त्यावर पडला. त्याच्या हातापायांना दुखापत झाली. या तरुणाच्या डोक्यात कापडी टोपी असल्याचे प्रत्यदर्शीनी दिसले. जीव धोक्यात घालुन ग्राहकांना वस्तू देण्यासाठी फिरणाऱ्या डिलिव्हरी बॉयच्या डोक्यात हेल्मेट नसल्याचे चित्र दिसल्यानंतर अनेक व्यावसायिक अंचबित झाले.

**शहरात या कंपनीकडून सेवा**

शहरासह जिल्ह्यात ऑनलाईन वस्तू घरपोच देण्याची सुविधा विविध कंपन्यांकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ग्राहकांना फक्त त्यांच्या मोबाईलवरुन वस्तूची ऑर्डर द्यावी लागते. संसार उपयोगीपासून, इलेक्ट्रीक, इलेक्ट्रॉनिक वस्तू ते कपडे सर्व काही अपेक्षित वस्तू ग्राहकाच्या हातात पोहोचविण्यासाठी विविध कंपन्यांनी अधिकृत डिलिव्हरी बॉय नेमले आहेत. प्रामुख्याने अमेजन, फ्लिपकार्ट, मीशो, मिनत्रा, नायका,आजीओ यासह अन्य कंपन्या ऑनलाईन वस्तूंचा सप्लाय देण्याच्या सेवेत आहेत.

**डोक्यात केवळ कॅप**

वस्तूंचे ओझे घेऊन शहरात विविध भागात फिरणारे ऑनलाईन कंपनीचे डिलिव्हरी बॉय दररोज शहरात दुचाकीवरुन वस्तू पोचसाठी फिरतात.वस्तू उपलब्ध होताच तिची वेळेवर पोच व्हावी, तसेच ती जलद गतीने ग्राहकाला मिळावी,म्हणून हे बॉय वेगाने दुचाकीने घरांचा शोध घेत वस्तु त्या त्या ठिकाणी देतात. वाहन चालविताना सुरक्षिततेच्यादृष्टीने डोक्यात हेल्मेट असणे आवश्यक आहे. मात्र बऱ्याच डिलिव्हरी बॉयच्या डोक्यात टोपी असल्याचे दिसुन आले आहे. त्यांच्या सुरक्षित प्रवासाच्यासाठी आवश्यक त्या गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक आहे. कंपनी याबद्दल सजग असणार, मात्र विना हेल्मेट दुचाकीने फिरणाऱ्या डिलिव्हरी बॉयच्या सुरक्षिततेचे काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**भार वाहणारे असुरक्षित**

ऑनलाईन वस्तू घरपोच देणाऱ्या डिलिव्हरी बॉयच्या वेगवान कामगिरीमुळे कंपनीचा व्यवसायात वृंध्दीगत होत असते. त्यांना रस्त्यावर सुरक्षा प्रदान करण्याची जबाबदारी त्या त्या ऑनलाईन वस्तू सप्लाय कंपनीचे असते. असे नियुक्त डिलिव्हरी बॉयना हेल्मेट उपलब्ध करुन देण्यात आले का? ते हेल्मेट परिधान करुन घरपोच वस्तू देत आहेत का? विनाहेल्मेट दुचाकीवरुन वस्तू सेवा देणाऱ्या डिलिव्हरी बॉयकडे हेल्मेट आहे किंवा कसे? असे प्रश्न यानिमित्ताने समोर आले आहेत. या अनुषंगाने कंपन्यांनी विचार आणि कृती करण्याची गरज निर्माण झाली आहे.





**डबल काम**

ग्राहकाला वस्तू मिळाली, मात्र ती त्याला अपेक्षित नव्हती. यासाठी कंपनीकडून वस्तू परत घेण्याचा पर्याय आहे. वस्तू प्राप्त झाल्यानंतर कंपन्यांच्या नियमानुसार सात ते दहा दिवसाची वस्तू बदल अथवा वस्तू नाकारण्यास मुदत असते. ही वस्तू पुन्हा ताब्यात घेण्यासाठी या डिलिव्हरी बॉयना त्या घरापर्यत जावे लागते. वस्तू ताब्यात घेतल्यानंतर ती कंपनीकडे जमा करतो. म्हणजे वस्तु सप्लाय करा. तसेच ग्राहकाची ऑर्डर रद्द अथवा बदल असल्यास ती वस्तू परत ताब्यात घ्या, कंपनीत जमा करा, हे वाढीव काम करावे लागते. यामुळे डिलिव्हरी बॉयना डबल काम करावे लागतेच, शिवाय ग्राहक घरी नसल्यास पुन्हा त्याठिकाणी फेरी मारावी लागते. यामुळे डिलिव्हरी बॉयना मनस्ताप होतो. मात्र ते कोणाजवळ व्यक्त होत नाहीत,अथवा तक्रारही करत नाहीत. सेवा जलदगतीने द्यावी,हे त्यांचे ध्येय असते. त्यानुसार ते वाटचाल करताना शहरात दिसुन येत आहे.

# गाळ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी महासभेत प्रस्ताव आणण्याची तयारी

## ८ टक्केपर्यंतच्या दराला स्थगिती ; शासनाकडून निर्णयाची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २० फेब्रुवारी**

महापालिकेच्या मुदत संपलेल्या संकुलातील गाळ्यांचा थकित दुकान भाड्याचा प्रश्न हा पुन्हा चिघळणार असल्याचे दिसून येत आहे. महापालिकेने शासनाच्या सुचनेनुसार व २ व ३ टक्के दरानुसार भाडे आकारणी केल्यास महापालिकेला किती नुकसान होईल याचा सविस्तर अहवाल दिला आहे. तसेच हा निर्णय लागू झाल्यास होणारे नुकसानची रक्कम महापालिकेला देण्यात यावी असा अहवाल शासनाकडे पाठवला आहे. तसेच महापालिका प्रशासन देखील महासभेपुढे मुदत संपलेल्या गाळ्यांचा प्रश्न कसा सोडवावा यासाठी महासभेपुढे प्रस्ताव मांडण्याच्या तयारीत आहेत.

**८ टक्के दराच्या निर्णयाला स्थगिती**

महापालिकेने २०१९ च्या शासन निर्णयानुसार मुदत संपलेल्या संकुलातील गाळ्यांचे थकबाकी भरण्यासाठी ८ टक्के दरानुसार निर्णय घेतला होता. याला महाभेत देखील मंजुरी मिळाली होती. या निर्णयाच्या विरोधात गाळेधारकांनी राज्यशानाकडे धाव घेतली होती.



यावर शासनाने २०२२ ला या निर्णयाला स्थगिती दिली होती.

**दर निश्चीत समितीने ४-५ टक्केचा घेतला निर्णय**

शासनाने दिलेल्या सुचनेनुसार महापालिकेने भाडे व सुरक्षा ठेव निर्णायक समितीची स्थापना करण्यात आली होती. यात समितीने थकीत गाळेभाडे ४ व ५ टक्के दरानुसार आकारण्याचा निर्णय घेतला. यात व्यवसायीक उत्पन्न जास्त असलेले ५ टक्के तर व्यवसाय उत्पन्न कमी असलेले ४ टक्के नुसार गाळेभाडे दर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतू या निर्णयावर आमदार सुरेश भोळे यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडल्याने राज्यमंत्री या निर्णयावर सुचना महापालिकेला दिल्या होत्या. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील २ व ३ टक्के दरानुसार गाळेदर आकारणी करून प्रस्ताव पाठविण्याच्या सुचना नगरविकास विभागाच्या माध्यमातून महापालिका प्रशासनाला दिल्या होत्या.

**मनपा आता महासभेपुढे मांडणार प्रस्ताव**

मुदत संपलेल्या गाळ्यांच्या भाडे दराचा तिढा सुटत नसल्याचे दिसून येत आहे. यात राज्याशासनाकडे मनपाने २ व ३ टक्के भाडे दरानुसार वस्तुनिष्ट अहवाल पाठविला आहे. यात ८ टक्के नुसार किती उत्पन्न महापालिकेस मिळेल. ४ व ५ टक्के नुसार किती उत्पन्नांचे नुकसान होईल तसेच २ व ३ टक्के नुसार किती नुकसान महापालिकेला होईल याबाबत सविस्तर माहिती मपाने पाठविली आहे. तर आगामी महासभेत महापालिका प्रशासन मुदत संपलेल्या गाळ्यांच्या भाडे दरावर काय निर्णय घ्यावा, आपल्या किती नुकसान होईल याबाबत सविस्तर माहिती सभागृहाला अवगत करणार आहे.

# 'कपॅसिटी कटिंग' विरोधात सोलर संघटनेचा एल्गार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २० फेब्रुवारी**

महावितरणने कपॅसिटी कटिंगचा निर्णय घेतला आहे. या विरोधात सोलर संघटनेने आज आवाज उठवित लावण्यात आलेले निर्बंध तात्काळ रद्द करण्याची मागणी सोलर संघटनेने केली. यासंदर्भात शुक्रवारी (२० फेब्रुवारी) जिल्हाधिकारी कार्यालयात जावुन मागणी निवेदन सादर केले. मागणीची दखल न घेतल्यास मंत्रालयावर धडक देऊ,असा इशारा पदाधिकाऱ्यांनी आज दिला.

महावितरण कंपनीने लागू करण्यात आलेल्या 'कपॅसिटी कटिंग'चा निर्णय घेत तो लागू केला आहे. या निर्णयाविरोधात सोलर संघटना आक्रमक झाली आहे. हा निर्णय तात्काळ मागे घ्या, अशी ठाम मागणी करत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मागणी निवेदन सादर केले. यानंतर महावितरण कार्यालयाकडे पदाधिकाऱ्यांनी धडक दिली. याठिकाणी जोरदार घोषणा देत तीव्र निदर्शने करत लक्ष वेधले. महावितरण व राज्य सरकारने लावलेले हे निर्बंध सोलर उद्योजकांवर अन्याय करणारे असून सौर ऊर्जा क्षेत्राला खिळ बसवणारे आहेत,असा आरोप संघटनेने केला. कपॅसिटी कटिंगमुळे अनेक सोलर प्रकल्प आर्थिक अडचणीत सापडणार असून गुंतवणूकदार व ग्राहकांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली.

संघटनेने मुख्यमंत्र्यासह राज्य सरकार महावितरण प्रशासनाच्या या निर्णयाचा तीव्र निषेध केला. "लावलेले निर्बंध तात्काळ रद्द करा, अन्यथा सोलर संघटनेचे सर्व पदाधिकारी मंत्रालयावर धडक देऊन जाब विचारतील," असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला. सौर ऊर्जा क्षेत्र वाचवण्यासाठी ही लढाई अधिक तीव्र करण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला असून, शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत हा मुद्दा अधिकच तापण्याची शक्यता आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; महावितरणसमोर निदर्शने**



# लग्नसोहळ्यास जाताना अपघात : शेळगाव येथील १२ जण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,२० फेब्रुवारी**

श्रीरामपूर येथे नातेवाईकांकडील लग्न सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी जाताना आयशर वाहनाचा अपघात झाला. यात शेळगाव (ता.जळगाव) येथील बारा जण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी (२० फेब्रुवारी) पहाटे सिल्लोड घाटात घडली. जखमींना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. ही वार्ता कळताच शेळगाव येथील ग्रामस्थांनी रुग्णालयात धाव घेत जखमींच्या प्रकृतीबद्दल माहिती जाणुन घेतली.

श्रीरामपूर येथे आज लग्न सोहळा होता. यासाठी आज पहाटे चार वाजता शेळगाव येथील नातेवाईक मंडळी आयशर वाहनातून रवाना झाले. सिल्लोड घाटातून जात असताना एका खाब्यांला वाहनाचा धक्का लागल्यानंतर अपघात झाला. आयशरमधील प्रवाश्यांना दुखापत होऊन ते जखमी झाले.

जखमींमध्ये ममता दिनकर कोळी (वय १५) , मोहिनी हिरामण कोळी, कविता हिरामण तायडे (वय ३५), पुरुषोत्तम हिरामण तायडे (वय १२), साहिल मुकेश सपकाळे (वय १४), बेबाबाई वाल्मिक गोसावी (वय ४०), वसंताबाई नामदेव कोळी (वय ६०), सखुबाई जालिंदर गोसावी( वय ४०), सविता शामराव गोसावी (वय ४०), कविता समाधान कोळी (वय ३५),प्रमिला नामदेव गोसावी (वय ५०) तसेच छायाबाई पोपट गोसावी (वय ४०,सर्व रा.शेळगाव) यांचा समावेश आहे. जखमींवर उपचार सुरू असुन प्रकृती स्थिर असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

# काळ्या फिती लावून भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## पुढचे पाऊल 'बेमुदत कामबंद'

**जळगाव** : विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी नारे देत काळ्या फिती लावुन आंदोलन केले.नवीन आस्थापना मंजूरी, वेतनश्रेणी अशा मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीतर्फे राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनात जळगाव जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी आज सहभाग घेतला. हे आंदोलन वेगवेगळ्या टप्प्यात करण्यात येत आहे.आज काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांनी कामकाजात सहभाग घेतला. मागण्यांचा विचार न झाल्यास सामूहिक रजा, बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशार भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांनी दिला. त्यानुसार बुधवारी (१८ फेब्रुवारी) तसेच शुक्रवारी (२० फेब्रुवारी) असहकार आंदोलन, २३ ते २६ फेब्रुवारी दरम्यान कर्मचाऱ्यांचे सामुहिक रजा आंदोलन, २७ फेब्रुवारी पुणे येथे कर्मचाऱ्यांचा आक्रोश मोर्चा,अशी या आंदोलनाची रुपरेषा निश्चित करण्यात आली आहे.

या आंदोलनाची दखल न घेतली गेल्यास अथवा मागण्यांचा विचार न झाल्यास २ मार्च पासून राज्यातील भूमि अभिलेख कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलनाला सुरुवात करतील,असा इशारा जिल्हाध्यक्ष राहुल पाटील यांनी दिला.



# पुढे जावु नका.. खून झालाय... तोतया पोलिसाचा फंडा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,२० फेब्रुवारी**

पुढे जाऊ नका, खून झाला. वस्तू सांभाळा असे सांगत पोलीस असल्याचे भासविले. त्यानंतर तीन तोतया पोलिसांनी महिलेची सोन्याची चैन तसेच सोन्याच्या बांगड्या घेत पलायन केले. मंगळवारी (१० फेब्रुवारी) दुपारी एक वाजेच्या सुमारास ही घटना जुने जळगाव येथे चौकात घडली. याप्रकरणी तिघांविरोधात गुरुवारी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

कमलाबाई एकनाथ सोनार (वय ६५,रा. रामपेठ, स्नेह चौक) याठिकाणी वास्तव्यास आहेत. त्या जुने जळगावातील भाग्यलक्ष्मी टेंटहाउसजवळील चौकातून भागवत कथेला उपस्थित राहण्यासाठी जात होत्या. तेव्हा एका संशयिताने त्यांना रोखले.पोलीस दलातील साहेब तुम्हाला बोलवित आहे,असे तो म्हणाला. रस्त्याच्या कडेला थांबलेल्या या तोतया साहेबाकडे महिला गेली असता, तो म्हणाला, पुढे खून झाला आहे. तुम्ही तिकडे जावू नका. अंगावरील दागिने काढुन ठेवा,असा बनाव केला. किर्तनाच्या ठिकाणी गेल्यावर दागिने काढते,असे महिलेने सांगितले.

त्याचवेळी तिसरा साथीदार आला. त्याने त्याच्या हातातील ब्रास्लेट काढत त्याठिकाणी तोतया पोलिसांच्या हातात दिले. महिलेनेही तिच्या गळ्यातील चैन काढुन दिली. हातातील बांगड्या काढण्याकामी संशयित मदतीला पुढे सरसावला. महिलेने काढलेले दागिने एका कागदात गुंडाळले. ते महिलेजवळील पिशवीत ठेवले. पुढे गेल्यावर महिलेने कागद उघडून पाहिला असता त्यात दागिनेच्या जागी दगड निघाले. तत्पूर्वी तिघे तोतया पोलीस पसार झाले.

९१ हजार ९०० रुपये किमतीची ११.५६० ग्रॅम वजन असलेली सोन्याची चैन, ६५ हजार ३१ रुपये किमतीची २०.०५० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्या असा एकुण एक लाख ६९ हजार ३१ रुपयांचा मुद्देमाल तोतया पोलिसांनी घेत पलायन केले. महिलेच्या तक्रारीनुसार याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर यांनी घटनास्थळी जावुन प्रकार जाणुन घेतला.

# जळगावकरांसाठी २६ पासून खान्देश महोत्सवाचे आयोजन

## खाद्य पदार्थांसह लोककलांचा गजर; महापौर दीपमाला काळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २० फेब्रुवारी**

स्थानिक महिला बचत गट, उद्योजक व स्वयंसहाय्यता गटांना प्रोत्साहन देण्यासाठी जळगाव शहर महापालिकेतील महिला व बालकल्याण विभाग व दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत 'खानदेश महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव शहरातील सागर पार्क येथे होत आहे. या महोत्सवात जळगावकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी केले आहे.

महापालिकेतील आपल्या दालनात शुक्रवारी (ता.२०) आयोजित पत्रकार परिषदेत महापौर काळे बोलत होत्या. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी, उपायुक्त निर्मला गायकवाड, गायत्री पाटील उपस्थित होते. महापौर काळे म्हणाल्या की, २६ फेब्रुवारी ते २ मार्चदरम्यान सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्व स्टॉल नागरिकांसाठी



खुले राहणार आहेत. या महोत्सवात खानदेशातील संस्कृती, खाद्यपरंपरा व हस्तकलेचे दर्शन घडणार आहे. यात प्रामुख्याने विविध वस्तूंचा समावेश राहणार आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू, होम अप्लायन्सेस, किचन अप्लायन्सेस व इलेक्ट्रॉनिक, ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने, ऑफिस व होम डेकोरेटिव्ह वस्तू, शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे स्टॉल येथे राहणार आहेत. याशिवाय या खानदेश महोत्सवात प्लॅस्टिकमुक्ती ही संकल्पना घेऊन येणारा एका कुटूंबाला एक कापडी पिशवी दिली जाणार आहे. रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरदेखील या महोत्सवात घेतले जाणार आहेत, अशी माहिती उपमहापौर चौधरी यांनी दिली.

**महिलांसाठी विशेष कार्यक्रम**

प्रसिद्ध अभिनेता ओम यादव यांच्या उपस्थितीत महिलांसाठी येत्या २८ फेब्रुवारीला खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यात महिलांना राणीहार व भेटवस्तू जिंकण्याची संधी मिळणार आहे. यावेळी गायक, समूहनृत्य व स्थानिक कलावंतांचे सादरीकरण होईल. लहान मुलांसाठी खास गेम झोन व जादूगाराचे प्रयोग आयोजित करण्यात आले आहेत. लकी विजेत्यांना भेटवस्तू दिली जाणार आहेत. उत्कृष्ट खाद्यपदार्थ स्टॉलधारकांचादेखील गौरव केला जाणार आहे. महोत्सवात खाद्य पदार्थांचे ७५ व अन्य विक्रीचे १०५ असे एकूण १८० स्टॉल्स राहणार आहेत.

# मेहरुण येथे प्रभु श्रीराम जेष्ठ नागरिक संघाची स्थापना

**जळगाव** : शिवाजी महाराज जयंती दिनाचे (१९ फेब्रुवारी) औचित्य साधत मेहरुण येथे नवीन संघ स्थापन करण्यात आला. सुरुवातीला छत्रपतींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. सानेगुरुजी लिखित खरा तो एकची धर्म प्रार्थना सादर करण्यात आली. आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते जेष्ठ नागरिक संघाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले.

चैतन्य नगर जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ॲड. अरुण धांडे यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. विशेष प्रमुख अतिथी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, ज्ञानेश्वर नाईक,सदाशिव सोनावणे, देविदास लाड, महेश कापुरे. प्रा.रामदास मोते आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या मान्यवरांसह नवनिर्वाचित नगरसेवक सुनील महाजन, राजेंद्र घुगे, निकीता वंजारी, रेखा पाटील, गणेश सोनवणे, नलुबाई सोनावणे, अक्षय वंजारी, रितिक ढेकळे यांचा सत्कार प्रभु श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य दिलीप लाडवंजारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सामूहिक पसायदानाने सभेची सांगता झाली. यशस्वीतेसाठी भूषण लाडवंजारी, व सर्व कार्यकारिणी संचालकांनी परिश्रम घेतले.



## अग्रलेख...

# खिरापतींना 'सर्वोच्च' चपराक

लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविलेली व्यवस्था असते. ती समाजाच्या तळागाळातील, गोरगरीब वर्गाच्या कल्याणासाठी असते. शासनाने समाजातील वंचित, पीडित, दलित, शोषित आणि उपेक्षित वर्गाच्या सर्वांगीण उत्थानासाठी आवश्यक निर्णय घेतले पाहिजेत, उपाययोजना केली पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कल्याणकारी शासन व्यवस्थेची ती नैतिक आणि मूलभूत जबाबदारी म्हटली पाहिजे. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अन्त्योदयाची संकल्पनाही हीच आहे. अन्त्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. समाजातील शेवटचा माणूस म्हणजे जो अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनातील मूलभूत गरजांपासून वंचित आहे तो माणूस. मात्र, गेल्या काही वर्षांत कल्याणकारी योजना आणि खिरापत किंवा रेवडी संस्कृती यांची सरमिसळ केली जात आहे, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. खरे म्हणजे रेवडी संस्कृती आणि कल्याणकारी योजना यांत खूप फरक आहे. मात्र, खिरापत संस्कृतीत समाजातील गोरगरीब वर्गाच्या असहायतेचा एकप्रकारे गैरफायदा घेतला जातो. कल्याणकारी योजनेत त्याला स्वाभिमानाने जगण्याची संधी दिली जाते. त्याला स्वबळावर उभे होण्याची संधी दिली जाते.

सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निर्णय सगळ्यांच्याच डोळ्यात अंजन आहे. मोफत योजनांसोबत आणखी एक प्रकार सध्या जोरात आहे. तो म्हणजे थेट बँक खात्यात कोणत्याही सबसिडीचे पैसे जमा करणे. या प्रकारात भ्रष्टाचार कमी होत असला, तरी या योजनेचा मोठ्या प्रमाणात गैरफायदाही घेतला जातो. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय तामिळनाडूसंदर्भात असला, तरी देशातील सर्व राज्य सरकारांना तो लागू होणारा आहे. द्रमुक सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून राज्यातील जनतेला मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला; त्याला तेथील वीज मंडळाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्यात सध्या दरमहा १०० युनिट वीज मोफत आहे. नवी योजना लागू झाली तर संपूर्ण वीज मोफत मिळेल. याचा फायदा जसा गरीब वर्गाला मिळेल, तसाच तो श्रीमंतांनाही मिळेल. हरकतीचा मुद्दा हाच आहे. ज्याला गरज आहे, त्याला देण्यात काही हरकत नाही. पण ज्याला गरज नाही, त्याला कोणत्याही मोफत योजनेचा लाभ देणे चुकीचेच. सारे काही मोफत देण्याच्या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत आहे, या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारत अशा योजनांचा फेरविचार करण्याची सूचना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या व्यापक हिताचा म्हटला पाहिजे. तामिळनाडूत येत्या काही महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर वीज वितरण कंपनीच्या याचिकेची दखल घेताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाचे हे निर्देश तामिळनाडू सरकारला दिले आहेत. त्यावर तामिळनाडू सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. निवडणुका असलेल्या राज्यात त्या जिंकण्यासाठी मतांवर डोळा ठेवत लोकांना आकर्षित करणारे लोकप्रिय निर्णय घेण्याची प्रथा पडली आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

मोफत योजना म्हणजे एकप्रकारे मतदारांना दिलेली लाच! दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पैसे देऊन मत विकत घेण्याचा लोकशाहीविरोधी प्रकार म्हटला पाहिजे. त्यातूनच अमकी बहीण, तमका भाऊ, आवडता काका- मामा- भाचा- पुतण्या अशा लाडक्यांच्या मालिकांच्या योजनांची रांग लागली. सहज मार्गाने मते मिळविण्यासाठी राजकीय पक्षांना किंवा सरकारांना अशा योजनांचा अवलंब करावा लागतो. रेवडी योजनांचा राज्याच्या तसेच देशाच्याही अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे यातून आपण समाजाला ऐतखाऊ बनवितो, याचे भान ठेवण्याची गरज न्यायालयाने प्रतिपादिली आहे. सगळ्यांना सगळेच मोफत मिळाल्यास लोक काम तरी का करतील; यातून आम्ही कोणती संस्कृती विकसित करीत आहोत, असा जो प्रश्न न्यायालयाने विचारला, तो अतिशय मार्मिक म्हणावा लागेल. मोफत धान्य, मोफत वीज आणि अन्य मोफत योजनांची देशात लाट आली आहे. याचा अर्थ सरकारने समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी काही करू नये, असा नव्हे. सरकार, मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो, त्याने समाजातील तळागाळातील लोकांच्या व्यापक कल्याणासाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करण्याऐवजी स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. मोफत योजनांचा भडीमार करण्याऐवजी त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर केले पाहिजे. आपल्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांना शिक्षणाची संधी तसेच व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. सर्वांना रोजगार मिळेल, याची काळजी घेतली पाहिजे. रोजगार उपलब्ध करून दिले तर लाचारीचे जीणे जगण्याची आणि मोफत योजनांची भीक घेण्याची वेळ कोणावर येणार नाही. सर्वांना ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येईल.

योजनेच्या नावात 'मोफत' हा शब्द असला, तरी त्यासाठी सरकारला खर्च करावा लागतोच. ही राशी थोडीथोडकी नाही; ती काही हजार कोटींच्या घरात असते. सरकारला मिळणारा महसूल हा निश्चित आहे; त्यात एका मर्यादेपेक्षा जास्त वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे विकास कामांवरच्या खर्चाला कात्री लावली जाते. त्यामुळे त्याचा फटकाही समाजालाच बसत असतो. आवश्यक योजनांवरील खर्च कमी करीत सरकारला अनावश्यक योजनांसाठी आर्थिक तरतूद करावी लागते. सर्व काही मोफत मिळू लागल्यामुळे कष्ट करण्याची सवय हळूहळू लोप पावत आहे. श्रमाला जी प्रतिष्ठा होती, ती कमी होत चालली आहे. ग्रामीण भागात शेतात काम करायला आज शेतमजूर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होत आहे. शहरी भागात घरांत काम करणाऱ्या बायकांची संख्याही कमी होत चालली आहे. यातून नवीन सामाजिक प्रश्न उद्भवत आहेत. मुळात काम करण्याची सवयच समाजातून कमी होत चालली आहे, हा चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. आज रोजगार मिळत नाही, बेरोजगारी वाढली असल्याचे रडगाणे सगळेच गात असतात; पण काम करण्याची, त्यातही कष्टाचे काम करण्याची कोणाची तयारी नाही, ही विसंगती म्हटली पाहिजे. सर्वांना दहा ते पाचची सुखाची नोकरी हवी आहे. मोफतच्या योजनांचा मारा करीत आम्ही समाजाला ऐदी, आळशी आणि ऐतखाऊ तर बनवले नाही ना, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयाने सगळ्याच सरकारांचे कान नुसते पकडले नाही तर पिळलेही.

राजकीय पक्ष आपल्या तात्कालिक लाभासाठी काही निर्णय घेत असतात. मोफत योजना हा असाच एक निर्णय आहे. यातून समाजाचे, देशाचे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे किती नुकसान होते, याचा विचार ते करत नाहीत वा करू शकत नाहीत. एकीकडे आम्ही देशाला आत्मनिर्भर करण्याच्या गोष्टी करतो आणि दुसरीकडे देशातील जनतेवर मोफत योजनांचा मारा करीत त्यांना ऐदी किंवा आळशी बनवू पाहतो. याचा फटका देशातील विकास कामांना बसतो. सरकारला समाजातील तळागाळातील व्यक्तींसाठी काही करायचे असेल तर त्यांच्या मुलांना केजीपासून पीजीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले पाहिजे. त्यांच्या मोफत वैद्यकीय उपचाराची व्यवस्था केली पाहिजे. अशा फुकटखाऊ योजना राबविण्यासाठी सरकारने एकतर आपल्या महसुलात वाढ केली पाहिजे, ते शक्य नसेल तर अशा योजना त्याचा आढावा घेत बंद केल्या पाहिजे. कारण अशा योजनांवर खर्च होणारा पैसा हा करदात्यांचा कष्टाचा आणि घामाचा असतो. त्याची उधळपट्टी करण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. मतांसाठी सार्वजनिक पैशांचा असा खिरापतीसारखा केल्याने ज्याच्या खिशातून हा पैसा जातो, त्याचे नुकसान होते. ज्याला पात्रता नसताना तो पैसा मिळतो, त्याचेही नुकसान होते. अंतिमतः देशाचेही नुकसान होतेच.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# या चिमण्यांनो, परत फिरा रे!

गोव्याची गोव्याची भूमी ही केवळ निसर्गसौंदर्यासाठीच नाही, तर पराक्रमाच्या आणि संघर्षाच्या इतिहासासाठीही ओळखली जाते. याच पृष्ठभूमीवर महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर गोव्यातील पणजी येथील ३० वाडी परिसरात देव गोवेश्वर महाशिव मंदिरात भव्य धार्मिक सोहळा पार पडला; ज्याने केवळ गोव्याचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या सोहळ्यात सुमारे ५०० बांधवांनी हिंदू धर्मात पुनर्प्रवेश केला आहे. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आखाडा परिषदेतील प्रमुख साधुसंत-महंतांच्या साक्षीने वेदपठन, हवन आणि पारंपरिक हिंदू विधी पार पडले. सुमारे ३०० बांधवांनी औपचारिकरीत्या 'घरवापसी' केली, तर इतर २०० जणांनीही हिंदू धर्म स्वीकारत एकूण संख्या ५०० वर पोहोचली. हा केवळ एक धार्मिक विधी नव्हता, तर तो होता आपल्या विखुरलेल्या बांधवांना पुन्हा एकदा मायेच्या सावलीत घेण्याचा एक भावनिक आणि आध्यात्मिक प्रयत्न.

हिंदू धर्माचा इतिहास हा सहिष्णुतेचा इतिहास आहे. मात्र, याच सहिष्णुतेचा फायदा घेत अनेक आक्रमकांनी आणि परकीय शक्तींनी या धर्मावर आघात केले. पण आपण सहिष्णू असलो, तरी पराक्रमात कधीही मागे नव्हतो. आपण या परकीय आक्रमकांचा सामना केला. गोव्याचा इतिहास तर अशा अनेक जखमांनी भरलेला आहे. पोर्तुगीज राजवटीत झालेल्या छळाच्या कथा ऐकल्या तर आजही अंगावर काटा येतो. आजही अनेक ठिकाणी कपटाने, प्रलोभने दाखवून किंवा गरिबी आणि अज्ञानाचा फायदा घेऊन हिंदू बांधवांचे धर्मांतर केले जाते. मिशनऱ्यांच्या जाळ्यात अडकून, आपल्या पूर्वजांच्या संस्कृतीपासून दूर गेलेली ही माणसे प्रत्यक्षात आपल्या मुळांपासून तुटलेली असतात. नरेंद्र महाराजांनी या वास्तवावर नेमके बोट ठेवले आहे. जे बांधव बळजबरीने, कपटाने, लालूच देऊन किंवा काही कारणास्तव त्रस्त होऊन आपला धर्म सोडून गेले, त्यांना पुन्हा सन्मानाने आपल्या धर्मात स्थान देणे, हे आपले कर्तव्य आहे. घरवापसी म्हणजे केवळ धर्मांतर नव्हे, तर ती आहे आपल्या रक्ताच्या नात्याची पुनर्भेट. ज्याप्रमाणे एखादे पाखरू संध्याकाळी आपल्या घरट्याकडे परतते, तशीच ही माणसे आज आपल्या मूळ संस्कृतीकडे परतत आहेत.

हिंदू धर्म हा केवळ एक उपासना पद्धती नसून ती एक व्यापक जीवन पद्धती आहे. हा धर्म म्हणजे फळे आणि फुलांनी बहरलेला एक विशाल वृक्ष आहे. या वृक्षाची मुळे हजारो वर्षे खोलवर रुजलेली आहेत. या वृक्षाच्या शीतल सावलीत बसण्याचा अधिकार जगातील प्रत्येक मानवाला आहे. या वृक्षाची फळे चाखण्याचा आणि त्याच्या फुलांचा सुवास घेण्याचा अधिकार कोणा एका विशिष्ट वर्गाचा किंवा जातीचा नाही, तर तो संपूर्ण मानवजातीचा आहे. अनेक आक्रमक आले, त्यांनी या वृक्षाच्या फांद्या तोडण्याचा प्रयत्न केला, त्याच्या मुळावर घाव घातले, पण हा वृक्ष आजही ताठ मानेने उभा आहे. जगातील अनेक प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या. मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस यांसारख्या महान संस्कृती आज केवळ इतिहासाच्या पुस्तकात उरल्या आहेत. मात्र, हिंदू धर्म आणि त्याची संस्कृती आजही जिवंत आहे, प्रवाही आहे. हेच आमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. हा धर्म 'सनातन' आहे. कारण तो शाश्वत सत्यावर आधारित आहे. त्याचबरोबर इथे सुधारणाही सहज होत आहेत. आजच्या आधुनिक जगात केवळ अध्यात्म सांगून चालणार नाही, तर आपल्याला वास्तवाचे भानही ठेवावे लागणार आहे. इथे एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित राहतो, तो म्हणजे 'संख्याशास्त्र.' लोकशाहीच्या युगात संख्याबळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जर हिंदूंची संख्या घटत गेली, तर आपली संस्कृती, आपली मंदिरे आणि आपली जीवन पद्धती धोक्यात येऊ शकते. त्यामुळेच धर्मांतर रोखणे आणि गेलेल्यांना परत आणणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. आपण आपली पाळेमुळे जपली असली, तरी आपल्याला यापुढे अत्यंत सावध राहावे लागणार आहे. शत्रू केवळ तलवारी घेऊन धावत येत नाही, तर तो कधी विचारांच्या रूपात, कधी मदतीच्या रूपात तर कधी प्रलोभनांच्या रूपात आपल्या घरात शिरतो. आपल्या बांधवांना आपल्या धर्माचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या अडचणीत त्यांच्या पाठीशी उभे राहणे, हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे. जर आपण आपल्या बांधवांची काळजी घेतली, तर त्यांना बाहेर मदतीसाठी हात पसरण्याची गरज पडणार नाही.

जगात आज सर्वत्र अशांतता पसरलेली आहे. युद्धे, दहशतवाद आणि द्वेषाच्या वातावरणात जग होरपळून निघत आहे. अशा वेळी जगाला शांततेचा मार्ग केवळ हिंदू धर्मच दाखवू शकतो. याचे कारण म्हणजे हिंदू धर्माची मूळ वृत्ती. 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे संपूर्ण जग हेच एक कुटुंब आहे, ही भावना केवळ हिंदू धर्मातच आढळते. आपण केवळ स्वतःच्या कल्याणाचा विचार करत नाही, तर आपण 'पसायदान' मागतो. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे, 'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥' म्हणजे दुष्टांची बुद्धी पालटो आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये मैत्रीची भावना निर्माण होवो. ही उदात्त भावना, ही विश्वकल्याणाची प्रार्थना केवळ एका हिंदूच्याच अंतःकरणातून येऊ शकते. त्यामुळेच जगात शांतता प्रस्थापित करायची असेल, तर हिंदू धर्माचे विचार प्रबळ होणे आवश्यक आहे. जे बांधव काही कारणास्तव अहिंदू झाले आहेत, ज्यांचे पूर्वज हिंदू होते, पण आज ते आपल्या संस्कृतीपासून दुरावले आहेत, त्यांना आमचे कळकळीचे आवाहन आहे- आपल्या घरी परत या. हिंदू धर्म हा कोणावरही सक्ती करत नाही, तो कोणाचा द्वेष करत नाही. हा धर्म तुम्हाला स्वीकारण्यासाठी, तुम्हाला प्रेम देण्यासाठी सदैव सज्ज आहे. नरेंद्र महाराजांनी आतापर्यंत अनेकांना पुन्हा हिंदू धर्मात आणले आहे. हा आकडा केवळ संख्या दर्शवत नाही, तर तो दर्शवतो त्या लोकांचा आपल्या मूळ संस्कृतीवर असलेला विश्वास. गोव्यातील त्या ५०० लोकांच्या डोळ्यांतील समाधान हे सांगत होते की, त्यांना त्यांचे हरवलेले घर सापडले आहे. वैदिक मंत्रांच्या घोषात, अग्नीच्या साक्षीने जेव्हा त्यांनी पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा घेतली, तेव्हा तो क्षण केवळ त्यांच्यासाठीच नाही, तर संपूर्ण हिंदू समाजासाठी अभिमानाचा होता.

धर्मांतराचे संकट हे केवळ धार्मिक संकट नाही, तर ते सामाजिक आणि राष्ट्रीय संकटही आहे. जेव्हा एखादा हिंदू बांधव आपला धर्म सोडतो, तो आपल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीपासून, आपल्या पूर्वजांच्या परंपरांपासून आणि आपल्या राष्ट्राच्या अस्मितेपासून दुरावतो. आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की, धर्मांतर हे बहुधा अज्ञानातून किंवा गरजेपोटी केले जाते. जर आपण आपल्या बांधवांना योग्य शिक्षण दिले, त्यांना आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले तर कोणीही त्यांना आपल्यापासून तोडू शकणार नाही. या सोहळ्याने हे सिद्ध केले आहे की, जर आपण प्रेमाने आणि सन्मानाने साद घातली, तर गेलेले बांधव नक्कीच परत येतात. हिंदू धर्म हा कधीही संकुचित नव्हता. 'आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः' म्हणजे सर्व दिशांनी आम्हाला शुभ विचार प्राप्त होवोत, ही आमची प्रार्थना आहे. आपण जगाला 'योग' दिला, 'आयुर्वेद' दिला आणि 'अध्यात्म' दिले. जगाला शांतीचा संदेश देणारा हा धर्म आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहे. गोव्यातील त्या ५०० लोकांनी जेव्हा पुन्हा एकदा कपाळावर टिळा लावला आणि 'हर हर महादेव'चा जयघोष केला, तेव्हा तो केवळ एक आवाज नव्हता, तर तो होता आपल्या स्वाभिमानाचा हुंकार. हा हुंकार साऱ्या जगाला सांगत आहे की, हिंदू धर्म हा कधीही संपणारा नाही. तो त्या अक्षय वटासारखा आहे, जो प्रत्येक संकटातून अधिक जोमाने उभा राहतो. घरवापसीचा हा सोहळा एका नवीन पहाटेची सुरुवात आहे. जर आपण संघटित झालो आणि आपल्या बांधवांना प्रेमाने जवळ केले, तर कोणतीही शक्ती आपल्याला आपल्या मुळांपासून तोडू शकणार नाही. हिंदू धर्म हा त्या विशाल महासागरासारखा आहे, ज्यात अनेक नद्या येऊन मिळतात. या महासागराची खोली आणि त्याचे गांभीर्य समजून घेण्याची आज गरज आहे. या हिंदू धर्मावर तुमचाही अधिकार आहे बंधू आणि भगिनींनो... हा रुसवा सोडा आणि या विशाल वृक्षाच्या आश्रयाला या... या चिमण्यांनो, परत फिरा रे...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

नीलेश जोशी

# विद्यार्थ्यांमधील वाढते व्यसन चिंताजनक

एकीकडे जगात सर्वाधिक तरुणाई आपल्या देशात असल्याचा अभिमान बाळगत असतानाच दुसरीकडे उद्याचे भविष्य म्हणविल्या जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढती व्यसनाधीनतेची समस्या चिंताजनक आहे. यासंदर्भात प्रचार माध्यमातून समोर येणारे काही वृत्त हे मतिगुंग करणारे आहेत. छत्तीसगढ राज्यातील धमतरी जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत तब्बल ३५ मुलांनी मनगटावर ब्लेड मारून स्वतःला जखमी करून घेतले. या घटनेने तेथे एकच खळबळ उडाली. शासकीय यंत्रणा या संदर्भात तपास करीत आहे. याबाबत येथील गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मुलांनी हा प्रकार ड्रग्ज सेवनाच्या प्रभावाखाली येऊन केला असावा, असा संशय व्यक्त केला आणि पुन्हा शालेय विद्यार्थ्यांमधील व्यसनाधीतनेची चर्चा सुरू झाली. ही घटना छत्तीसगढ राज्यातील असली, तरी देशात सर्वदूर ही समस्या आहे. गत ऑगस्ट महिन्यात पुण्यातील हडपसर परिसरात असलेल्या शाळेत असाच प'कार उघडकीस आला होता. चौथी ते सातव्या इयत्तेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये चॉकलेटच्या माध्यमातून अमली पदार्थ पोहोचविल्या जात असल्याचे तेव्हा उघडकीस आले होते. या गंभीर समस्येची व्याप्ती निश्चितच मोठी आहे. त्याच्या मुळाशी जाऊन व्यसनाधीनतेचे निर्मूलन करणे अत्यावश्यक आहे. कारण देशाचे भविष्य असणारी पुढची पिढीच संकटात आहे. ही समस्या केवळ शहरापुरती मर्यादित नाही; ग'ामीण भागातही ती झपाट्याने वाढताना दिसते. शाळेच्या गणवेशात असलेली मुले जर शाळेच्या बाहेर सिगारेट ओढताना किंवा गुटखा खाताना दिसली, तर तो समाजासाठी निश्चितच धोक्याचा इशारा म्हणावा लागेल.



शाळकरी विद्यार्थ्यांमधील व्यसनांच्या विळ'याची आकडेवारी धक्कादायक आहे. गत काळात एका सामाजिक संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात १०-१४ वयोगटातील सुमारे दोन कोटी शालेय विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनाच्या आहारी गेल्याचे समोर आले. याच सर्वेक्षणानुसार तब्बल साडेपाच हजार विद्यार्थी दररोज या व्यसनाला बळी पडतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण सुमारे साडेआठ टक्के आहे. सातवा वाढदिवस साजरा करण्यापूर्वीच ११.४ टक्के मुले धूम'पान करतात तर २४ टक्के तंबाखूजन्य पदार्थाच्या आहारी जातात. आतातर तंबाखूपेक्षा धोकादायक असणाऱ्या अमली पदार्थाचे सेवन करण्याचे आकर्षण विद्यार्थ्यांमध्ये वाढत आहे. सिगारेट, हुक्का पार्लर, ई-सिगारेट हा तारुण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्यांसाठी प्रतिष्ठेचे ठरत आहे. यात मुलांसोबतच मुलींची सं'या चिंताजनक असल्याचे दिसून येते.

खरं म्हणजे या आणि अशा प्रकारच्या अनेक समस्यांना बदलती कुटुंब व्यवस्था कारणीभूत आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. समाजामध्ये 'मी आणि माझे' हा बळावत असलेला संकुचित विचार, स्वकेंद्रित मानसिकता, पाश्चात्यांचे अंधानुकरण आणि भौतिक सुखांचा हव्यास यामुळे आपल्या संस्कृतीचे बलस्थान असलेली कुटुंब व्यवस्था गतीने बदलत आहे आणि या नकोशा बदलामुळे नवनवीन समस्या सामोरे येत आहे. वास्तविक कुटुंब व्यवस्थेतून होणारी जीवनमूल्यांची रुजवण, नकळत मिळणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. दुर्दैवाने कुटुंब व्यवस्थेची, त्यातून मिळणाऱ्या संस्कारांची वीण सैल होत असल्याचे चित्र आहे. या समस्येवर केवळ चर्चा करून व केवळ विचार व्यक्त करून उपाय मिळणार नाही. त्यासाठी आपल्या सर्व परिवारांना, समाजातल्या प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी व विशेषतः आई-वडिलांनी आपल्या पूर्वापार परंपरा, रूढी, सणोत्सव यांना प्राधान्य दिले पाहिजे. आपले पूर्वीचे जीवन जसे बाळबोध म्हटले जात होते ते संस्काराचे केंद्र होते. यातून जी पिढी तेव्हा पुढे आली तेव्हा त्यात महान विचारक, समाजसेवक असे अनेक क्षेत्रातील धुरिण निर्माण झालेत. घराघरांतून होणारे संस्कार लुप्त झाल्याने व्यसनाधीनतेसह अनेक समस्या निर्माण होत आहेत. यावर मात करण्यासाठी कुटुंब व्यवस्था पुन्हा संस्कार आणि संवादक्षम व्हावी.

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# कुर्बानी कोण देणार?

लोकसभा असो किंवा विधानसभा, राज्यसभा असो किंवा विधान परिषद या निवडणुकांची चाहुल लागली की, महाराष्ट्रातील राजकारणात वेगळाच सळसळाट उसळतो. त्याचाच प्रत्यय आता भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी राज्यसभेच्या निवडणुकांची तारीख जाहीर करताच महाविकास आघाडीच्या तंबूत बघायला मिळत आहे. महाराष्ट्रातून सात जागांसाठी निवडणूक होत असली, तरी महाविकास आघाडीच्या संख्याबळानुसार त्यांच्या वाट्याला प्रत्यक्षात एकच जागा निश्चित मानली जात आहे; आणि तिथूनच सुरू होतो तो प्रश्न 'कुर्बानी नेमकी कोण देणार?' कोणासाठी? आणि कशासाठी?

माढा निवडणुकीत आपली आता ही शेवटची निवडणूक म्हणून जाहीर करणारे शरद पवार राजकारणातून निवृत्ती घेतील, मार्गदर्शक म्हणून काम करतील अशी अपेक्षा होती. शरद पवारांचे पुतणे दिवंगत नेते अजित पवार यांची तशीच इच्छा होती. त्यांची ही इच्छा पूर्ण न होताच ते आपल्यातून निघूनही गेलेत. मात्र, शरद पवारांची इच्छा काही संपता संपेना झाली आहे. यावेळी पुन्हा शरद पवार यांनी राज्यसभेत जाण्याची स्वतः इच्छा व्यक्त करून, केवळ राजकीय वर्तुळात नव्हे, तर मविआत खळबळ उडवून दिली आहे. बरं, पवारांनी आपली इच्छा कोणाच्या तोंडून व्यक्त केली, तर संजय राऊत यांच्या... उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी पवारांनी स्वतः राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केल्याचा दावा करीत या चर्चेला अधिकृत स्वरूप दिलं. देशाला अनुभवी नेतृत्वाची गरज आहे, असा मुद्दा पुढे केला गेला. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी, मराठी माणसाचा आवाज संसदेत जोरकसपणे मांडण्यासाठी शरद पवारांचं राज्यसभेत जाणं महत्त्वाचं असल्याचं संजय राऊत म्हणत आहेत. मात्र, ८५ वर्षांच्या थकलेल्या, गंभीर आजारामुळे बोलण्याची थोडी अडचण असणाऱ्या व्यक्तीपेक्षा एखाद्या तरुण नेत्याला, उमेदवाराला जर संधी दिली तर तो मराठीचा आवाज अधिक जोरकसपणे मांडेल, असे राऊतांना का वाटू नये? की, उबाठा आणि शरद पवारांच्या पक्षात दुसरा कोणताही मराठी नेता, तरुण सक्षम नाही, असे राऊतांना सुचवायचे आहे का? एकही मराठी माणूस लायक नसल्यामुळेच मागील वेळी प्रियांका चतुर्वेदी या हिंदी महिलेला राज्यसभेवर पाठविले होते का? हे देखील गंभीर प्रश्न राऊतांच्या या भूमिकेमुळे निर्माण झाले आहेत.



**विधान परिषद : सत्तेचा दुसरा दरवाजा आणि बेगमी**

मे महिन्यात विधान परिषदेच्या काही जागा रिक्त होत आहेत. त्यात उद्धव ठाकरे हेदेखील निवृत्त होत आहेत. त्यामुळे ठाकरे पुन्हा विधान परिषदेत जावेत, अशी उबाठा गटातील अनेकांची इच्छा आहे. पक्षप्रमुख म्हणून विधिमंडळात त्यांची उपस्थिती आवश्यक असल्याचा दावाही संजय राऊतांनीच केला आहे. राऊतांचा हा दावा म्हणजे सरळसरळ सौदेबाजीचेच संकेत होय. अर्थात शरद पवार राज्यसभेला आणि ठाकरे विधान परिषदेला, अशी ही राजकीय बेगमी केली जात असल्याचं स्पष्ट होत आहे. पण या व्यवहारात काँग्रेस कुठे आहे? मविआतील दोन पक्षांनी आपआपला स्वार्थ साधला, तोदेखील काँग्रेसला न विचारता, काँग्रेसच्याच जिवावर स्वतः निर्णय घेऊन दोघेही मोकळे झाले आहेत.

महाविकास आघाडीत काँग्रेस हा तिसरा, पण निर्णायक घटक आहे. संख्याबळानुसार दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेली काँग्रेस यावेळी गप्प बसण्याच्या मनस्थितीत नाही. काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसने विलीनीकरणाच्या चर्चांबाबत भूमिका स्पष्ट करावी आणि राज्यसभा किंवा विधान परिषद, यापैकी किमान एक जागा काँग्रेसला द्यावी, अशी भूमिका घेतली जात आहे. हा केवळ दबावाचा डाव आहे की प्रत्यक्षात पर्याय उभा करण्याची तयारी, हे अद्याप स्पष्ट नाही. एवढं मात्र नक्की, यावेळी काँग्रेस स्वतःला केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेत ठेवणार नाही आणि या दोघांच्या दबावतंत्राला बळी पडणार नाही. राजकारणात विचारधारा असते, पण राजकीय गणित अर्थात व्यवहारदेखील असतं. पवार दिल्लीला गेले, तर ठाकरे विधान परिषदेत हा 'पॅकेज डील' काँग्रेसला कितपत मान्य होईल? यातून काँग्रेसला काय फायदा होईल? हे यावेळी काँग्रेस बारकाईने बघणार, काँग्रेसची भूमिका येथे निर्णायक दिसत आहे. कारण 'एक जागा' या मर्यादेमुळे कोणाचंही स्वप्न दुसऱ्याच्या त्यागावर उभं राहणार आहे. त्यामुळं आता विचारधारा आणि व्यवहार दोन्हीचा कस लागणार आहे.

**'कुर्बानी' की 'कुशल डाव?'**

राजकारणात त्याग ही संकल्पना भाषणात शोभते. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक पक्ष आपला राजकीय स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नात असतो. उबाठाचं म्हणणं, संख्याबळ आमचं सर्वाधिक. राष्ट्रवादीचा युक्तिवाद, आमचं नेतृत्व राष्ट्रीय पातळीचं. काँग्रेसचा सवाल, आमचा वाटा काय? काँग्रेसला या समीकरणात समाधानकारक पर्याय द्यावा लागेल. अन्यथा शेवटच्या क्षणी वेगळं गणित उभं राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या तिघांच्या तिढ्यातून मार्ग काढणं सोपं नाही. कारण इथे केवळ एक जागेचा प्रश्न नाही तर इथे सगळे भविष्यातील आपली राजकीय गुंतवणूक बघत, फायदा बघत आहेत. राज्यसभेवर जाणं म्हणजे राष्ट्रीय राजकारणात स्थान. विधान परिषद म्हणजे राज्याच्या राजकारणात प्रभाव. दोन्ही पदं महत्त्वाची. त्यामुळे दोन्हीवर दावा करणं स्वाभाविक. पण मविआतील तीन पक्षांपैकी दोघांचा यात लाभ दिसत आहे. तिसऱ्याच पक्षाचं काय? आता काँग्रेसने चंद्रपूरची घटना विसरून परभणीत उबाठाला समर्थन देत ज्याप्रमाणे कुर्बानी दिली होती, त्याचप्रमाणे काँग्रेस पुन्हा 'कुर्बानी' देते की 'कुशल डाव' खेळते? हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. काँग्रेसने जर राज्यसभेसाठी स्वतःचा उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला, तर महाविकास आघाडीत तणाव निर्माण होऊ शकतो आणि जर राष्ट्रवादीला बाजूला ठेवून काँग्रेस-शिवसेना एकत्र आली, तर तेही वेगळं चित्र उभं होईल. म्हणजेच आघाडीत एकमताचा दावा असला, तरी प्रत्यक्षात ज्याप्रमाणे उबाठाने काँग्रेसला सोडून मुंबई पालिका निवडणूक मनसेसोबत लढली, त्याचप्रमाणे काँग्रेसकडेही अनेक पर्याय खुले आहेत. कारण काँग्रेससाठी ही निवडणूक केवळ एका जागेची नाही तर आघाडीतल्या प्रभावाची आणि राजकारणातल्या अस्तित्वाची आहे. राजकारणात शेवटच्या क्षणी समीकरणं बदलण्याची परंपरा आपल्याला आता काही नवीन राहिलेली नाही.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### सकारात्मक विचार करून परीक्षा द्या

दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारीपासून सुरू होत असून ती १८ मार्चपर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षा ११ मार्चपर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्त्वाच्या असतात. दहावी-बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करीअरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्त्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेव्हा परीक्षा जवळ येते तेव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. मात्र, या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे गरजेचे आहे. नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न राहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घ्यावा. मित्रांशी अन्य विषयांवर चर्चा करावी, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. घरी बनवलेलेच जेवण वेळेवर करावे. पालकांनीही या काळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. विद्यार्थी परीक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल.

**श्याम ठाणेदार**

### शिवचरित्राने डोळे उघडले पाहिजे

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र म्हणजे कर्मयोगी तत्त्वज्ञानाचा जिवंत साक्षात्कार आहे. राष्ट्रधर्माचे आणि समाजधारणेचे महान तत्त्वज्ञान आहे. हे चरित्र केवळ एका व्यक्तीचे नाही तर ते हिंदवी स्वराज्यचे आणि हिंदवी समाजाचे चरित्र आहे. ज्यांना आपले राष्ट्र सार्वभौम, सामर्थ्यशाली, समृद्ध आणि अजिंक्य बनवायचे असेल त्यांनी ते हृदयात जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदुत्वाचा अभिमान होता. आपला धर्म, आपले स्वराज्य, आपली संस्कृती याचे रक्षण हा त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या अनेक उद्धेशापैकी एक होता. म्हणूनच शिवचरित्राचा आदर्श आमच्या डोळ्यापुढे डोळसपणे ठेवला पाहिजे. या तेजस्वी चरित्राने आमचे केवळ डोळे दिपता कामा नयेत, ते उघडले गेले पाहिजे असे म्हणावे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**

### डिलिव्हरी बॉईजच्या मागण्यांची पूर्तता करा



ऑनलाईन खरेदीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. घरबसल्या वस्तू खरेदी करून खरेदीची हौस जिरविणाऱ्यांची संख्या सतत वाढतच आहे. त्यातच खाद्यपदार्थ मागवण्याचा प्रकारही शहरी भागात लोकप्रिय आहे. त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्या सेवा पुरवीत असतात. त्यात वरचेवर स्पर्धादेखील वाढत चालली आहे. अशा डिलिव्हरी बॉईजना गिग वर्कर्स म्हटले जाते. त्यांच्या हक्क-अधिकारांचा विचार सध्या कुणीच करायला तयार नाही. खाद्यपदार्थांची ने-आण वेळेवर व्हावी यासाठी हे तरुण कामगार कायम धडपड करीत असतात. महानगरांमधील धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनात प्रत्येकासाठी वेळ अतिशय महत्त्वाचा असतो. कशाचीही तमा न बाळगता हे डिलिव्हरी बॉईज वर्कर्स आपले काम इमाने-इतबारे करीत असतात. वेळ वाचावा म्हणून ते प्रसंगी वाहतुकीचे नियमही पाळत नाहीत. अतिशय घाईमध्ये ऑर्डर वेळेत पोहोचविण्याची त्यांची लगबग असते. एखाद्या वेळेस उशीर झाल्यास ग्राहकांची बोलणीदेखील खावी लागतात. त्यामुळेच त्यांना धावाधाव करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. खाद्यपदार्थ गरम असेल तर त्यांच्या धावपळीचे चीज होते. अन्यथा कंपनीकडूनदेखील त्यांच्यावर दंड ठोठावला जातो. अलिकडेच देशातील लाखो डिलिव्हरी बॉईजनी आपल्या प्रमुख मागण्यांसाठी संप पुकारला होता. सध्या देशात सव्वा कोटी डिलिव्हरी बॉईज या क्षेत्रात असल्याची आकडेवारी प्रसिद्ध झाली. या व्यवसायाची व्याप्ती वाढतच चालली असल्यामुळे डिलिव्हरी बॉईज यांचे महत्त्व वाढत आहे. मात्र, त्यांना मिळणारी वागणूक आणि मोबदला यावर सरकारकडून विशेष लक्ष दिले जाण्याची गरज आहे. नोकरीची शाश्वती, डिलिव्हरी पोच करण्याची वेळ वाढावी, किमान वेतन मिळावे तसेच कामाची वेळ आठ तासांची करावी इत्यादी मागण्यांवर सकारात्मक दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com



# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### क्रिकेटपटू चहरने केली घटस्फोटाची घोषणा

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेटपटू राहुल चहरने पत्नी इशानी जोहरपासून वेगळे होण्याची घोषणा केली आहे. राहुल चहरने आपल्या समाज माध्यम हॅण्डलवर ही घोषणा केली.



मी आपल्या आयुष्यातील १५ महिने कोर्टरूममध्ये आपले सत्य सांगण्यासाठी भटकत होतो, असे त्याने स्पष्ट केले. राजस्थानकडून देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणारा आणि इंडियन प्रीमियर लीगमध्ये तीन फ्रॅन्चायझी - पंजाब किंग्ज, मुंबई इंडियन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि रायझिंग पुणे सुपरजायंट - यांचे प्रतिनिधित्व करणारा २६ वर्षीय लेग स्पिनर २०१९ मध्ये जयपूरमध्ये एका जिव्हाळ्याच्या समारंभात इशानीशी विवाहबद्ध झाला. तीन वर्षांनंतर या जोडप्याने ९ मार्च २०२२ रोजी गोव्यात डेस्टिनेशन वेडिंगमध्ये लग्न केले. एका लांबलचक पोस्टमध्ये, राहुल चहरने म्हटले की, मी स्वतःला पूर्णपणे समजून घेण्यापूर्वीच लहान वयात लग्न केले होते. त्यानंतर मला असे अनेक वर्षे धडे मिळाले ज्यांची मी कधीच अपेक्षा केली नव्हती, आणि गेल्या पंधरा महिन्यांत मी न्यायालयीन कोठडीत फिरत होतो, असे त्याने लिहिले.

### पाकिस्तान सरकारने हॉकी कर्णधार बटची बंदी उठविली

**लाहोर** : पाकिस्तान सरकारने शुक्रवारी राष्ट्रीय हॉकी संघाचा कर्णधार अम्मद शकील बटवर राष्ट्रीय महासंघाने (पीएचएफ) लादलेली दोन वर्षांची बंदी रद्द केली आणि हे पाऊल 'बेकायदेशीर आणि असंवैधानिक' असल्याचे म्हटले. गुरुवारी पाकिस्तान हॉकी महासंघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यापूर्वी, तारिक बुगटी यांनी अलिकडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील गैरव्यवस्थापनाबद्दल कर्णधाराने केलेल्या नाराजीनंतर पीएचएफवर टीका केल्याबद्दल बटवर दोन वर्षांची बंदी घातली. पण पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी नियुक्त केलेले पीएचएफचे अंतरिम अध्यक्ष मुहुयदीन अहमद वाणी यांनी हा निर्णय मागे घेतला आणि बुगटी यांनी हे 'बेकायदेशीर आणि असंवैधानिक पाऊल' असल्याचे म्हटले.

### भारताची सर्वोत्तम कामगिरी अजून शिल्लक : बांगर

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाने सध्या सुरू असलेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये अद्याप उच्चांक गाठलेला नाही. भारताची गट साखळी फेरीत अपराजित कामगिरी वर्चस्व गाजवण्याऐवजी स्थिर राहिली आहे. स्पर्धेच्या कठीण टप्प्यात संघाचे सर्वोत्तम क्रिकेट अजूनही येणे शिल्लक आहे, असा विश्वास भारतीय संघाचे माजी फलंदाज आणि तज्ज्ञ संजय बांगर यांनी व्यक्त केला. ही एक स्थिर सुरुवात आहे. आम्हाला अपेक्षित असलेली कामगिरी तशी नाही, कारण अपेक्षा गगनाला भिडल्या आहे. तथापि, चांगली गोष्ट म्हणजे भारतीय संघाचे सर्वोत्तम कामगिरी अजून येणे शिल्लक आहे, असे बांगर यांनी सांगितले. आणखी एक सकारात्मक बाब म्हणजे सर्व खेळाडूंना अंतिम संघात स्थान मिळण्याची संधी मिळाली आहे. सर्व खेळाडू सामन्यासाठी सज्ज आहेत, असे ते म्हणाले.

### अफगाणिस्तानचे प्रशिक्षक ट्रॉट यांचा कार्यकाळ संपला

**चेन्नई** : २०२६ च्या टी-२० विश्वचषकातील अफगाणिस्तानचा शेवटचा गट साखळी सामना संपताच प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांचा प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपला. चेन्नईमध्ये कॅनडाविरुद्ध ८२ धावांनी प्रभावी विजय मिळवूनही संघ आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकातून बाहेर पडला तेव्हा ट्रॉटचा अफगाणिस्तानच्या प्रभारी कार्यकाळ संपला. २०२२ मध्ये अफगाणिस्तान राष्ट्रीय संघाची जबाबदारी स्वीकारल्यापासून, ट्रॉटने गत काही वर्षांपासून खेळाडूंना जवळून सहकार्य केले आहे तसेच संघाच्या प्रगतीमध्ये आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### दृष्टिहिनांच्या क्रिकेटसाठी बीसीसीआयचा पाठिंबा

**बंगळुरू** : जागतिक स्तरावर दृष्टिहिन क्रिकेटपटूंच्या विकासासाठी ऐतिहासिक वचनबद्धतेबद्दल क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे मनापासून कौतुक केले आहे. गत दशकात, भारताच्या दृष्टिहिन क्रिकेटपटूंनी जागतिक स्तरावर एक असाधारण वारसा स्थापित केला आहे. २०१२ पासून अनेक पुरुष विश्वचषक विजेतेपद जिंकले आहेत आणि ऐतिहासिक पहिला महिला विश्वचषक विजय मिळवला आहे. बीसीसीआयच्या औपचारिक पाठिंब्यामुळे आता हे यश केवळ साजरे केले जात नाही तर सर्वोच्च स्तरावर संरचित पाठिंब्याद्वारे टिकवून ठेवले जाते आणि उंचावले जाते. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांच्या नेतृत्वाखालील रचनात्मक चर्चेच्या मालिकेनंतर हा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

# विश्वचषकाच्या सुपर एट फेरीत दिग्गज संघ झुंजणार

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**



आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषका क्रिकेट स्पर्धेच्या १० व्या आवृत्तीत आता सर्वात आकर्षक अध्याय- सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे. काही आठवड्यांच्या हाय व्होल्टेज स्पर्धा, निसटता पराभव आणि प्रमुख संघांना धक्का देणारे उलटफेर नंतर, २० संघांची ही लढाई आता अंतिम आठ दावेदारांमध्ये पोहोचली आहे.

२१ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान, दोन तीव्र स्पर्धात्मक गटांमध्ये एकाच राऊंड-रॉबिन लढाईत उपांत्य फेरीत स्थान मिळविण्याची शर्यत तीव्र होईल.

कोलंबो येथे होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट फेरीच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानचा सामना न्यूझीलंडशी होईल, तर २०२४ च्या रोमांचक जेतेपद निर्णायक सामन्याच्य पुनरावृत्तीमध्ये गतविजेत्या भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल.

आठ पूर्व-मानांकित संघांपैकी सात संघांनी प्रगती करून आपल्या क्रमवारीला न्याय दिला आहे, परंतु या टप्प्यात एक धक्कादायक अंडरडॉग सुद्धा आहे. झिम्बाब्वेने निर्भय मोहिमेसह अव्वल संघांच्या गटात प्रवेश केला.

**गट १ : भारत, झिम्बाब्वे, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका**

सह-यजमान भारत गट १ मध्ये आघाडीवर आहे व गटातील इतर दोन अव्वल संघांशी नेहमीच धोकादायक वेस्ट इंडीज क्रिकेट संघ व पुनरुज्जीवित दक्षिण आफ्रिका राष्ट्रीय क्रिकेट संघाशी सामना करेल.

स्पर्धेपूर्वीच्या पसंतीच्या ऑस्ट्रेलियाची जागा घेणाऱ्या झिम्बाब्वेने चौथ्या फेरीत स्थान मिळविले. सुपर एटमध्ये गती आणि विश्वासावर स्वार होऊन झिम्बाब्वे स्पर्धेचे आश्चर्यकारक पॅकेज म्हणून उदयास आले आहे. त्यांच्या निर्भय क्रिकेट ब्रॅण्डला आता सर्वात कठोर परीक्षेला सामोरे जावे लागत आहे.

२२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये होणारा भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना चुरशीचा होण्याची शक्यता आहे, तर १ मार्च रोजी कोलकाता येथे होणाऱ्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्यात उपांत्य फेरीचे भवितव्य निश्चित होऊ शकते.

**गट २ : जुने प्रतिस्पर्धी, नवीन दावे - पाकिस्तान, श्रीलंका, इंग्लंड, न्यूझीलंड.**

जर गट १ हा शक्ती आणि अनिश्चिततेचा असेल, तर गट २ स्पर्धा आणि वंशावळीने भरलेला आहे. पाकिस्तानचा राष्ट्रीय क्रिकेट संघ दोन वेळा विजेता (२०१० आणि २०२२) इंग्लंड, बारमाही डार्क हॉर्स न्यूझीलंड आणि नवोदित श्रीलंका यांच्यासोबत जागा सामायिक करतो.

२१ फेब्रुवारी रोजी सुपर ८ च्या सुरुवातीपासून, न्यूझीलंड आणि पाकिस्तान कोलंबोमध्ये रंगतदार सूर लावतील. इंग्लंड आणि श्रीलंका एक दिवसानंतर कॅण्डीमध्ये पुन्हा शत्रुत्वाची सुरुवात करतील, तर २४ फेब्रुवारी रोजी इंग्लंड आणि पाकिस्तानचा सामना गटाच्या निर्णायक सामन्यात ब्लॉकबस्टर म्हणून वाटेल.

**फॉरमॅट : दुसरी संधी नाही**

प्रत्येक गट एकाच राऊंड-रॉबिन स्वरूपात खेळेल, म्हणजे प्रत्येक संघाला तीन सामने मिळतील. प्रत्येक गटातील केवळ दोन अव्वल संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

गती, नेट रन रेट आणि दबावाखालील स्वभाव हे निर्णायक ठरतील. महत्त्वाकांक्षा आणि बाद फेरी यांच्यातील फरक केवळ एका आठवड्याच्या खेळामुळे, प्रत्येक षटक स्पर्धेचे चित्र बदलू शकते.

सुपर ८ फेरीचे सामने नरेंद्र मोदी स्टेडियम, आर. प्रेमदासा स्टेडियम, पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, ईडन गार्डन्स, वानखेडे स्टेडियम, एम. ए. चिदम्बरम स्टेडियम आणि अरुण जेटली स्टेडियम येथे खेळले जाणार आहे.

**सुपर एट फेरीचे वेळापत्रक**

२१ फेब्रुवारी- सायं. ७.०० वा., कोलंबो - पाकिस्तान वि. न्यूझीलंड,
२२ फेब्रुवारी- दुपारी ३.०० वा., पल्लेकेले - श्रीलंका वि. इंग्लंड
२२ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., अहमदाबाद- भारत वि. दक्षिण आफ्रिका
२३ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., मुंबई- झिम्बाब्वे वि. वेस्ट इंडीज
२४ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., पल्लेकेले- इंग्लंड वि. पाकिस्तान
२५ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., कोलंबो- श्रीलंका वि. न्यूझीलंड
२६ फेब्रुवारी, दुपारी ३.०० वा., अहमदाबाद- वेस्ट इंडीज वि. द.आफ्रिका
२६ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., चेन्नई- भारत वि. झिम्बाब्वे
२७ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., कोलंबो- इंग्लंड वि. न्यूझीलंड
२८ फेब्रुवारी, सायं. ७.०० वा., पल्लेकेले- श्रीलंका वि. पाकिस्तान
१ मार्च, दुपारी ३.०० वा., दिल्ली - झिम्बाब्वे वि. दक्षिण आफ्रिका
१ मार्च, सायं. ७.०० वा., कोलकाता- भारत वि. वेस्ट इंडीज

# न्यूझीलंडचे पाकिस्तानला रोखण्याचे लक्ष्य


◆ **कोलंबो, २० फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी येथे सुपर एट फेरीत गट २ मधील पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान खेळला जाणार आहे. न्यूझीलंडने पाकिस्तानच्या फिरकी गोलंदाजांना रोखण्याचे लक्ष्य ठेवले आहे. पाकिस्तानच्या चातुर्य व विविधतेचा सामना करताना न्यूझीलंडच्या मधल्या फळीची मजबूत प्रत्युत्तर देण्याची क्षमता महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आयसीसीच्या टी-२० विश्वचषकात सलामीवीर टिम सेफर्ट व फिन ॲलन वगळता न्यूझीलंडच्या फलंदाजांनी अद्याप तडाखेबंद फलंदाजी केलेली नाही. सेफर्ट व ॲलनने तीन अर्धशतके झळकावली आहेत, परंतु त्यांचे मधल्या फळीतील सहकारी त्यांना पुरेसे सहकार्य करू शकले नाहीत. ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मार्क चॅपमन व डॅरिल मिशेल सारखे खेळाडू सातत्य राखण्यासाठी संघर्ष करत आहेत. फिलिप्स व रवींद्रने प्रत्येकी अर्धशतक ठोकले आहेत. त्यांच्याकडूनही खूप आशा आहे. चार सामन्यांमधून रवींद्रने ७२ धावा केल्या आहेत व यात ५९ धावा कॅनडाविरुद्धच्या एकाच सामन्यात झाल्या आहेत. या स्पर्धेत न्यूझीलंड



सलमान आगा



मिचेल सॅण्टनर

पहिल्यांदाच कोलंबोमध्ये खेळणार असल्याने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होते.

याउलट, पाकिस्तान विश्वचषकाच्या सुरुवातीपासूनच कोलंबो शहरात दाखल झालेले आहे व त्यांनी प्रेमदासा येथे आधीच दोन सामने खेळले आहेत.

पाकिस्तानचे गोलंदाज, विशेषतः फिरकीपटू, या संथ खेळपट्टीवर प्रभावी होण्यासाठी आवश्यक असलेला वेग व लांबी जाणतात. या खेळपट्टीवर फटकेबाजी करण्यापेक्षा सावधगिरीची आवश्यकता असते.

म्हणून, न्यूझीलंडच्या मधल्या फळीने ॲलन व सेफर्टच्या पॉवरप्ले स्फोटकतेला पाठिंबा दिला पाहिजे. त्यामुळे त्यांचा संघ सुमारे १८० धावांपर्यंत पोहोचू शकेल किंवा त्या परिसरात लक्ष्याचा पाठलाग करताना दिसेल.

उस्मान तारिक, अबरार अहमद, सैम अयुब, मोहम्मद नवाज व शादाब खान सारखे फिरकी गोलंदाज पाकिस्तानला एक वेगळी धार देतात, परंतु फलंदाजीत त्यांच्याही स्वतःच्या चिंता आहेत.

स्पर्धेतील सध्याचा अव्वल धावपटू साहिबजादा फरहान (२२०) नंतर शादाब खान (८८) हा त्यांचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे.

पाकिस्तानच्या फलंदाजांना न्यूझीलंडसारख्या अनुभवी संघाविरुद्ध मोठे सामूहिक योगदान द्यावे लागेल.

माजी कर्णधार बाबर आझम आधुनिक टी-२० फलंदाजीच्या गरजा पूर्ण करण्यास संघर्ष करत आहे. जर बाबर पुन्हा एकदा अडखळला तर संघ व्यवस्थापन फखर झमान सारख्या खेळाडूला संघात आणू शकते. ते डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदीचा समावेश करण्यावरही विचार करतील.

**आजचा सुपर-८ सामना**

**पाकिस्तान वि. न्यूझीलंड**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**ऑनलाईन तभा वाचण्यासाठी**
**www.tarunbharat.net**
**वर भेट द्या!**

# भारत अ संघाची अंतिम फेरीत धडक

## महिला रायझिंग स्टार्स आशिया चषक ● राधाची चमकदार अष्टपैलू कामगिरी

◆ **बँकॉक, २० फेब्रुवारी**

कर्णधार राधा यादवने केलेल्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या बळावर भारत अ संघाने शुक्रवारी येथे श्रीलंका अ संघावर ५ गड्यांनी विजय नोंदवित महिला रायझिंग स्टार्स टी-२० आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

श्रीलंकेने नाणेफेक जिंकल्यानंतर फलंदाजीचा निर्णय घेतला, परंतु हा निर्णय जबरदस्त उलटा ठरला. राधाच्या नेतृत्वाखालील भारतीय गोलंदाजांनी श्रीलंका संघाला ११८ धावांत गुंडाळले. डावखुरा फिरकीपटू राधाने १९ धावांत ४ बळी घेतेले, तिला डावखुरा फिरकीपटू तनुजा कंवर (२० धावांत २ बळी) आणि लेग-स्पिनर प्रेमा रावतने (९ धावांत २ बळी) चांगली साथ दिली.



संघातील खेळाडूंसोबत विजयाचा आनंद साजरा करताना राधा यादव

भारत अ महिला संघाने १३.३ षटकांत ५ गडी गमावित ११९ धावांचे लक्ष्य गाठले. वृंदा दिनेशने ४२ धावांची, तर राधा यादवने नाबाद ३१ धावांची विजयी खेळी केली.

श्रीलंकेसाठी, सलामीवीर संजना कविंदी (३१, ३५ चेंडू) हिने प्रतीकात्मक लढत दिली. १० व्या षटकांत श्रीलंकेची स्थिती २ बाद ७१ अशी होती पण त्या क्षणापासून त्यांना भारतीय फिरकी गोलंदाजांचा सामना करता आला नाही. त्यांनी उर्वरित आठ फलंदाज नऊ षटकांत ४७ धावांत गमावले.पाठलाग करताना भारताला फारसे चिंता वाटली नाही. वृंदा दिनेशने सर्वाधिक ४२ धावांचे योगदान दिले. राधाने १८ चेंडूंत ७ चौकारांसह नाबाद ३१ धावांची खेळी करत भारताला १३.३ षटकांतच विजय मिळवून दिला.

अंतिम फेरीत, भारताचा सामना बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यादरम्यानच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजेत्याशी होईल.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिका विजयासाठी भारत उत्सुक

## तिसरा महिला टी-२० सामना आज

◆ **ॲडलेड, २० फेब्रुवारी**

शनिवारी येथे होणाऱ्या तिसऱ्या आणि शेवटच्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अनुभवी ऑस्ट्रेलियन गोलंदाजांविरुद्ध भारताच्या दिग्गज फलंदाजांना एकत्रितपणे आक्रमक खेळ करावा लागणार आहे.

भूतकाळात काही विजय मिळवूनही, भारतीय महिलांनी ऑस्ट्रेलियात तिन्ही स्वरूपात द्विपक्षीय मालिका विजय मिळवलेला नाही. हे चित्र बदलण्यासाठी, भारताला येथे चांगल्या फलंदाजी प्रयत्नांची आवश्यकता आहे आणि त्याची सुरुवात सलामीवीर स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांच्याकडून होणे अपेक्षित आहे. स्मृती आणि शेफाली दोघींनाही सुरुवात मिळाली, पण त्यांना मोठ्या खेळीत रुपांतर करण्यात अपयश आले, त्यामुळे दुसऱ्या सामन्यात भारताच्या १६४ धावांच्या तुलनेने सोप्या पाठलागात अडथळा निर्माण झाला. किम गार्थ, ॲनाबेल सदरलँड आणि सोफी मोलिनेक्स या अनुभवी ऑस्ट्रेलियन त्रिकुटाने त्या सलामीचा फायदा घेत केवळ सात धावांत पाच भारतीय फलंदाजांना बाद करून धूळ चारली. पण ॲडलेडची खेळपट्टी कॅनबेरा येथील खेळपट्टीपेक्षा खूपच जास्त प्रामाणिकपणा देते व भारतीय फलंदाजांना येथे आपल्या दमदार फटकेबाजीवर विश्वास ठेवता आला पाहिजे. कर्णधार हरमनप्रीत कौर, जेमिमाह रॉड्रिग्ज आणि ऋचा घोषला फटकेबाजी करायला आवडते.

रेणुका सिंग, अरुंधती रेड्डी, क्रांती गौड आणि अमनजोत कौरने भारतीय वेगवान गोलंदाजीची जबाबदारी चोखपणे बजावायला हवी, कारण ऑस्ट्रेलियन फलंदाज कोणत्याही ढिलाईचा निर्दयपणे फायदा घेऊ शकतात.

त्या संदर्भात, तरुण आणि यशस्वी जॉर्जिया वोलपेक्षा कोणीही मोठा धोका नाही. भारतीय वेगवान गोलंदाजांना व्होलला रोखावे लागेल. फिरकीपटू - दीप्ती शर्मा व श्री चरणीलाही मधल्या षटकांमध्ये खेळण्याची संधी द्यावी लागेल.

# ऑस्ट्रेलियाच्या अपयशास खेळाडू कारणीभूत

## मुख्य प्रशिक्षक ॲण्ड्र्यू मॅकडोनाल्ड

◆ **मेलबर्न, २० फेब्रुवारी**

ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक ॲण्ड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी संघाच्या अपमानास्पद टी-२० विश्वचषक स्पर्धेतील बाहेर पडण्याची जबाबदारी थेट खेळाडूंवर टाकली. ऑस्ट्रेलिया संघाच्या तयारीवरील टीका आणि संघ टी-२० क्रिकेटला गांभीर्याने घेत नसल्याचे आरोप त्यांनी फेटाळून लावले.

झिम्बाब्वे आणि श्रीलंकेविरुद्धच्या पराभवानंतर ऑस्ट्रेलिया गट टप्प्यातून बाहेर पडला, त्यामुळे घरच्या मैदानावर तीव्र नाराजी निर्माण झाली.



माजी खेळाडू आणि जाणकारांनी ऑस्ट्रेलियाच्या स्पर्धेच्या तयारीवर लक्ष केंद्रित केले आहे, यात बिग बॅश लीगला प्राधान्य दिल्यानंतर संघातील सदस्य पाकिस्तानमध्ये झालेल्या सराव मालिकेसाठी उशिरा पोहोचले.

ऑस्ट्रेलियाला पाकिस्तानकडून ३-० असा पराभव पत्करावा लागला आणि विश्वचषकाच्या सुपर एट टप्प्यात पात्रता मिळवण्यात अपयश आले.

ऑस्ट्रेलियाने स्पर्धेला प्राधान्य दिले नाही या टीकेला मॅकडोनाल्डने फेटाळून लावले. ते म्हणाले की संघ काही काळासाठी त्यात पूर्णपणे बंदिस्त होता.

मी अशा प्रकारची कथन ऐकली आहे की टी-२० विश्वचषक आमच्यासाठी महत्त्वाचे नाहीत, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

आम्ही २०२१ मध्ये जिंकलो आणि तेव्हापासून आम्हाला तेवढे यश मिळालेले नाही. ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाकडून अपेक्षा जास्त आहेत व ते योग्यच आहे. पण मागे बसून असे म्हणणे की आम्ही टी-२० विश्वचषकाला प्राधान्य देत नाही, तर खेळाच्या इतर स्वरूपांना किंवा इतर आवृत्त्यांना प्राधान्य देत आहोत हे पूर्णपणे खोटे आहे, असे ते म्हणाले.

# सुशीलच्या जामीन अर्जावर हायकोर्टाने पोलिसांची भूमिका मागितली

## छत्रसाल स्टेडियम हत्याकांड

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

माजी राष्ट्रीय कनिष्ठ गट कुस्ती विजेता सागर धनकर याच्या हत्येप्रकरणी दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता सुशील कुमार याच्या जामीन अर्जावर दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिल्ली पोलिसांची भूमिका मागितली.

न्यायाधीश अनुप जे. भांभानी यांनी दिल्ली पोलिस आणि मृताच्या नातेवाईकांना नोटीस बजावली आणि त्यांना अनुक्रमे स्थिती अहवाल आणि उत्तर दाखल करण्यास सांगितले.



गत वर्षी ऑगस्टमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कुमारला दिलेला जामीन रद्द केल्याचे लक्षात घेऊन न्यायाधीशांनी टिप्पणी केली.

खटल्यात सर्व सार्वजनिक साक्षीदारांची तपासणी झाली असल्याने जामीन अर्जावर विचार केला पाहिजे, असे आरोपींच्या वकिलांनी सांगितले.

तथापि, दिल्ली पोलिसांच्या वकिलांनी आणि मृताच्या नातेवाईकांनी सांगितले की, सर्व सार्वजनिक साक्षीदारांची तपासणी अद्याप शिल्लक आहे.

पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी स्टेटस रिपोर्ट/तपशीलवार उत्तर दाखल करावे. ४ मे रोजी पुन्हा अर्ज करावा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# माजी भारतीय क्रिकेटपटूंनी केली भविष्यवाणी

◆ **नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

शनिवारी कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात होणाऱ्या सुपर ८ फेऱ्यांपूर्वी माजी भारतीय क्रिकेटपटूंनी चालू टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या उपांत्य फेरी पोहोचणाऱ्या संघांची भविष्यवाणी केली आहे.

आठ संघांना चार संघांच्या दोन गटात स्थान देण्यात आले आहे. सर्व संघ त्यांच्या गटातील इतर संघांविरुद्ध तीन सामने खेळतील, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

भारताचा महान कसोटीपटू चेतेश्वर पुजाराने अव्वल चार संघासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि न्यूझीलंडची निवड केली आहे.

मोहम्मद कैफने पुढील टप्प्यासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडची निवड केली.

भारताचा टी-२० मध्ये सर्वाधिक बळी घेणारा फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहलने अव्वल चारमध्ये पोहोचण्यासाठी भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि न्यूझीलंडची निवड केली, तर माजी वेगवान गोलंदाज वरुण आरोनने सर्वात धाडसी निर्णय घेतला, भारत, वेस्ट इंडीज, इंग्लंड आणि पाकिस्तानची निवड केली, विशेषतः दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड दोघांनाही वगळले. माजी प्रशिक्षक संजय बांगर यांनी काही मनोरंजक निवडी केल्या, यात पाकिस्तान, भारत, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका यांचा समावेश आहे.

# जाकुब मेन्सिककडून सिनरला धक्का

◆ **दोहा, २० फेब्रुवारी**

दोहा एटीपी ५०० टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत २० वर्षीय जाकुब मेन्सिकने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या जॅनिक सिनरला पराभूत करून कतार ओपनमध्ये मोठा धक्का दिला.

मेन्सिकने सिनरचा ७-६(३), २-६, ६-३ असा पराभव केला आणि आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय मिळवला.

दोहा येथे झालेल्या टेनिस सामन्यात झेक प्रजासत्ताकच्या मेन्सिकने यापूर्वी आंद्रे रुबलेव्हविरुद्ध पहिला अव्वल ५ मधील खेळाडूवर विजय मिळवला.

२०२५ चा मियामी विजेता मेन्सिक याने आता अव्वल ५ प्रतिस्पर्ध्यांविरुद्धचा आपल्या विजयाचा रेकॉर्ड ४-२ असा केला आहे. यात एटीपी प्रथम क्रमांकाचा नोवाक जोकोविच आणि सिनरविरुद्ध विजयांचा समावेश आहे. आतापर्यंत दोहामध्ये केलेल्या कामगिरीमुळे तो एटीपी मानांकनात १३ व्या स्थानावर पोहोचला आहे, असे एटीपीच्या अहवालात म्हटले आहे.



जॅनिक सिनरला पराभवाचा धक्का देणारा जाकुब मेन्सिक

मी सामना जिंकण्यासाठी आलो होतो आणि प्रत्यक्षात जिंकण्याची मानसिकता आहे, असे मेन्सिक म्हणाला.

शुक्रवारी कतारच्या राजधानीत दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी तो प्रयत्नशील असेल, जेव्हा तो २१ वर्षीय फिल्सशी सामना करेल. फ्रान्सच्या फिल्सने जिरी लेहेकावर ६-३, ६-३ असा विजय मिळवून प्रथमच टूर-लेव्हल उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### वावद येथील के.डी.गावीत विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**नंदुरबार :** तालुक्यातील वावद येथीला के.डी.गावीत माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त 'मी छत्रपती शिवाजी महाराज बोलतोय' यावर वक्तृत्व स्पर्धा दोन गटात पार पडल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी पाटील, प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक मनोहर साळुंके होते. लहान गटात प्रथम कार्तिक पाटील, द्वितीय मानसी सामुद्रे, तृतीय देवयानी पाटील, उत्तेजनार्थ खुशी पाटील तसेच मोठ्या गटात प्रथम राकेश पाटील, द्वितीय कीर्ती पाटील, तृतीय पल्लवी पाटील, उत्तेजनार्थ माधुरी पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. अश्विनी पाटील यांनी स्पर्धा परीक्षण केले. सूत्रसंचालन महेंद्र पाटील यांनी केले. आभार प्रिती नाईक यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गोपाल शिंत्रे, नितीन पाटील, सागर पाटील, सुनित पाटील, मिनाक्षी व्यास, अश्विनी पाटील, पावबा ठाकरे, संजय पाटील, दिपक माळी यांनी परिश्रम घेतले.



### के.डी.गावीत माध्यमिक विद्यालात शिवजयंती उत्साहात

**नंदुरबार :** तालुक्यातील देवपूर येथील गावीत माध्यमिक विद्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज' जयंती उत्साहात पार पडली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज प्रश्नमंजुषा, सामान्य ज्ञान व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन व आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक आर.आर.पाटील, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षक मनोजकुमार सुर्यवंशी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रफुल्ल निकम यांनी केले. आभार अतुल पाटील यांनी मानले. संजय महाजन यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य संकल्पना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंदा वसावे, विनोद पाटील, उदय पाटील, माधुरी साठे, पुरुषोत्तम मराठे, कन्हैयालाल पाटील, कन्हैयालाल धनगर, राकेश पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप "प्रौढ प्रताप पुरंदर, क्षत्रिय कुलावंतस, सिंहासनाधिश्वर, महाराजाधिराज, योगीराज, श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज की... जय! "या जयघोषाने करीत झाला.



### नवापूर सार्वजनिक प्राथमिक शाळेत पारितोषिक वितरण

**नवापूर :** येथील सार्वजनिक मराठी प्राथमिक शाळा, डुबास बिल्डिंग, स्वामी विवेकानंद चौक, नवापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण उत्साहात पार पडले. यावेळी कार्यक्रम अध्यक्ष नवापूर एज्युकेशन सोसायटीच्या कार्याध्यक्षा शितलबेन वाणी, प्रमुख अतिथी संस्थेचे सचिव राजेंद्र अग्रवाल, सदस्य हेमंत शाह, व्यापारी नेमीचंद अग्रवाल, ॲड. नितीनकुमार देसाई, मुख्याध्यापक महेश पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. हर्ष भोई या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराजांची तर यशश्री लाड या विद्यार्थिनीने जिजामाता यांची वेशभूषा साकारली होती. आरूज पाटील व आराध्या देसाईने शिवाजी महाराजांची महिती दिली. यावेळी विविध स्पर्धेतील यशस्वी १४८ विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात येवून रांगोळी स्पर्धेतील विजेत्या तीन माता पालकांना बक्षीस देण्यात आले. ॲड. नितीनकुमार देसाई यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक महेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार उपशिक्षिका योगिता पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी योगिता पाटील, मीना तांबोळी, हेमलता पाटील, करुणा पाटील, रेसा मावची आदींनी सहकार्य केले.



### खर्दे विद्यालयात कायदेविषयक जनजागृती

**शिरपूर :** तालुका विधी सेवा समिती, शिरपूर आणि आर. सी. पटेल विद्यालय, खर्दे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयात 'किमान समान कार्यक्रम' (कॉमन मिनीमम प्रोग्राम) पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिरपूर येथील दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) तथा तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्षा पूजा ना. कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक साक्षरतेचे महत्त्व सांगून न्यायप्रणाली सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख वक्ते तथा सरकारी अभियोक्ता विधीज्ञ श्री.आर.ए.पाडवी यांनी विविध फौजदारी कायद्यांविषयी तसेच विधीज्ञ जयश्री पंचभाई यांनी दैनंदिन जीवनातील महत्त्वाचे कायदे आणि नागरिकांचे अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. या कायदेविषयक शिबिरात विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्या सूचनेनुसार राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जाणीव-जागृती निर्माण झाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयीन कर्मचारी व विधी सेवा समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



### लायन्स क्लब नंदुरबार रिजन कॉन्फरन्समध्ये पुरस्कार वितरण

**नंदुरबार :** शिवरत्न रिजन कॉन्फरन्स हॉटेल ऑर्चिड धुळे येथे झालेल्या रिजन कॉन्फरन्स मध्ये रिझन मधील सदस्य सहभागी झाले होते. यात लायन्स क्लब नंदुरबारला १९ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी रिजन चेअरमन चेतन बारडीया, लायन्स डिस्टिक गव्हर्नर अश्विन बिजोरिया, पी डी जी गिरीश सिसोदिया, पी. डी. जी. नितीन बंग, पी डी जी कुलकर्णी, लायन्स क्लब मधील सदस्य उपस्थित होते. लायन्स क्लब नंदुरबारला बेस्ट क्लब, बेस्ट प्रेसिडेंट, बेस्ट सेक्रेटरी, बेस्ट ट्रेझरर, बेस्ट मेंटल हेल्थ ॲक्टिव्हिटी, बेस्ट एनवोर्मेन्ट ॲक्टिव्हिटी, बेस्ट तिरंगा महोत्सव, ब्लड डोनेशन कॅब, बेस्ट व्हिजन ॲक्टिव्हिटी, बेस्ट हंगर ॲक्टिव्हिटी, बेस्ट इमेज बिल्डिंग ॲक्टिव्हिटी, बेस्ट डायबेटीस ॲक्टिव्हिटी बेस्ट चाईल्डहूड कॅन्सर ॲक्टिव्हिटी, बेस्ट ह्युमॅनिटीरियम ॲक्टिव्हिटी, बेस्ट युथ ॲक्टिव्हिटी, बेस्ट मॅक्झिमम अटेंडन्स, जी एल टी अचीवमेंट, बेस्ट जलसेवा ॲक्टिव्हिटी असे पुरस्कार प्रदान करण्यात आले.





# शिंदखेडा तालुका शंभर टक्के बागायतीखाली येणार -पालकमंत्री

## सुलवाडे-जामफळ योजनेंतर्गत ५४ गावांच्या जलवाहिनी पूजन

### १० हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार

**धुळे, :** सुलवाडे-जामफळ उपसा जलसिंचन योजनेमुळे शिंदखेडा तालुक्यातील ५४ गावांना जामफळ धरणातून ७२८ किलोमीटर लांबीच्या भूमिगत पाईपलाईनद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा केला जाणार आहे. या योजनेमुळे तालुक्यातील १० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून याव्दारे शिंदखेडा तालुका शंभर टक्के बागायत करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथे सुलवाडे-जामफळ योजनेअंतर्गत ५४ गावांतील शेतांना थेट बंद जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेच्या पाईप पूजन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी सभापती संजीवणी सिसोदे, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिचंन





विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पवार, सहाय्यक अभियंता विशाल खैरनार, पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सुलवाडे-जामफळ योजनेस गती मिळाली असून कठीण परिस्थितीतही पीडीएन योजनेला मान्यता देण्यात आली. २०२३-२४ दरम्यान या योजनेच्या कामांना वेग आला असून सुमारे २०० किलोमीटर बंद जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. जामफळ धरणाला जोडणारी मुख्य नलीकेचे काम प्रगतीपथावर असून एकूण साडेसातशे किलोमीटर लांबीच्या जाळ्यातून येत्या जून-जुलैपर्यंत १० हजार हेक्टर क्षेत्र सिंचन क्षेत्राखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल तसेच यापुढची पिढी हा दुष्काळ नावाचा शब्द विसरुन जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिंदखेडा तालुका १०० टक्के बागायत करण्याचा आमचा निर्धार असून उर्वरित मुख्य जलवाहिनीची कामे वेगाने पूर्ण करण्याचे मंत्री रावल यांनी निर्देश दिले. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत थेट जलवाहिनीद्वारे पाणी पोहोचविण्याचा पुढील टप्पा राबविण्यात येणार असून त्यासाठी अहवाल व अंदाजपत्रके तयार करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगीतले.



# देवरे अभियांत्रिकीत 'कोडेथॉन-२६' क्विझ स्पर्धा

**धुळे :** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन मध्ये संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे राज्यस्तरीय सी ++ कोडेथॉन २६ या क्विझ व प्रोग्रामिंग स्पर्धा पार पडल्या. त्यात साडेतीनशे हून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी सहभाग घेतला.

या स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये घेण्यात आल्या. पहिली फेरी सी ++ प्रोग्रामिंगवर आधारित बहुपर्यायी प्रश्नांवर आधारीत एकूण ३६६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात गुरुकुल पॉलिटेक्निक नांदगाव, शासकीय तंत्रनिकेतन, आर.सी. पटेल अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालय, निकम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, जी.एम.सी. पॉलिटेक्निक शहादा तसेच गंगामाई पॉलिटेक्निक येथील विद्यार्थ्यांचा समावेश होता व बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन धुळे येथील २९४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

पहिल्या फेरीतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अव्वल तीस विद्यार्थ्यांची निवड दुसऱ्या फेरीसाठी करण्यात आली. दुसरी फेरी प्रोग्रामिंग आधारित प्रत्यक्ष कोडिंग स्पर्धेची होती. या स्पर्धेत आदित्य युवराज बागुल याने प्रथम क्रमांक मिळविला. शुभांगी चैत्राम पाटील यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. सुहेर रयाज शेख ने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा संजय हिरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा डॉ सुरेखा पाटील यांनी परीक्षक म्हणून परीक्षण केले. स्पर्धेचे उद्घाटन तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा संजय हिरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी विभाग प्रमुख प्रा निशाद पटेल, परिक्षक प्रा डॉ सुरेखा पाटील व अन्य विभाग प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. या स्पर्धेसाठी सिध्देश कॉम्प्युटर्स, धुळे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. स्पर्धेचे समन्वयक प्रा चैताली पाटील, प्रा मानसी माणिखेडकर, प्रा रेणुका धात्रक ह्यांसोबत विद्यार्थी समन्वयक उज्वल चित्ते, सुहेर शेख, अभिजीत पाटील, आर्यन हरवाणी, मेहुल पगारे, पूर्वा पाटील, माधुरी भदाणे, मानसी पाटील व दाक्षायणी नगराळे यांनी परिश्रम घेतले.

संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे, तंत्रनिकेतन प्राचार्य प्रा संजय हिरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात तंत्रनिकेतन मधील कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाने या स्पर्धेचे संयोजन केले.

# शहरी बेघर आदिवासी विकास निधीचे नियोजन करा, अन्यथा आंदोलन!

## डॉ. गावित यांनी मंजूर केलेला निधी व्यपगत होण्याची शक्यता

**नंदुरबार :** शहरी बेघर आदिवासींचे जिवनमान उंचाविण्यासाठी तत्कालीन आदिवासी विकास मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावीत यांनी शबरी आदिवासी घरकुल योजने अंतर्गत १२ कोटींचा निधी तरतूद मंजूर आहे. परंतु स्थानिक नगरपालिका व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मंजूर असलेला निधी अखर्चित राहून परत जाण्याची शक्यता आहे. मंजूर निधी परत न जाता घरकुल योजनेचे काम सुरू करण्यात यावे अन्यथा तीव्र जन आंदोलन छेडण्यात येईल; असा इशारा आज बेघर आदिवासींच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांना निवेदनाव्दारे देण्यात आला.

यावेळी शहरातील बेघर आदिवासींसमवेत भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक तथा गटनेते आनंदा



माळी, लक्ष्मण माळी, भाजपाचे माजी प्रतोद चारुदत्त कळवणकर, अन्य कार्यकर्ते व रहिवासी उपस्थित होते.

निधी प्राप्त करून घेणे आणि त्याचा लाभ बेघर आदिवासींना देणे यासाठी नगरपालिकेने बँक खाते क्रमांक तसेच आयएफसी कोड देऊन वेळेत प्रक्रिया करणे आवश्यक आहे. परंतु ते अद्याप झालेले नाही नंदुरबार जिल्हात अनेक आदीवासी कुटुंबे कुडा - मातीच्या झोपड्यां अथवा तात्पुरत्या निवारात राहत असून पक्की घरे नाहीत. या अनुसूचित जमातीतील शहरी रहिवासींचे जिवनमान उंचावण्यासाठी तत्कालीन आदिवासी विकास मंत्री तथा विद्यमान आमदार डॉ. विजयकुमार गावीत यांनी शबरी आदिवासी घरकुल योजनेखाली (शहरी) शहादा, नवापुर व नंदुरबार नगरपरिषद प्रत्येकी ५०० प्रमाणे १५०० एवढे घरकुलांचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी १२०० लाख भरीव निधीची तरतूद होती. परंतु स्थानिक नगरपालिका व प्रशासनाच्या उदासीन कार्यालयात जागा निश्चितीसाठी बैठका होवूनही निष्कर्ष निघालेला नाही. परिणामी निधी अखर्चित असल्याने मार्च २०२६ अखेर व्यपगत होण्याची शक्यता आहे. या निधीचा विनीयोग नियोजन होवून निधी नगरपालिकेला वर्ग करण्यासाठी नगरपालिकेचे बँक खाते, कोड उपलब्ध करून द्यावा, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात अनेक आदिवासी कुटुंबाच्या घरांची पडझड नुकसानीचे पंचनामे तहसिल कार्यालयाकडून करण्यात आले. बहुतांश कुटुंबांनी शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत अर्ज भरतेवेळी आवश्यक कागदपत्रे जमा केली आहेत. यासाठी नगररचना, नगरपालिका मुख्याधिकारी व आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या बैठक, जबाबदारी व कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक असल्याचे आदीवासींनी या निवेदनात म्हटले आहे.



# कोकमठाण येथे आत्मरक्षा प्रशिक्षण

## राज्यभरातून ५००० प्रशिक्षणार्थींची उपस्थिती

**शिरपूर :** शालेय शिक्षण विभाग व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्यातर्फे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये मुलींसाठी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये मुलींना स्व संरक्षणासाठी आवश्यक विविध प्रकारातील प्रशिक्षण प्रशिक्षक मार्फत देण्यात येत आहे.

राज्यातील मुलींना प्रशिक्षण देणाऱ्या या प्रशिक्षकांनी अधिकाधिक अद्ययावत व परिपूर्ण प्रशिक्षण देता यावे, यासाठी राज्यभरातील महिला प्रशिक्षकांची कार्यशाळा नगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल कोकमठाण येथे घेण्यात येणार आहे. यासाठी प्रशिक्षणास राज्यभरातून सुमारे ५ हजार प्रशिक्षणार्थी एनसीसी व स्काऊट गाईडचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या संकल्पनेतून व राष्ट्र प्रथम या ध्येयाची विकसित रूप म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक शिफू भारद्वाज व त्यांच्या टीम या कार्यशाळेत प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन व सराव करून घेण्यात आले आहे. या महिला प्रशिक्षणार्थींना राज्यभरातील शाळांमध्ये अधिकाधिक सक्षमपणे प्रशिक्षण घेता यावे, यासाठी अधिक प्रशिक्षित करण्यात येत आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहावी ते बारावीपर्यंतच्या शाळांमध्ये विद्यार्थिनींना जानेवारी २०२६ पासून हे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहेत. प्रशिक्षणात मार्शल आर्ट शैली, माजी सैनिकांमार्फत प्रशिक्षण, योगा आदी बाबींचा समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. शासनाच्या महिला सबलीकरण आत्मसंरक्षण व आत्मविश्वास वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वाकांक्षी करणार असल्याचा विश्वास शिक्षण विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

### विद्रोही मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष लोकनाथ यशवंत यांचा सत्कार

**नंदुरबार :** नांदेड येथे विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र राज्यच्या वतीने २० वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन २८ फेब्रुवारी व १ मार्च दरम्यान होणाऱ्या संमेलनाचे अध्यक्षपदी लोककवी लोकनाथ यशवंत यांची निवड करण्यात आहे. संमेलनाध्यक्ष लोकनाथ यशवंत यांचा नंदुरबार पंचायत समितिच्या सभागृह येथे जेष्ठ कवी, लेखक दीनानाथ मनोहर, समारंभाचे अध्यक्ष कॉम्रेड आर. टी गावीत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते मुंबईचे प्रा. अनिल सपकाळ, सत्यशोधकचे जेष्ठ नेते कॉ. रामसिंग गावीत, कॉ. करणसिंग कोकणी, कॉ शीतल गावीत, कॉ. गेवाबाई गावीत आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. अनिल सपकाळ, लोकनाथ यशवंत, अध्यक्ष कॉम्रेड आर. टी. गावीत यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक रणजित गावीत यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप गावीत यांनी केले. आभार करणसिंग कोकणी यांनी मानले.

### जळखे येथे १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**नंदुरबार :** तालुक्यातील डॉक्टर हेडगेवार सेवा समिती नंदुरबार संचलित अनुदानित आश्रमशाळा जळखे येथे १० च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे माजी सल्लागार नानाभाऊ माळी, प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष जात्राबाबा पावरा उपस्थित होते. दरम्यान दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू दिली. तसेच ९ वीच्या विद्यार्थ्यांनी या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष जात्राबाबा पावरा, नानाभाऊ माळी यांनी मार्गदर्शन केले.



# शनिमांडळ येथील साधना विद्यालयात शिवजयंतीनिमित्त सजीव देखावा

नंदुरबार - तालुक्यातील शनिमंडळ येथील साधना विद्यालयात शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांवर सजीव देखावा सादर केला मुख्याध्यापक कुंदन पाटील, पर्यवेक्षक पी यु आव्हाड यांच्या मार्गदर्शनाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहाने पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक कुंदन पाटील यांच्याहस्ते राजमाता जिजाऊ व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वकृत्व, नृत्य, नाटिका स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, युद्ध शैली, त्यांनी जिंकलेले किल्ल्यांचे महत्त्व आदी विषयांवर तेजस्विनी खैरनार, हर्षदा धनगर, अर्चना भील, मोहिनी भील, मोहित पाटील, भावेश माळी, कल्पेश पाटील, जीविका हटकर, भुषण पाटील आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठमोळी वेशभूषा तसेच मुलींन छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडे, गीत सादर करीत तमन्ना, अक्षरा, राजश्री, कृष्णा, कुलदीप, दिव्या, जोत्सना आदी गटांनी सहभाग घेतला. मुख्याध्यापक तथा प्राचार्य कुंदन पाटील यांनी शिवजयंती महत्त्व पटवून दिले. प्रास्ताविक जे टी राजपूत यांनी केले. सांस्कृतिक प्रमुख किरण मोरे, अविनाश माळी, राहुल साळुंखे, सी के राठोड, डी बी सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन अविनाश माळी यांनी केले. आभार डी बी सोनवणे यांनी मानले.

### तऱ्हाडी विद्यालयात शिवजयंती उत्साहत

**शिरपूर :** तालुक्यातील तऱ्हाडी येथे स्व. आण्णासो साहेबराव सोमा पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ट महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात पार पडली. यावेळी संस्थाध्यक्ष सुभाष भामरे, संचालिका उज्वला भामरे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पुजन व आरती करण्यात आली. यावेळी संस्थासचिव



विजय भामरे, संचालिका उज्वला भामरे, मुख्याध्यापक रावसाहेब चव्हाण. संचालक प्रशांत भामरे. दिपक पाटील व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी जिजाऊ वंदना सादर करीत गावातून लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बाल शिवाजी व मावळे यांचार सजीव देखावा सादर केला. तसेच ग्राम पंचायत आवारात शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व अभिषेक माजी ग्रामपंचायत सदस्य विजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्राम विकास अधिकारी देवीदास धाडे व सर्व कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते

# मराठा म्हणजे जात नाही तर मातीशी इमान राखणारा -ॲड. प्रा डॉ पवार

## कोठली येथे शिवछत्रपती जयंतीनिमित्त विचारांचा जागर

**नवापूर :** मराठा म्हणजे जात नाही तर मातीशी इमान राखणारा माणूस म्हणून झेंडा आणि जाती पातीच्या पलीकडे जाऊन समाजसुधारक यांचा अभ्यास युवकांनी करावा असा सल्ला शिवशाहीर प्रा डॉ ॲड. सुनील पवार यांनी दिला. सूत्रसंचालन भटू नरभवर यांनी केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर एकता युवा मंच कोठली खुर्द, कुणालभाऊ मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जिल्हा परिषद शाळेत पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कुणाल नरभवर, प्रमुख व्याख्याते शिवशाहीर प्रा डॉ ॲड. सुनील पवार, प्रमुख अतिथी नवापूर बी एड महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ नितीनकुमार माळी, कोठलीचे सरपंच महेंद्र वळवी, उपसरपंच जगदीश पटेल, कोकणीपाडा येथील सरपंच किरण कोकणी, पत्रकार महेंद्र चित्ते आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते याहा मोगी माता, राजमाता जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राची नरभवर या बालिकेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवना विषयी माहिती सांगितली. प्रास्ताविक डॉ नितीनकुमार माळी यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुणाल नरभवर यांनी आभार मानले. डॉ नितीनकुमार माळी यांनी शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील गाणे सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रवींद्र नरभवर, भटु नरभवर, सुरज वळवी, अमन नरभवर, गुरकेश पवार, उमेश वळवी, योगेश नरभवर, योगेश पटेल, शुभम नाईक, जतिन वाकडे, विक्की नरभवर, माया नरभवर, संगीता नरभवर, अंबिका नरभवर, जान्हवी नरभवर यांनी परिश्रम घेतले.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** :२१/०२/२०२६ **वार** : शनिवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : फाल्गुन **पक्ष** : शुक्ल **महिना** : फेब्रुवारी
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२८ **तिथी** : चतुर्थी **नक्षत्र** : रेवती
**योग** : शुभ **करण** : विष्टी **सूर्योदय** : ७-०५ **सूर्यास्त** : १८-४०
**चंद्रराशी प्रवेश** : मीन **शुभाशुभ** : **१३ नंतर** शुभ

**दैनिक राशीभविष्य**
**मेष** : अविवाहीतांना स्थळे येतील.
**वृषभ** : नातेवाईक पैशांची मागणी करतील.
**मिथून** : पाव्हणे मंडळी घराला येतील.
**कर्क** : आपलीच मंडळी ज्यांना समजतात त्यांचे स्वरुप कळेल.
**सिंह** : थोरांचे आशीर्वादद खरे ठरतात, जाणीव होईल.
**कन्या** : वडिलांची आठवण अधिक कराल.
**तुला** : नविन संधी उपलब्ध होईल.
**वृश्चिक** : शत्रुंची वारंवार परिक्षा घेऊ नका.
**धनू** : संसार आपला नीटनेटका करावा.
**मकर** : शारीरीक व्यथा जाणवतील.
**कुंभ** : संततीकडून आनंददायक वार्ता येतील.
**मीन** : घर म्हणजे काय याची प्रचिती येईल.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे.....

### आंतरराज्य युवा विनिमयासाठी चिन्मय वाघुळदे यांची निवड



**फैजपूर** : केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या 'मेरा भारत युवा केंद्र' या राष्ट्रीयस्तरावरील प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आंतरराज्य युवा विनिमय कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे चिन्मय मिलिंद वाघुळदे यांची निवड करण्यात आली आहे. माजी नगराध्यक्ष मिलींद शंकरराव वाघूळदे यांचा मुलगा चिन्मय त्यांच्यासोबत जिल्ह्यातील आणखी आठ युवकांचीदेखील निवड झाली आहे. हा गट २२ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत केरळ राज्याच्या दौऱ्यावर जाणार आहे हा दौरा कमलेश सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडणार आहे. विविध राज्यांतील युवकांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण, राष्ट्रीय एकात्मता, नेतृत्व कौशल्य आणि सामाजिक जाणीव वाढविण्याचा उद्देश आहे. चिन्मय वाघुळदे यांचे केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चावरे, आ सत्यजित तांबे, आ अमोल जावळे यांनी कौतुक केले आहे.



### दसनूर येथे महाशिवरात्री निमित्त फराळ वाटप

**सिंगनूर ता. रावेर** : येथून जवळच असलेल्या दसनूर येथील उमेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्त महादेवाच्या मुकुटाची गावातून टाळ, मृदंग, अभंग, गौळणी म्हणत दिंडी काढण्यात आली. यावेळी भाविकांसाठी साबुदाणा फराळ वाटप करण्यात आले. तसेच दिंडी सोहळा व रात्री भजन जागरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उमेश्वर महादेव संस्थांचे सर्व पदाधिकारी, सदस्य, दसनूर, सिंगनूर, इंदिरानगर, भजनी मंडळ, गावातील ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. पोलिस पाटील, निंभोरा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# मुक्ताईनगरच्या जे.ई.स्कुल केंद्र संचालकाची करामत
## परीक्षासंदर्भात अर्धवट व चुकीच्या नावाने नियुक्ती पत्रे, पर्यवेक्षकांमध्ये संभ्रम

**मुक्ताईनगर** : शुक्रवार २० फेब्रुवारी पासून इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षा सुरू होत आहेत. यावर्षी परीक्षेच्या नियमांमध्ये व पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले आहेत, त्यामुळे बैठक घेत पर्यवेक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना सूचना देणे गरजेचे आहे.

असे असताना मुक्ताईनगर येथील जे.ई. स्कूल चे केंद्र संचालक समीर पाटील यांनी बोर्डाचे नियमांना बगल देत कोणत्याही प्रकारची बैठक न घेता इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून नियुक्त असलेल्या शिक्षकांना शाळेच्या आवारातच अर्धवट व चुकीच्या नावाने नियुक्तीपत्रे देण्यात आली. यामुळे दहावी परीक्षांसाठी नियुक्त पर्यवेक्षकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे.

जे.ई. स्कूल मुक्ताईनगर दहावीच्या परीक्षा केंद्रसंचालक म्हणून कुऱ्हा येथील शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक समीर पाटील हे आहेत. परीक्ष घेण्यासंदर्भात नियम, सूचना, नवीन बदल, झूम मिटिंगद्वारा



(संग्रहीत छायाचित्र)

परीक्षा दालनात दक्षता, परीक्षा मंडळाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात अवलंबिली जाणारी कार्यपद्धत यासंदर्भात कोणतीही बैठक मीटिंग न घेता अथवा सूचना न देता मुक्ताईनगर येथील जे.ई. स्कूलच्या आवारात १० वी च्या बोर्डाच्या परीक्षेसाठी शिक्षकांना पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती पत्रे देण्यात आली. नियुक्ती पत्रावर पर्यवेक्षकांची अर्धवट व चुकीच्या नावाने नियुक्त्या आहेत. नवीन नियुक्त असलेल्या शिक्षकांना परीक्षेच्या कामकाजाकरिता पर्यवेक्षक म्हणून नेमणूक झालेल्या व पहिल्यांदाच परीक्षा केंद्रावर जात असलेल्या शिक्षकांना बोर्डाच्या नवीन नियमांच्या संदर्भात कोणत्याच सूचना केंद्र संचालक समीर पाटील यांच्याद्वारा देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे नवनियुक्त पर्यवेक्षक संभ्रमात आहेत.

परीक्षेच्या संदर्भात कोणतीच माहिती न देता केंद्र संचालकांनी नियुक्तीपत्र दिलेले असल्याने परीक्षेत मोठ्याप्रमाणात चुका होण्याची शक्यता नाकारता येणार नाहीत. याचा फटका विद्यार्थ्यांना बसण्याची शक्यताही नाकारता येणार नाही.

शिक्षक कमी असल्याचे सांगत मुख्याध्यापकांच्या जवळचे व ज्यांना बारावीचे परीक्षेचे काम दिलेले नाही त्यांना सुद्धा दहावीच्या परीक्षेच्या कामातून वगळण्यात आले. व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा याकडे कानाडोळा डोळा केल्याची सांगितले जात आहे.

ज्या शिक्षकांच्या याद्या संबंधित मुख्याध्यापकांकडून यादीनुसार नियुक्त झाल्या आहेत किंवा नाही याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होऊन संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई करण्यात यावी असे रयत शिक्षकांकडून बोलले जात आहे. अर्धवट तसेच चुकीचे असल्यामुळे नियुक्ती पत्र आपलेच आहे की दुसऱ्या कोणाचे यात शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परीक्षेचे कामकाज आकसापोटी देण्याची शक्यता असून १२वी च्या परीक्षा केंद्रात काही विद्यार्थ्यांना जाणीव पूर्वक त्रास दिल्याचा प्रकार असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये आहे.

### विषय शिक्षकांनाच दिल्या नियुक्त्या?

शिक्षकांचे विषय लक्षात न घेता विषय शिक्षकांना त्याच पेपरच्या दिवशी पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आलेल्या आहेत. विषय शिक्षकांनी केंद्र संचालक यांना सांगितल्यावर सुद्धा तश्या नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच बारावी परीक्षेसाठी ज्या शिक्षकांची पर्यवेक्षक नियुक्ती आहे. अशा शिक्षकांना पुन्हा दहावी परीक्षेसाठी बळजबरीने अर्धवट नावाने नियुक्ती देण्याचे काम केंद्र संचालक व मुख्याध्यापकांकडून संगनमताने करण्यात आल्याची तक्रार शिक्षकांनी केल्या आहेत.

# भुसावळ तालुक्यात पिंपळगाव खुर्द येथे माकडाचा उच्छाद; ३५ जण जखमी

**भुसावळ** : तालुक्यातील पिंपळगाव खुर्द गेल्या तीन आठवड्यांपासून एका माकडाने अक्षरशः दहशत निर्माण केली असून आतापर्यंत तब्बल ३५ जणांना जखमी केले आहे. यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी होऊन भुसावळ येथील खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे. या प्रकाराबाबत वनविभागाकडून हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

महिनाभरापूर्वी गाव परिसरात माकडांची एक टोळी दाखल झाली होती. त्यातील बहुतेक माकडे निघून गेली. मात्र या टोळीतील एक माकड मागे राहून गेले. या माकडाने आक्रमकतेने गेल्या तीन आठवड्यांपासून गावात थांबून नागरिकांवर अचानक हल्ले करत आहे. घरात घुसून महिलांवर व वृद्धांवर झडप घालणे, स्वयंपाकघरातील वस्तूंची नासधूस करणे असे प्रकार सुरू आहेत.

### एक जण आयसीयूमध्ये



नीना काशिनाथ पाटील यांना घराच्या गच्चीवरून जोरात ढकलल्याने ते गंभीर जखमी झाले असून भुसावळ येथील खासगी रुग्णालयात आयसीयूमध्ये दाखल आहेत. तसेच राजू पाटील यांनाही या माकडाने जखमी केले आहे. इतर अनेक ग्रामस्थांवरही हल्ले झाल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**नागरिकांमध्ये भीतीचे सावट**

माकड पिसाळलेल्या स्वरूपात असल्याने कोणत्याही वेळी, कोणावरही हल्ला करत असल्याने नागरिकांना दिवसा देखील घराबाहेर पडताना धास्ती वाटत आहे. शेतकामावर जाणे, लहान मुलांना शाळेत पाठवणे याबाबत पालक साशंक आहेत. गावात भीतीचे वातावरण पसरले असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**वनविभागाचे सोयीस्करपणे कानाडोळा**

गावकऱ्यांनी वनविभागाला लेखी निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे. मात्र संबंधित विभागाने केवळ तोंडदेखला पणा करीत पिंजरा लावून पुढील ठोस कार्यवाही केलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "तीन आठवड्यांत ३५ जण जखमी झाले, तरीही माकडाला पकडण्यासाठी प्रभावी प्रयत्न होत नाहीत," अशी नाराजी सरपंच लक्ष्मण पाटील यांनी व्यक्त केली.

सदर माकडाला तात्काळ पकडून गावकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# भुसावळमध्ये कार्यालयात कथित अत्याचार
## गुन्हा दाखल, आरोपीला दोन दिवसाची पोलिस कस्टडी

**भुसावळ** : शहरातील मुक्ताई कॉलनी परिसरात असलेल्या ओंकार हाईट्स इमारतीतील एका कार्यालयात महिलेवर अतीप्रसंग केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. यासंदर्भात भुसावळ शहर पोलीस ठाण्यात संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन दिवसापूर्वी दुपारच्या सुमारास ही घटना घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. संबंधित महिलेने दिलेल्या तक्रारीनंतर दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९.१५ वाजता गुन्हा नोंदविण्यात आला. तक्रारीनुसार, ५५ वर्षीय संशयित व्यक्तीने कार्यालयात बोलावून महिलेच्या इच्छेविरुद्ध जबरदस्ती केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. संबंधित ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज, उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. तपास अधिकाऱ्यांकडून घटनेचा सर्वांगीण तपास केला जात आहे.

दरम्यान, प्रकरण संवेदनशील असल्याने पोलीस प्रशासनाने नागरिकांना अफवा किंवा अप्रमाणित माहिती सोशल मीडियावर प्रसारित करू नये, असे आवाहन केले आहे. अधिकृत माहितीनुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या घटनांना आळा बसावा यासाठी कडक कारवाईची मागणी काही नागरिकांकडून होत आहे.

### रावेर विवरा रस्त्यावर व्यापाऱ्याची लूट

**रावेर** : किराणा दुकानाचे वसुलीचे पैसे घेऊन परतणाऱ्या एका व्यापाऱ्याचे पंधरा हजार रुपये लुटून नेल्याची घटना विवरा -रावेर रोडवर घडली .याबाबत रावेर पोलीस ठाण्यात तीन अज्ञात चोट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन दिवसापूर्वी रावेर येथील अनिल सुपारी भांडार या दुकानचे मालक गोवर्धनदास सफरमल कोटवानी हे त्यांच्या दुकानाची वसुली करण्यासाठी विवरा येथे गेले होते. सायंकाळी वसुली करून रावेर येथे येण्यासाठी विवरा बस स्टॉप वर येऊन ते बसची वाट पाहत होते. यावेळी त्यांना एका मोटरसायकल स्वाराने मी रावेरला जात आहे असे सांगून त्यांना मोटरसायकलवर बसवले. सायंकाळी सात वाजेच्या सुमारास पारश्या नाल्याजवळील शेतात त्याने आपली मोटर सायकल लघु शंका करण्याचे कारण सांगून मोटरसायकल शेत रस्त्याकडे नेली. यापूर्वीच दोन साथीदार त्या ठिकाणी उभे होते. तिघांनी मिळून गोवर्धनदास कोटवाणी यांच्या खिशातील वसुलीचे पंधरा हजार रुपये जबरदस्तीने हिसकाऊन काढून घेतले व तेथून पोबारा केला. याबाबत गोवर्धनदास कोटवाणी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रावेर पोलीस ठाण्यात तीन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक सुनील मोरे करीत आहेत .

# भुसावळ भारतीय जनता पार्टीतर्फे शिवजयंती उत्साहात

**भुसावळ** : येथील भारतीय जनता पार्टी तर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दिनी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्याहस्ते भुसावळ रेल्वे स्थानकानजीकच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जय घोष केला.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभित करण्यात आला होता. महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास वंदन करण्यासाठी शिवभक्तांची मोठ्या संख्येने गर्दी होती. यावेळी भारतीय जनता पार्टीचे गटनेते युवराज लोणारी, उपनगराध्यक्ष शैलेजा नारखेडे, शहराध्यक्ष संदीप सुरवाडे, किरण कोलते, पिंटू कोठारी, परिक्षित बऱ्हाटे, मनोज बियाणी, प्रमोद नेमाडे, पुरुषोत्तम नारखेडे, बापु महाजन, बोधराज चौधरी, गिरीश महाजन, राजेंद्र आवटे, आशिष पटेल, सुजित भोळे, अल्बर्ट तायडे, विलास सातदिवे, कैलास पाटील, सरचिटणीस अमोल महाजन, सागर चौधरी, जयंत माहुरकर, महिला आघाडीच्या अनिता आंबेकर, वैशाली सेतवाल, शोभा इंगळे, राजू खरारे, शंकर शेळके, प्रा प्रशांत नरवाडे, रवी ढगे, चेतन बोरोले, अमोल पाटील, अनुसुचित जाती मोर्चाचे शहराध्यक्ष संतोष ठोकळ, व्यापारी आघाडीचे शहराध्यक्ष रिषभ राजपूत, वसंत पाटील, प्रमोद पाटील, अभिजीत मराठे, शैलेंद्र ठाकरे, किरण पाटील, उदय पाटील, प्रा प्रशांत पाटील, रुपेश देशमुख, कैलास शेलोडे, गौरव आवटे, गुड्डू शेठ अग्रवाल, भागवत सावकारे, भरत उमरीया यांचा सह शिवप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### फेकरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**भुसावळ** : फेकरी येथील शहीद प्रदीप पाटील चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस समितीचे अध्यक्ष आदित्य कृष्णा पाटील उपाध्यक्ष मुकुंदा पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या महिला समितीचे सभासद यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच कॉन्ट्रॅक्टर संतोष सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रशांत निकम , अरुण निकम, चेतन निकम, जीवन सुरवाडे, सचिव कमलेश बराटे, गजानन पाटील, आकाश बोरोले, गणेश भारंबे, वैजनाथ कुलकर्णी, युवराज पाटील यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

E-Tenders are invited by the undersigned in the prescribed form through e-tendering process from Reputed, Experienced & Eligible Firms/ Contractors/ Agencies who have registered under e-tendering process for the following works of Monthly **Meter Reading, Bill Printing & Bill Distribution for NARDANA Subdivision under UCR Division Dhule** subject to tender documents terms and conditions.

| Tender No. | No. of Consumer | Type of work | Jurisdiction | E.M.D. Amount in Rs. | Tender Fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| EE/DHL/UCR/ T-17/2025-26 | 19000 | Monthly Meter reading, bill printing & bill distribution | Jurisdiction under Naradana Subdivision under UCR Division Dhule | 70000/- | 2500/- |

Detailed documents as above are available at our website **www.works.mahadiscom.in/eTender/e** tender from **21.02.2026 to 02.03.2026** Submit the tender latest by **02.03.2026** up to **23.55 Hrs.** Contact person Add Ex Engineer (M), Mobile **no.7875766781** Assistant Engineer (P) **7875001425.**

**Executive Engineer**
**UCR Division, Dhule.**

**PRO No- JLGZ 239/2025-2026 Dt.20.02.2026**

## शहादा नगरपरिषद शहादा जिल्हा. नंदुरबार

**(वाचनालय विभाग ) / जाहीर निविदा सूचना**

निम्नलिखित कामासाठी पंजीकृत व अनुभवी पुस्तके / ग्रंथ विक्रेत्यांकडून / प्रकाशना कडून मोहोरबंद निविदा द्विपाकीट टपाल पध्दतीने मागविण्यात येत आहे.

*** निविदा पात्रतेसाठी सादर करावयाची प्राथमिक कागदपत्रे पाकीट क्रमांक १ मध्ये असणे आवश्यक ती खालील प्रमाणे :-**
१) शॉप ॲक्ट परवाना व्यवसाय नोदणी नुतनीकरण प्रमाणपत्राची अधिप्रमाणित प्रत., २) पॅन क्रमांकासह आयकर क्लीअरन्स प्रमाणपत्राची अधिप्रमाणित प्रत., ३) जि.एस.टी. प्रमाणपत्राची अधिप्रमाणित प्रत., ४) या पूर्वी सदर काम केले असल्यास त्याच अनुभवाचा दाखला., ५) फर्म धारकाजवळ असलेल्या विविध प्रकाशकांचे अथवा पुस्तके विक्रेता असले बाबत चे पत्र., ६) इसारा रक्कम भरल्या बाबत पावतीची झेरॉक्स प्रत., ७) अटी शर्तीची निविदा स्वीकारली जाणार नाही. निविद मंजूर वा नामंजूर करण्याचा अधिकार शहादा नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

वरील प्रमाणे कागद पत्र निविदा पाकीट क्रमांक १ मध्ये असणे आवश्यक असून उपरोक्त नमूद कागदपत्रांची पाहणी केल्यानंतरच निविदा दराचा दुसऱ्या क्रमांकाचा लिफाफा उघडविणेत येईल. निविदा विक्रीचा दिनांक :- २३/०२/२०२६ ते २५/०२/२०२६ निविदा स्वीकृतीचा अंतिम दिनांक :- २५/०२/२०२६ निविदा उघडविण्याचा दिनांक :- २६/०२/२०२६

सदर पुस्तके खरेदी बाबत ची सविस्तर जाहीर निविदा सूचना शर्ती व अटी सह शहादा नगरपरिषद पुज्य सानेगुरुजी वाचनालयात कार्यालयीन वेळेत सूचना फलकावर पहावयास मिळेल.

**खरेदी करावयाच्या पुस्तकां विषयी माहिती**

| अ.क्र. | कामाचे नाव | वर्णन | कोऱ्या निविदा फार्म ची किंमत | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुस्तके / ग्रंथ | ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिकांचे मराठी ग्रंथ, इतर भाषेतील ज्ञानपीठ साहित्यातील मराठी भाषेत भाषांतरीत/अनुवादित झालेले ग्रंथ. मराठीतील नामवंत साहित्यिकांची पुस्तके, देशातील इतर भाषेमधून मराठी व हिंदी भाषेत भाषांतरीत/अनुवादित झालेली पुस्तके, त्याच प्रमाणे सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त जसे केंद्र व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगासाठी आवश्यक असलेली पुस्तके, पोलीस भरती, रेल्वे, बँक तलाठी इ. स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त पुस्तके. | रुपये १००/- | रुपये १०००/- | मार्च २०२६ पावेतो |

तरी वरील कामाकरिता इच्छुक मान्यता प्राप्त पुस्तके / ग्रंथ विक्रेत्यांनी / प्रकाशकांनी सदर पुस्तके / ग्रंथ विक्री वरील देय सवलत दराची निविदा विहित कालावधीत सादर कराव्यात.

**ठिकाण : शहादा**
**दिनांक : २०/०२/२०२६**

**(साजिद पिंजारी)** मुख्याधिकारी शहादा नगरपरिषद शहादा
**(सौ. भावना कदम)** शिक्षण समिती सभापती शहादा नगरपरिषद शहादा
**(सौ. माधवी पाटील)** उपनगराध्यक्षा शहादा नगरपरिषद शहादा
**(अभिजीत पाटील)** अध्यक्ष शहादा नगरपरिषद शहादा



# वरणगावच्या महात्मा गांधी विद्यालयात शिवजयंती उत्साहात

**भुसावळ** : वरणगाव येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे शिवजयंतीनिमित्त कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्राचार्य सी. जे. तायडे यांच्याहस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य पी. एस. पाटील, पर्यवेक्षक आर. एस. कोल्हे, पी. एस. झोपे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित पोवाडा, "शिवगर्जना" तसेच शिवरायांवरील देशभक्तीपर गीते सादर केली. मांगी सूनार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रजाप्रेम, न्यायनिष्ठा आणि आदर्श राज्यकारभार याबाबत मार्गदर्शन केले. शिवरायांचे विचार आजच्या पिढीने आत्मसात करून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन व आभार वाय. आर. पाटील यांनी मानले.



# भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात

**न्हावी, ता यावल** : भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय न्हावी येथे आज दिनांक १९ फेब्रुवारी रोजी राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अतिशय उत्साही आणि आनंददायी वातावरणात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला प्राथमिक शाळेतील शिवाजी महाराजांची मावळ्यांची वेशभूषा करून आलेल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सरस्वतीचे पूजन करण्यात आले तदनंतर मुख्याध्यापक व्ही. बी. वारके यांनी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. तसेच महाराजांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सुद्धा सांगितली. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या वेशभूषेमुळे तसेच त्यांच्या उत्साहामुळे वातावरण अगदी ऐतिहासिक तयार झालेले होते.

प्राथमिकचे मुख्याध्यापक डी. एच. तळले उपमुख्याध्यापिका संगीता फिरकी पर्यवेक्षक ए. एस. ठोसर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे.एन .चौधरी यांनी केले.



# छावा मर्दानी खेळ आखाडातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

**फैजपूर** : छावा मर्दानी खेळ आखाडा, फैजपूर अध्यक्ष महेश वाघोदेकरतर्फे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव निमित्त छावा मर्दानी खेळ आखाडा, फैजपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज पूजन व माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी व्यक्तिमत्व विकास, शैक्षणिक मार्गदर्शन, तसेच प्रत्येक घरात धर्म ग्रंथ तसेच छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांचे चरित्र वाचन व्हावे आणि त्यातून युवा पिढी घडावी, तसे संस्कार रुजू व्हावेत, . शिवचरित्र याचेही पारायण व्हावे, जेणेकरून युवा पिढी सुसंकृत, सुसंस्कारित छत्रपती सूत्र आपल्या जीवनात कसे उपयोगी पडते यावर मार्गदर्शन करण्यात आले.

मुलांनी बाळराजे शिवबा ते राजा छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे संस्थापक जीवन चरित्र नियमित वाचन केल्यास महाराजांसारखे यशस्वी व्हाल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारप्रणाली आत्मसात करावी असे मार्गदर्शन वाघोदकर यांनी केले.

### नाहाटा महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**भुसावळ** : येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमा पुजन आणि अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे हे होते. तर प्रमुख वक्ते प्रा. श्रीपाद वाणी, उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. एन. पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ. जी. आर. वाणी, रासेयो भुसावळ विभागीय समन्वयक प्रा. डॉ. आर. एस. नाडेकर उपस्थित होते. प्रा. श्रीपाद वाणी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकंदरीत जीवनातील धाडस, जिद्द तसेच त्यांनी केलेले पराक्रमात मराठा स्वराज्याची स्थापना, सुरतेची स्वारी, पुरंदरचा तह, आग्रा येथून सुटका याबद्दल विद्यार्थ्यांना अवगत केले. "रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका," अशी त्यांची ताकीद होती, ज्यातून त्यांचे रयतेबद्दलचे प्रेम दिसून येते. शिवाजी महाराज हे शौर्य, समता, प्रेरणा आणि आस्थेचे केंद्र असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

# अतिक्रमणाच्या अजगरी विळख्यात अडकले मेंढळी गाव

## स्वातंत्र्योत्तर काळातही मुलभूत सुविधा नाहीच; मंदिरांच्या जागेवर अतिक्रमण

**तभा वृत्तसेवा**
**नांदूरा, १८ फेब्रुवारी**

नांदूरा तालुक्यातील मेंढळी गाव अतिक्रमणांच्या समस्येमुळे गंभीर संकटात आहे. या गावात १३०० लोकवस्ती असून, स्वातंत्र्यानंतरही गावातील बऱ्याच मूलभूत सुविधांचा अभाव आहे. विशेष म्हणजे गावातील महादेव मंदिराच्या जागेवर काही नागरिकांनी अतिक्रमण करून घरे वसविल्याची धक्कादायक माहिती टीमच्या पाहणीतून समोर आली आहे. दरम्यान दै. तरूण भारतच्या टीमने या गावात प्रत्यक्ष जाऊन याठिकाणच्या समस्यांची माहिती घेतली.

नांदूरा हा कष्टकरी शेतकऱ्यांचा तालुका. या तालुक्यातील १३०० लोकवस्ती असलेले गाव मेंढळी हे देखील शेतीवरच निर्भर असलेले गाव आहे. या गावाचा 'दै. तरूण भारत'च्या टीमने पाहणी दौरा केला. या पाहणीत अतिशय धक्कादायक माहिती समोर आली.

**मुलभूत सुविधा स्वप्नवतच**

मेंढळी या गावात स्वातंत्र्योत्तर काळातही मुलभूत सुविधांचा अभाव असल्याची माहिती समोर आली आहे. या गावात दूषित झालेल्या विहीतून पिण्याचे पाणी गाळून भरून प्यावे लागत असल्याची समस्या गावातील महिलांनी बोलून दाखविली. या दूषित पाण्यामुळे घरातील व्यक्ती आणि लहान मुलांच्या आरोग्यावर मोठा विपरीत परीणाम होत आहे. तसेच गावात पक्क्या गटारीच नसल्याने सांडपाणी हे मोकळ्या जागांवर सोडण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरलेली आहे. या भागातून चालतांना अक्षरश: नाकाला रूमाल लावून वाट धरावी लागत असल्याचे चित्र याठिकाणी दिसून आले.

**गावात पक्के रस्तेच नाही**

देशभरात गल्ली ते दिल्ली रस्त्यांचे मोठे जाळे विणले जात आहे. हे सुखद चित्र असतांना दुसरीकडे नांदूरा तालुक्यातील मेंढळी गाव मात्र त्याला अपवाद ठरले आहे. गेल्या ७९ वर्षानंतरही या गावात पक्के रस्ते नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गावात प्रवेश करतांना कोणत्या रस्याने जावे असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. कारण जिकडे पहावे तिकडे मोकळ्या आणि सार्वजिनक जागांवर घरांचे अतिक्रमण झाल्याने या अतिक्रमणात रस्तेच हरविल्याचे विदारक चित्र दिसून आले.

**अतिक्रमणामुळे मृतदेहाची विटंबना**

मेंढळी गावातील घरांचे अतिक्रमण एवढे भयंकर आहे की, यामुळे गल्ल्या अत्यंत निमुळत्या झाल्या आहेत. एका घरातून पाय काढला की दुसऱ्याच्या घरात तो पडतो असेच काहीसे चित्र आहे. तसेच एखाद्याच्या घरात कुटूंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याचा मृतदेह दुसऱ्याच्या दाराशी ठेऊन अंत्यविधीची तयारी करावी लागते. शिवाय तिरडी नेतांना ती चार नव्हे तर दोन खांद्यावर तिरपी करून न्यावी लागत असल्याचा धक्कादायक अनुभव या परिसरातील रहिवाशांनी सांगितला. अतिक्रमणामुळे रस्ते गायब झाल्याने मृतदेहाची अशीही विटंबना ही नेहमेची ठरली आहे.

**विकास हवाय पण अतिक्रमण काढणार तरी कोण?**

या गावातील महिला आणि पुरूषांशी चर्चा केली असता साऱ्यांनाच गावाच्या विकासाची इच्छा आहे, मात्र अतिक्रमण काढल्याशिवाय ते शक्य नसल्याचेही त्यांचे म्हणणे आहे. पण अतिक्रमण काढणार तरी कोण? पाच टक्के अतिक्रमणधारकांशी वाईटपणा घेऊन भांडणे ओढवून घेणार तरी कोण? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

**मुंदडा कुटुंबाचा एकाकी लढा सुरूच**

स्व. गोपीकिशन मुंदडा हे मेंढळी गावातील प्रतिष्ठीत आणि तेवढेच दानशूर व्यक्तीमत्व होते. त्यांचाच वारसा पुढे सुरेंद्रजी मुंदडा यांनी कायम ठेवला. कुठलीही लिखापढी न करता अनेकांना घरांसाठी स्वमालकिची जागा त्यांनी देत दातृत्वाचे दर्शन घडविले. मात्र त्याचा गैरफायदा घेत या रहिवाशांनी मंदिर परिसरात अतिक्रमण केले. गावाच्या विकासासाठी मुंदडा परिवार नेहमीच सढळ हाताने मदत करीत असतात. गावात पक्के रस्ते, पिण्याचे शुध्द पाणी, बेरोजगारांना रोजगार, धार्मिक आणि सामाजिक सलोखा टिकून रहावे अशी मुंदडा परिवाराची पोटतिडकी इच्छा आहे. मात्र काही विघ्नसंतोषी चांगल्या कार्यात नेहमीच खोडा घालत असल्याने मुंदडा परिवार हे गावाच्या भल्यासाठी एकाकी लढा देत आहेत.

**प्रशासनाचीही उदासिनता**

गावात मुलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषद प्रशासनाची आहे. मात्र ग्रामसेवक आणि विस्तार अधिकारी याबाबत कुठलीही कार्यवाही करीत नसल्याने प्रशासनाची मोठी उदासिनता मेंढळी गावाच्या विकासात अडथळा ठरत असल्याचे दिसून येत आहे.

**८ अ चे दाखले दिलेच कसे?**

कुठल्याही जागेचा नोंदणीकृत व्यवहार झाल्यानंतरच ८ अ चे दाखले देता येतात.



### महादेव मंदिराच्या जागेत अतिक्रमण

या गावात सुरेंद्रजी मुंदडा यांच्या कुटुंबाने महादेव मंदिर उभारले आहे. तसेच या परिसरात विठ्ठल-रूख्मीणीचेही मंदिर आहे. बाकी परिसर हा मोकळा आहे. मात्र आता या मंदिराच्या मोकळ्या जागेपर्यंत घरांचे अतिक्रमण येऊन ठेपले आहे. जागा बळकावून रहिवाशांनी या परिसरात मोठे अतिक्रमण केले आहे. या अतिक्रमणामुळे महादेव भक्तांच्या आस्थेला धक्का बसत आहे. याबाबत रहिवाशांना अनेकदा विनंती करूनही हे अतिक्रमण काढण्याला ते नकार देत आहेत. शिवाय काही रहिवाशी इतरांना भडकवून त्यांना दादागिरीची भाषा करीत असल्याची माहिती समोर आली आहे.





मात्र मेंढळी गावात जागेचा कुठलाही व्यवहार झालेला नसतांना माजी सरपंच सुरेखा अरूण सोयस्कर यांनी ८ अ चे दाखले दिलेच कसे? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तसेच असे दाखले देण्यामागे गौडबंगाल असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**यांनी केले अतिक्रमण**

मेंढळी गावात सुरेश जैसवाल, कलावती जैसवाल, मुकुंदा सपकाळ, सिंधुबाई धुरंदर, प्रल्हाद कांबळे, आशाबाई कांबळे, अशोक इंगळे, उत्तम गवई, नारायण बहुरूपे, प्रकाश नरवाडे यांनी अतिक्रमण करून गावाच्या विकासात बाधा निर्माण केली आहे.

**लोकसहभाग शून्य**

गावाचा विकास साधायचा असेल तर लोकसहभागही तितकाच महत्वाची भूमिका बजावतो. मात्र मेंढळी गावात विकासासाठी पुढाकार घेण्यात लोकसहभाग हा शून्य असल्याची माहिती मिळाली आहे. लोकसहभाग नसल्यानेच गावात अतिक्रमणासारखी गंभीर समस्या निर्माण झाली असून मुलभूत सुविधांपासूनही सर्वसामान्यांना वंचित रहावे लागत असल्याचे वास्तव 'दै. तरूण भारत' ने केलेल्या पाहणीतून समोर आले आहे.

### मुंजोबा मंदिराला सांडपाण्याचा वेढा

मेंढळी गावातील महादेव मंदिराच्या परिसरातच मुंजोबाचे जागृत देवस्थान आहे. मात्र या जागृत देवस्थानाला दुर्गंधीयुक्त सांडपाण्याचा वेढा असल्याचे पाहणीतून दिसून आले. ज्यामुळे मंदिरात येणारे भक्त मोठ्या अडचणींना तोंड देत आहेत. तसेच मंदिराच्या शेजारीच राहणाऱ्या रहिवाशाकडून विनापरवाना अवैधरित्या मद्यविक्री होत असल्याने मुंजोबा मंदिराची पवित्रता धोक्यात आली आहे. तसेच मद्यविक्रीमुळे गावातील तरूण पिढी ही व्यसनाधीन होत आहे.

### वर्षभरापासून ग्रामसभाच नाही

गावातील विविध प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी ग्रामसभा होत असते. मात्र मेंढळी गावात गेल्या वर्षभरापासून ग्रामसभाच झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. या गावाचे माजी सरपंच प्रमोद संकाळे(पाटील) यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, गावातील अतिक्रमण हा मोठा संवेदनशील मुद्दा आहे. हे अतिक्रमण काढण्याचा अनेकदा प्रयत्न झाला, पण बोटावर मोजण्याइतक्या लोकांनी तो यशस्वी होऊ दिला नाही. तसेच पाण्यासाठी जलजीवन मिशनचे आलेले तीन कोटी रूपयांचा निधी देखील शासनाला परत करावा लागल्याची खंत त्यांनी बोलून दाखविली. तसेच अतिक्रमणाविरोधात ठराव आणला की काही ग्रामपंचायत सदस्य इतरांना फितूर करून त्याविरोधात भूमिका घ्यायला लावत असल्याचेही माजी सरपंच प्रमोद संकाळे यांनी सांगितले.

### आमदारांसह खासदारांचेही दुर्लक्ष

मलकापूर तालुका हा भाजपाचा बालेकिल्ला आहे. या मतदारसंघातून भाजपाच्या रक्षा खडसे ह्या खासदार आणि आता केंद्रीय मंत्री आहेत. तर आमदार चैनसुख संचेती हे भाजपाचेच आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता असलेल्या या दोन्ही लोकप्रतिनीधींनी तालुक्यातील मेंढळी या गावात कधी ढुंकुनही पाहीले नाही. त्यामुळे स्वातंत्र्याच्या ७९ वर्षानंतरही या गावातील रहिवाशांपर्यंत मुलभूत सुविधा पोहोचल्या नाहीत आणि अतिक्रमणाचाही प्रश्न सुटला नाही. त्यामुळे या गावातील ग्रामस्थांना आमदार आणि खासदार दोघांवर मोठा रोष आहे.

## छत्रपती शिव जन्मोत्सव....



### 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या जयघोषानी शाळा परिसर दुमदुमला

**पाचोरा :** येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत अखंड भारताचे आराध्य दैवत, स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साह आणि मंगलमय वातावरणात पार पडली. शाळा परिसर भगव्या ध्वज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषांनी दुमदुमला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती सदस्य धनराज पाटील, पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या ऐतिहासिक दिनानिमित्त विद्यार्थी पारंपरिक वेशभूषा करीत ओघवत्या शैलीत शिवरायांच्या पराक्रमशाली इतिहासाचे प्रसंग तसेच 'शिवगर्जना' व विविध शिवगीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे सांगत शिवरायांचे स्वराज्य, शिस्त, राष्ट्रप्रेम व सामाजिक समतेचे विचार विद्यार्थ्यांनी अंगीकारावेत, असे आवाहन प्रतिपादन अध्यक्ष धनराज पाटील यांनी केले. सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक रविंद्र कुंभार यांनी केले. मुख्याध्यापक व्यंकट बोरसे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पदवीधर शिक्षक राजेंद्र कोळी, उपशिक्षिका मीना नेहरकर, राजश्री आहेर यांनी परिश्रम घेतले.




### गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलचा शिवजयंती सोहळ्यात सहभाग

**पाचोरा :** शिवजयंती उत्सवानिम्मित गुरुकुल चे प्राचार्य, विद्यार्थी व शिक्षक वृंद शिवप्रतिमेचे पूजन करून मोठ्या उत्साहाने पाचोरा शिव रॅली मध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. पाचोरा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिव प्रतिमेचे पूजनप्रसंगी गुरुकुल ची विद्यार्थिनी अन्वी सानप हिने शिवाजी महाराजांचे पाळणा गीत गायन केले. त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी वेशभूषेत लेझिम व लाठी काठी प्रात्यक्षीक सादर केले. शिवरॅलीच्रूया समारोपानंतर सांगता झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य पूर्ण जीवनावर प्रकाश टाकत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी वक्तृत्वात हि आपला सहभाग नोंदविला. सोहळ्याच्या आनंदमयी वातावरणात व्यासपीठावर आमदार किशोर आप्पा पाटील यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शाळेचे प्राचार्य प्रेम शामनाणी यांना महाराजांची प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले.

## समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीवर 'प्रताप'मध्ये मार्गदर्शन

**अमळनेर :** खानदेश शिक्षण मंडळ संचालित प्रताप महाविद्यालय, अमळनेर (स्वायत्त) येथील इतिहास विभाग व इतिहास संशोधन केंद्र तसेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ संचालित प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्रीय संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळा पार पडली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, प्रमुख अतिथी माजी प्राचार्य डॉ. अरुण बि. जैन, प्रमुख वक्ते यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कविता तातेड, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. राधिका पाठक, पारोळा येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. रावसाहेब बि. नेरकर आदी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय मूल्यमापन व मानांकन परिषद यांचे प्रमुख समन्वयक प्रा. डॉ. मुकेश भोळे, विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. डॉ. संदीप नेरकर, प्रा. हिमांशू गोसावी, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राचे प्रशासकीय अधिकारी रोहिदास साळुंखे, गोपाळ माळी, प्रा. दिनेश हालोर, इतिहास विभाग व इतिहास संशोधन केंद्र प्रमुख प्रा. डॉ. धनंजय चौधरी, प्रा. विजय साळुंखे, प्रा. अवित पाटील, प्रा. प्रियंका चावडा यांच्यासह विविध विभागांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रमुख वक्त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत संशोधनाला प्राप्त होत असलेले महत्त्व, संशोधन विषय निवड, साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन निबंध व प्रबंध लेखन, शोधनिबंध सादरीकरण, तळटीपा लेखन, आराखडा तयार करणे, संशोधनाच्या टप्प्यांचे नियोजन, माहिती संकलन, विश्लेषण, वर्गीकरण, अन्वयार्थ मांडणी, तक्ते तयार करणे, प्रकरण लेखन व संदर्भसूची सिद्ध करणे आदी मुद्द्यांवर दृक्श्राव्य सादरीकरणाच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. धनंजय चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अवित पाटील यांनी केले. तांत्रिक सहाय्य प्रा. विजय साळुंखे, मान्यवरांचा परिचय प्रा. प्रसाद मुठे यांनी केला. आभार प्रा. प्रियंका चावडा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मानद संचालक प्रा. डॉ. मनिष रघुनाथ करंजे तसेच प्रशासकीय अधिकारी, कर्मचारीवर्ग, विद्यार्थी व संशोधक यांनी सहकार्य केले.

## पाचवी-आठवी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पाचोरा तालुक्यात तेरा केंद्र

**पाचोरा :** पाचवी आणि आठवी विद्यार्थ्यांची शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा रविवारी २२ फेब्रुवारी रोजी पाचोरा तालुक्यातील तेरा केंद्रावर होणार आहे. गटशिक्षणाधिकारी विजय पवार व अधीक्षक सरोज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती परीक्षा सुव्यवस्थेसाठी नियोजन करण्यात आले आहे.

इयत्ता पाचवीसाठी एक हजार २६२ आणि आठवीसाठी ६६९ असे एकूण एक हजार ९३१ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रविष्ट आहेत. परीक्षा नियंत्रणासाठी प्रत्येक केंद्रावर भेटीचे नियोजन करण्यात आले आहे. शिष्यवृत्ती परीक्षा कामकाजासाठी गट शिक्षणाधिकारी विजय पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड, गिरीष भोयर, सुनील शिवदे, नूर खान, राकेश धायबर तसेच सर्व केंद्र प्रमुख कार्यवाही करत आहेत.

मिशन स्कॉलरशिप उपक्रम अंतर्गत यावर्षी दोन सराव परीक्षा घेण्यात आल्या आहेत. शाळा स्तरावर नियमित मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले असून परीक्षेत कोणताही गैरप्रकार झाल्यास कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे गट शिक्षणाधिकारी विजय पवार यांनी म्हटले आहे.

## शहरासह जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



### देवगिरी माध्यमिक विद्यालयात शिवजन्मोत्सव

**जळगाव :** देवगिरी माध्यमिक विद्यालय एमआयडीसी कुसुंबे खुर्द येथे शिवजन्मोत्सव उत्साहात पार पडला. यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील गड, किल्ले बनवून, पोवाडे गायन तसेच शिवदींडी काढुन छत्रपतींचा जयघोष करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे माजी उपसरपंच प्रमोद घुगे, पंडीत सपकाळे, सुनीता ठाकुर, श्री जयहरी महीला भजनी मंडळ, मुख्याध्यापक रविंद्र.पाटील, रूपाली चौधरी, माधुरी चौधरी, मंगला देवरे, हर्षा राणे, दलशेर तडव, श्वेता, व अमोल माळी आदी कर्मचारी परिश्रम घेतले.



### मंगलाई फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबीर उत्साहात

**चाळीसगाव :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मंगलाई फाउंडेशन व धुमाळ कोचिंग क्लासेस तर्फे रक्तदान शिबीर उत्साहात पार पडले. यावेळी स्वराज्यासाठी रक्त सांडण्याची संधी मिळाली नाही. म्हणून काय झाले आता सुराज्यासाठी रक्तदान करूया अश्या आवाहनामुळे शहरातील ४४ शिवभक्तांनी रक्तदान केले. यावेळी विजय वाघ, शैलेश बोंबिडकर, इश्वंर अहिरे, देविदास गिरणारे, आनंद मोरे, प्रशांत चौधरी, सागर धुमाळ, डिगंबर पाटील, अनुज पाटील आदी शिवभक्तांनी रक्तदान केले. सुरभी ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले. यशस्वीतेसाठी कृष्णा गवळी, अनुष्का दुसे, धनश्री पाटील, स्वरा शेलार, सिध्दी भोई, तपश्री अग्रवाल,वर्षा चव्हाण, वैष्णवी पाटील, अक्षदा भोईटे, पार्थक गायकवाड, वैष्णवी गवळी, समर गवळी, प्रतिक पाटील आदींचे सहकार्य लाभले.

### साळवे इंग्रजी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

**धरणगाव :** तालुक्यातील साळवा येथील इंग्रजी विद्यालयात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यालय परिसर भगव्या पताका, फलक व घोषवाक्यांनी सजविण्यात येवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करीत आरती करण्यात आली.

मुख्याध्यापक एस. डी. मोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श नेतृत्व, शौर्य, संघटनकौशल्य आणि स्वराज्य स्थापनेतील योगदान याविषयी मुख्याध्यापक मोरे यांनी प्रास्ताविकात माहिती देत विद्यार्थ्यांनी महाराजांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी महाराजांचे बालपण, जिजाऊंचे संस्कार, तोरणा जिंकण्याची घटना, अफझलखान वध आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेचा इतिहास तसेच देशभक्तीपर गीत व



पोवाडे सादर के ले.

इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, स्त्रीसन्मानाची भूमिका आणि स्वराज्याची प्रेरणा आदी नाट्यछटेतून सादरीकरण केले. सूत्रसंचालन बी. आर. बोरोले यांनी केले. रंजना नेहेते व प्रतिभा पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जी. व्ही. नारखेडे, एस. व्ही. राठोड, व्ही. के. मोरे, गुणवंती पाटील, वर्षा नेहेते, पौर्णिमा वारके आदी शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### नगरदेवळ्यात अश्वारूढ पुतळा व स्मारक उभारणार

**नगरदेवळा :** येथे अग्नावती बाजारपेठ पाचकंदील चौकात, भव्य अश्वारूढ पुतळ्याचे सजीव स्मारक साकारून सरपंच प्रतिक्षा काटकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पुजन व शिव महाआरती करीत मोठ्या जल्लोषात शिवजयंती उत्सव उत्साहात पार पडला.

शिवजयंती उत्सवानिमित्त जय बजरंग व्यायाम मंडळ व शिवजयंती उत्सव समितीने छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचा सुंदर स्मारक देखावा उभारला होता. यावेळी ग्रामस्थांनी व तरुणाईने पुढील वर्षापर्यंत असाच अश्वारूढ पुतळ्याची व स्मारकाची उभारणी करण्याची शपथ घेतली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मनोहर पाटील, प्राचार्य किरण काटकर, उदयोजक प्रणय भांडारकर, माजी उपसरपंच सागर पाटील, पिंटू भामरे, शैलेंद्रसिंह जयाती, राकेश थेपडे, अरविंदसिंह परदेशी, सागर पाटील, भैय्या पाटील, आदींनी पुढील स्मारक उभारणीची व सर्वोतोपरी मदतीची प्रतिज्ञा घेतली. सजिव स्मारक देखावा उभारण्यासाठी जय बजरंग व्यायाम शाळेच्या व शिव प्रेमी तरुणाईने रात्रभर जागून देखाव्याची उभारणी केली. त्यांचे समस्त ग्रामस्थ व सर्व पक्षीय नेत्यांनी कौतुक केले. शहर व परिसरातील बजरंग दल शाखा नगरदेवळा, सरदार एस के पवार उच्च माध्यमिक विद्यालय, ग्राम सचिवालय नगरदेवळा, विवीध कार्यकारी सोसायटी, संगमेश्वर जि प प्राथ शाळा, जिपप्राथ शाळा नगरदेवळा सिम, पिंपळगाव खुर्द, होळ ग्रामपंचायत, टाकळी ग्राम पंचायत, विवीध पतसंस्था, बुलढाणा अर्बण बँक, आदिसंह विवीध संस्था व आस्थापनांतर्फे शिवजयंती उत्सव उत्साहात पार पडला.

www.tarunbharat.net
तरुण भारत
# आकांक्षा
शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६

## दाट आणि लांब केसांसाठी...

नवीन केस वाढविण्यासाठी आणि केसांची लांबी वाढवण्यासाठी, लोक अनेकदा पार्लरमध्ये जातात आणि केसांच्या काळजीपोटी उपचारांवर शेकडो पैसे खर्च करतात. पण, तुम्ही घरी नैसर्गिकरित्या नवीन केस वाढवू शकता आणि पैसे वाचवू शकता. हा घरगुती उपाय केसांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतो. चला या घरगुती उपायाबद्दल जाणून घेऊ या. नवीन केस वाढविण्यासाठी भृंगराज आणि नारळाचे दूध वापरा, केस गळण्याची समस्या दूर होईल.

### हेअर पॅक कसा बनवायचा?

घरीच औषधी गुणधर्म असलेल्या हेअर पॅक कसा तयार करायचा, हे बघू या. हा केमिकल मुक्त हेअर पॅक बनवण्यासाठी २ चमचे भृंगराज पावडर आणि थोडे नारळाचे ताजे दूध घेऊन एका भांड्यात हे दोन नैसर्गिक घटक एकत्र करा आणि ते छान मिसळून घ्या. ही पेस्ट केसांची काळजी घेण्यासाठी दैनंदिन दिनचर्येत हेअर पॅक म्हणून समाविष्ट करा.

### कसे वापरावे?

हा हेअर पॅक केसांना पूर्णपणे लावा. सर्वोत्तम परिणामांसाठी, हा पॅक केसांवर सुमारे ४० मिनिटे ठेवून कोणत्याही सौम्य शॅम्पूने धुवून टाका. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा हा औषधी हेअर पॅक वापरा. साधारण एका महिन्याभरात सकारात्मक परिणाम दिसतात. केवळ नारळाचे दूध केसांच्या मुळांशी हलक्या हाताने चोळून लावल्यासही केस दाट आणि चमकदार होतील.

### केस गळतीपासून मुक्तीसाठी?

जर तुम्हाला केस गळतीपासून मुक्ती मिळवायची असेल, तर हा नैसर्गिक हेअर पॅक वापरण्यास सुरुवात करा. या हेअर पॅकमधील विविध पोषक घटक नवीन केसांच्या वाढीस चालना देऊ शकतात. भृंगराज आणि नारळाच्या दुधाचे मिश्रण तुमच्या केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रभावी ठरू शकते

कव्हर स्टोरी

रजनी पेंडसे

## भाजी तर घरी आली आता?

निशा आणि उमाने बाजारातून फेरफटका मारला आणि एकदम खुशीने डोलतच, दोन्ही हातात जड पिशव्या तोलत घरात प्रवेश केला. भाज्यांचा सुकाळ, सर्वत्र दिसणाऱ्या ताज्या, टवटवीत, हिरव्यागार भाज्यांनी मन मोहरून जाते आणि जिभेला पाणी सुटते. कोणाला मटाराची करंजी तर कोणाला कोबीचा गरमागरम रस्सा तर कित्येकांना मेथीची भजी! तर, काहींना शेतातल्या ताज्या हुरड्यासोबत वांग्याची भाजी अथवा निखाऱ्यावर भाजलेल्या वांग्याच्या भरताबरोबर, लाल चटणीसह भाकरी खायची इच्छा स्वस्थ बसू देत नाही. तर या धरतीच्या वैभवाचा रसास्वाद घ्यायचा असेल तर काही विशिष्ट पथ्ये पाळणे आवश्यक आहे. हा लेखप्रपंच फक्त स्त्रियांसाठी नसून, लहानमोठ्या सर्वांसाठी आहे. कारण, सर्वांनाच या गोष्टी जाणून घेण्याची आवश्यकता आहे. मुळात आता स्वयंपाकघर हे क्षेत्र स्त्रीपुरतेच मर्यादीत नाही कारण, श्रमविभागणीचा नियम कौटुंबिक पातळीवर लागू झाला आहे. या सर्व गोष्टी काळजी करण्यासाठी लिहिलेल्या नसून आरोग्यपूर्ण जीवनाचा रसास्वाद घेता यावा म्हणून काळजी घेण्यासाठी लिहिल्या आहेत.

कित्येक समृद्ध घरांमध्ये घरातल्या कोणत्याही सदस्याला साधे घरात डोकवायचीही गरज वाटत-पडत नाही. कारण, सर्वच गोष्टींना नोकर असतात तर, ह्याच नोकरांना प्रशिक्षित करावे व गरज वाटत असेल तर आरोग्यकारक/ आरोग्यपूरक स्वच्छतेसाठी (हायजिन) एखाद्या अधिक माणसाला नेमावे. प्रगत देशातही यातील काही गोष्टी पाळायची आवश्यकता असते कारण, दर्शनी स्वच्छ दिसले तरी हायजिनची वानवाच असते.

तन्मयने हुश्श करत भाजीच्या पिशव्या डायनिंग टेबलवर ठेवल्या आणि तिकडून आई ओरडली. 'हा काय घाणेरडेपणा!' आणि लगेच आपली चूक तन्मयच्या लक्षात आली आणि त्याने पिशव्या उचलून खाली ठेवल्या. बहुतेक घरी बाहेरून आणलेल्या भाजीच्या अथवा कोणत्याही पिशव्या अथवा अन्य गोष्टी सहजगत्या, सहज उपलब्ध असलेल्या मध्यवर्ती उंच, मोकळ्या परिसरावर म्हणून डायनिंग टेबलवर ठेवल्या जातात, यात फक्त सोय पाहिली जाते. पण, या सर्व गोष्टी कुठून कुठला प्रवास करून आल्या आहेत, हे पहाणं नितांत गरजेचं आहे. भाजी रस्त्यावरची, दुकानातली, मॉलमधली! तिथे रस्त्यावर, जमिनीवर, भाजीवर पिशवी ठेवली जाते किंवा घरी येताना, स्कूटर, रिक्षा, कारमध्ये पाय ठेवायच्या जागी ही पिशवी ठेवली जाते. असा प्रवास करून आलेली पिशवी, अनेक सोबत्यांना पोल्युटंटस्, जीवजंतू, घाण, धूळ, चिखल घेऊन घरात येते. ती आणून जर डायनिंग टेबलवर ठेवली तर मग आरोग्यपूर्ण जीवनाच्या सत्यानाशाचा आपणच आरंभ केला नं!

म्हणून अशा गोष्टी ठेवण्यासाठी, एक नियोजित जागा उपलब्ध ठेवावी. म्हणजे उत्तर आयुष्यात समोर वाकणे टाळून कंबर, पाठदुखी ओढवून घ्यायला नको. आता सर्वप्रथम भाजी खरेदीची तयारी. आपल्याजवळ नेहमीच, वेगवेगळ्या आकाराच्या जाड-पातळ पिशव्या, शक्यतोवर कापडी, पर्समध्ये, स्कूटरच्या डिकीत, कारमध्ये ठेवाव्या म्हणजे प्लास्टिक वापरावर आपोआपच आळा बसेल. भाजी घेतानाच वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये घ्यावी म्हणजे पालेभाजीची तुटलेली पाने व मुळांची माती इतर भाज्यांना लागणार नाही. फळभाज्या, शेंगा, कच्च्या खायच्या भाज्या व फळे



सर्व वेगवेगळे घ्यावे कारण, धुण्याच्या दृष्टीने सोयीचे कसे जाईल ते पुढे विस्ताराने लिहिले आहे.

आता सर्वच जणांना प्लास्टिकला नाकारण्याची भरपूर जाण आली आहे, त्याची निर्मिती व नाश दोन्हीमध्ये निसर्गाचा ऱ्हास होतो व आता आपल्याला सर्व प्राणीमात्रांच्या आरोग्याच्या हानिकारकतेविषयीची कल्पना आली आहे. भाजी घेताना ती ताजी व कोवळी असावी ही तर अगदी मुळातील गोष्ट! पण, ती ऑरगॅनिक हवी असेल तर त्याविषयी संपूर्ण जाण हवी, ती खरोखरच ऑरगॅनिक आहे का? असली तरीही प्रत्यक्ष आपण घेतलेली भाजी ऑरगॅनिक असेलच असे नाही. तुमच्या शेतातील माल जर ४० टक्क्यांच्यावर ऑरगॅनिक असेल तर तुम्हाला ऑरगॅनिकचे सर्टिफिकेट मिळते.

ही भाजी तर घरी आली आता आरोग्यदायिकतेसाठी तिचा योग्य तसा वापर करणे, साठविणे, जीवनसत्वे व पौष्टिक मूल्ये जपणे, हे सर्वात महत्त्वाचे! आता भाजी धुणे हे सर्वात पहिले काम! भाजी धुण्याचा क्रम हा ठेवल्यास, पाण्याच्या बचतीबरोबरच तुमच्या कष्टाची बचत होईलच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे हायजिन, आरोग्यकारक स्वच्छता राखली जाईल.

पुष्कळ लोक भाजी धुण्याचा भाग म्हणून, भाजी चिरून पाण्यात टाकतात. याने काही भाज्या काळ्या पडण्यापासून वाचत असल्या तरी ही पद्धत चुकीची आहे कारण, पृष्ठभागावरील त्याज्य गोष्टी अंतरंगाला लागतात. भाज्यांतील अनेक पोषणमूल्ये, बहुमुल्य जीवनसत्वे पाण्यात विरघळून नष्ट होतात. आता हे सर्व वाचल्यावर अथवा अर्धा वाचल्यावरही अनेकांचे हे मत असेल,'हे नसते धंदे करत बसायला आहे कोणाला वेळ? पण, आरोग्यपूर्ण जीवनाची ही गुरुकिल्ली आहे. ते साधायचं असेल तर हे आवश्यक आहे कारण, डॉक्टरकडे जाणारा वेळ, पैसा, आरोग्याची हानी वाचवायची असेल तर हे सर्व अत्यावश्यक आहे. योग्य नियोजनाने, वेळेच्या व्यवस्थापनाने हे सहज शक्य आहे. आठवड्यातून एकदा घालविलेले हे २ तास, वेळेवरची धावपळ वाचविणारे आहेत.

भाजी धुताना जरा मोठ्या व मोकळ्या तोंडाची भांडी घ्यावीत. त्यात अध्यपिक्षा कमी पाणी घ्यावे व त्यात सर्वप्रथम न सोलता खाण्याची फळे टाका. भरपूर पाण्यात खळबळून, शक्य असल्यास चोळून दुसऱ्या व मग तिसऱ्या भांड्यातून काढून निथळत ठेवावी. सोयीप्रमाणे हलके अथवा चोळून-पुसून कोरडी करावी. फळे भाज्या धुण्यात, वाहतूक व दुकानामध्ये बसलेली धुळ व प्रदुषकांबरोबरच शेतात असताना व भाजी तोडल्यावरही मारलेली कीटकनाशके, जंतुनाशके, खते व प्रिझरवेटीव्हज्चा समावेश असतो. आकर्षक दिसण्यासाठी व टिकाऊपणा वाढविण्यासाठी रंग व रसायने वापरली जातात. त्याच्याविरोधात अनेक कायदे असूनही व त्याचा अनेक तऱ्हेने निषेध होऊनही! धुताना काही अंशी जरी नष्ट झाली तरी काही प्रमाणात ती अंतरंगात प्रवेश करतात व त्यांचा पूर्णतः निचरा करणे अशक्य असते. त्यासाठी खरेदीच्या वेळीच दक्ष राहून, अशा भाज्या, फळे घेणेच टाळावे. सफरचंदासारख्या फळांवर चकाकीसाठी मेणासारख्या पदार्थांचा अतिशय पातळ थर दिलेला असतो. तो किती घातक आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. आजकाल सर्व माहिती बोटाच्या टोकावर, गुगलवर उपलब्ध असते. म्हणून प्रत्येक ग्राहकाने जागरूक राहून, ग्राहक संरक्षणाच्या कायद्याचा आधार घेऊन, अशा अनिष्ट गोष्टींविरुद्ध लढा देऊन स्वतःबरोबर, समाजाचेही रक्षण करावे. आता मोदी सरकारमुळे अशा लढ्यांच्या यशाची आशा उंचावली आहे. खरे तर मुख्य विषय बाजूला राहिला पण, त्यानुषंगाने हे सर्व लिहीणं क्रमप्राप्तच होतं.

तर सर्वात प्रथम जी फळे सालासकट खातो ती धुवावीत. नंतर जी साले काढून खातो, ती बेताची, एकाच पाण्यात धुवायला हरकत नाही. पण, अवश्य धुवावीत. फळावरच्या सालीची घाणच हाताला लागून ती पोटात जाईल. ही फळे पहिल्या भांड्यातून काढून, दुसऱ्या पाण्यात व आवश्यकतेनुसार चोळून- धुवून तिसऱ्या पाण्यात टाकावीत. या टप्प्यात आपण पाण्याबरोबर आलेला घाणीचा उर्वरित अंश नष्ट करतो. मग एखाद्या धातूच्या चाळणीत अथवा बांबूच्या टोपलीत निथळायला ठेवावीत. निथळल्यानंतर स्वच्छ कापडाने पुसून ठेवावी. ही फळे बंद डब्यात फ्रीजमध्ये ठेवल्यास त्याचा ताजेपणा भरपूर दिवस टिकतो.

आता हे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या भांड्यातले पाणी बदलत जावे. प्रथम पहिल्या भांड्यातले पाणी फेकून ते भांडे धुवून घ्यावे. दुसऱ्यातले पहिल्यात, तिसऱ्यातले दुसऱ्यात व तिसऱ्या भांड्यात नवीन पाणी घ्या. आवश्यकतेनुसार हे करत जावे म्हणजे स्वच्छ पाण्याचा स्रोत उपलब्ध राहील. हे पाणी जमा करून अंगणात किंवा गच्चीत झाडांना देता येईल.

दुसरा नंबर कच्च्या खायच्या भाज्यांचा, टोमॅटो, गाजर, मुळा, काकडी, बीट वगैरे! या भाज्या धुण्यासाठी एखादा छोटा, मोठा ब्रश वापरून त्यातील माती काढण्यास सहाय्य घेऊ शकता. फळे व कोशिंबीरीच्या भाज्या आपण न शिजविता खातो, शिजविण्याच्या प्रक्रियेमधे पुष्कळशा जंतूंचा नाश होतो. त्यामुळे, ज्या गोष्टी कच्च्या खायच्या त्या बाबतीत जास्त जागरूक रहायला हवे. आणलेले तुरी, हरभरा, मटार, चवळी, डबलबीन्ससारखे ओले दाणे धुण्यासाठी छोटे भांडे वापरावे. हे तर सर्व वेगवेगळेच धुवायला हवेत. पाण्यात टाकल्यावर फोलपटे व कचरावर तरंगू लागतो व तो काढून टाकणे सोपे जाते. माती-वाळू खाली बसते.

कच्च्या भाज्यांनंतर फळभाज्या, शेंगा, भेंडी वगैरेसारख्या भाज्या एकत्र धुवायला हरकत नाही. कारण, निवडताना त्या वेगळ्या करणे सहज शक्य असते व त्या शिजवूनच खायच्या असतात. आता सर्वात शेवटी पालेभाज्या धुवाव्या पण, त्यात प्रथम कोथिंबीर धुवावी. ती आपण बरेचदा कच्ची खातो. ही धुवून, पसरून सुकवलेली कोथिंबीर, एखाद्या घट्ट झाकणाच्या डब्यात कोरडे कापड अथवा टिशू पेपरमधे थरांवर ठेवल्यास अगदी १०-१२ दिवसही छान ताजी रहाते. अर्थातच हे टिकणे बऱ्याच अंशी ऋतुमानावर अवलंबून असते. पालेभाज्या आधी धुतल्यास त्याची पाने व देठांची माती इतर भाज्यांना चिकटू शकतात व ती काढणे कठीण जाते. पालेभाज्या धुण्यापूर्वी त्याची मुळे एखाद्या सुरीने कापून घ्यावी, म्हणजे मातीचा बराच भाग आधीच फेकला जाईल व निवडायलाही सोपे जाईल. या भाज्या आधी निवडून घेऊन मगच धुवाव्यात. धुतल्यावर धातूच्या चाळणीत किंवा बांबूच्या टोपलीत निथळत ठेवा. नंतर खाली थोडी जाडसर वर्तमानपत्राची चळत व त्यावर जाडसर कापड टाकून, ऋतुमानानुसार हडकल्यावर वापरण्यास तयार! कागदावर कापड अवश्य टाकावे कारण, वर्तमानपत्राचा कागद व त्याची शाईतील केमिकल्स हानिकारक असतात. पालेभाज्या शक्यतो लगेचच वापराव्यात नाहीतर जाड कापडात गुंडाळून बंद डब्यात ठेवाव्यात म्हणजे त्याचा ताजेपणा टिकतो किंवा शिजवून फ्रिजमध्ये ठेवून हव्या तेव्हा वापराव्या.

कांदे, लसूण धुवायची गरज नाही. त्यांना नुसतेच झटकून ठेवता येईल. पण, बटाटे मात्र प्रथम कोरड्या कापडाने पुसून मगच धुवावेत कारण, बटाट्याच्या सेमीपरमिएबल मेम्ब्रेनमुळे सालातून होणाऱ्या औसमौसीसमुळे त्यावरची कीटकनाशके, जंतुनाशके, प्रिझरवेटीव्हज् बटाटे पाण्यात टाकल्यावर, आत प्रवेश करतात.

आल्याला खूप माती असते, म्हणून ती प्रथम झटकून, आले थोडावेळ भिजत घालून धुवावे लागते. मटर, तूर, पोपटी वगैरेसारख्या शेंगा एकातरी पाण्यातून काढून घ्याव्या म्हणजे शेंगांवरील घाण दाण्यांना व सोलताना हातांना लागत नाही. मग पहा कशी मजा येते शेंगा सोलायला! पत्ताकोबीची वरील पानं काढून टाकली की झालं! धुवायची गरज नाही. फुलकोबीचे मात्र तुरे तोडून घ्यावे व धुतल्यानंतर, थोडे मीठ व हळद टाकलेल्या पाण्यात टाकून ठेवावे. नंतर उपसून ठेवून भाजी करणे जास्त चांगले! त्यात बारीक, न दिसणाऱ्या अळ्यांचाही नाश होतो.

भुईमूगाच्या शेंगा धुणे फारच जिकिरीचे! त्या तर आधी काही वेळ पाण्यात बुडवून ठेवाव्या लागतात व बरेचदा पाणी बदलल्यावरच स्वच्छ होतात. पण अशा या धुतलेल्या शेंगा भाजून अथवा उकडून खाताना केलेल्या श्रमांचे सार्थक वाटते.

कोणतीही भाजी ताजीच खावी, अनेकांनी शेतावरच्या सहलीतील माफक पदार्थ वापरून केलेल्या ताज्या भाज्या, कणसे-हुरडा यांच्या अवीट गोडीचा आस्वाद घेतला असेलच तर, तो परिणाम नुसत्या वातावरणाचा नसून ताजेपणामुळे इन्टॅक्ट (नष्ट न झालेल्या) असलेल्या जीवनसत्वे, खनिजे व सर्व पोषकद्रव्यांचा असतो, म्हणूनच त्याची गोडी वेड लावते!

पालेभाज्या, ओले दाणे शक्यतो ताजेच खावे अथवा वाफवून तरी ठेवावे. त्याने त्यातील पोषणमूल्ये अबाधित रहातात. कुकरमधे शिजविण्याने आपण बंद, कमी तापमानाला प्रेशरने शिजविण्याने जास्तीत जास्त पोषणमूल्ये अबाधित ठेवतो.

तसेच फुरसतीच्या वेळेत, शेंगा व तत्सम भाज्या निवडून फ्रीजमध्ये घट्ट झाकणाच्या डब्यात ठेवल्यास, त्या २/४ दिवस छान ताज्या राहतात व स्वयंपाकाच्या वेळी सोयीचे जाते. अशा भाजीत ती फोडणीत टाकण्यापूर्वी १०-१५ मिनिटे गरम पाणी टाकून ठेवावे व निथळून घेऊन फोडणीत टाकावी. यामुळे दाठरत तर नाहीच उलट झटपट शिजायला मदत होते.

भाजी निवडणे, चिरणे हेच स्वयंपाकघरातील सर्वात किचकट व वेळखाऊ काम असते. खरं तर विशिष्ट स्वच्छतेसाठी म्हणजे सफरचंद, बोरं वगैरेसारख्या फळांवरचा मेणासारख्या पदार्थांचा पातळ थर नष्ट करणे, आकर्षक रंग टिकविण्यासाठी व आकर्षकतेसाठी वापरलेल्या केमिकल्सचा नायनाट करणे, कीटकनाशके, जंतुनाशके यांच्यापासून सुटका करणे हा या लेखाचा अविभाज्य भाग असला तरी तो विस्तारभयाने टाळला आहे. केमिकल्स, प्रदूषणाच्या वाढत्या प्रमाणामुळे जुन्या काळापेक्षाही आता या गोष्टी पाळण्याची जास्त आवश्यकता आहे. पुष्कळ लोक भाजी धुण्याचा भाग म्हणून, भाजी चिरून पाण्यात टाकतात. याने काही भाज्या काळ्या पडण्यापासून वाचत असल्या तरी ही पद्धत चुकीची आहे कारण, पृष्ठभागावरील त्याज्य गोष्टी अंतरंगाला लागतात. भाज्यांतील अनेक पोषणमूल्ये, बहुमुल्य जीवनसत्वे पाण्यात विरघळून नष्ट होतात. आता हे सर्व वाचल्यावर अथवा अर्धा वाचल्यावरही अनेकांचे हे मत असेल,'हे नसते धंदे करत बसायला आहे कोणाला वेळ? पण, आरोग्यपूर्ण जीवनाची ही गुरुकिल्ली आहे. ते साधायचं असेल तर हे आवश्यक आहे कारण, डॉक्टरकडे जाणारा वेळ, पैसा, आरोग्याची हानी वाचवायची असेल तर हे सर्व अत्यावश्यक आहे. योग्य नियोजनाने, वेळेच्या व्यवस्थापनाने हे सहज शक्य आहे. आठवड्यातून एकदा घालविलेले हे २ तास, वेळेवरची धावपळ वाचविणारे आहेत.

कुटुंबातील सर्वांच्या सहभागाने, मुलांना मजा तर येईलच पण सहकार्याच्या महत्वाबरोबरच, स्वच्छतेचे महत्त्वही समजेल. हे करताना सर्व कुटुंबाला एकत्र वेळ घालवून मजा येईल. ही स्वच्छ धुतलेली हिरवीगार भाजी, शाश्वत नयनसुखाबरोबरच, पोषणमुल्यांची जपणूक करेल. भलभलते रोग ओढवून मग त्यावर उपाययोजना करण्यापेक्षा, प्रथमच जर ही लहानशी काळजी घेतली तर निश्चितच त्या आपल्याला आरोग्यपूर्ण जीवनास सहाय्य करतील.

## परसदारीची किमया!



पाच-सात वर्षांपूर्वीची गोष्ट! डब्यातून चवळी काढली आणि लक्षात आलं, चवळीला भुंगा लागलाय. कडधान्यं शक्यतो मी फ्रिजरमध्ये टाकते म्हणजे किडे-भुंग्यांचा त्रास होत नाही. नेमकी ही नवी आणलेली चवळी गडबडीत बाहेर राहून गेली असावी. संपवायच्या दृष्टीने मग मी ती सगळीच भिजवली. एवढी चवळी एकदम संपणार थोडीच होती पण, निदान हा भुंगा अधिक कुठे पसरून वाढू नये म्हणून सगळीच भिजवली. दुसऱ्या दिवशी सकाळी 'रोजच्या व्यस्त वेळापत्रकात विसरघोळ घातला की हे असं पुढे काम वाढतं,' असं म्हणत डोक्यातल्या विचार भुंग्यासोबत भिजलेली चवळी पटापट निवडायला घेतली. नेहमीसारखा खराब भाग बाजूला काढून उरलेलं दल घेण्याची काटकसर बाजूला ठेवत मी भुंगा लागलेल्या सगळ्या आख्या चवळ्याच बाजूला काढल्या आणि पुढच्या स्वयंपाकाला लागले.

जलसमाधी मिळालेल्या भुंग्यांना पोटात घेऊन त्या चवळ्या ओल्या कचऱ्याच्या पिशवीशी ३-४ दिवस पडून होत्या. ओट्याची आठवड्याची साफसफाई करताना माझं लक्ष गेलं. चवळ्यांची दलं वेगळी होऊन भुंग्यांची प्रेते बाजूला सारत प्रत्येकीला इंचभर मोड आणि सुंदर पोपटी अंकुर फुटला होता. मला गंमत वाटली. मी लागलीच ती ताटली हातात घेतली आणि बाहेर परसदारी बागेतल्या कुंड्यांमध्ये जिथे जागा होती तिथे त्या अंकुरलेल्या चवळ्या हळुवार खोचून टाकल्या.

थंडी संपून वसंत ऋतूची चाहूल घेत त्या चवळ्यांची रोपे मस्त तरारली आणि नंतरच्या दोन पावसात फुलं येऊन शेंगांनी मढलीही! काळीज पोखरणाऱ्या भुंग्यांना हार न मानता जगण्याची केवढी जिद्द दाखवलीत गो...माझं बोलणं जणू काही कळतंय अशा आविर्भावात, वाऱ्याच्या मंद झुळुकीवर किंचित डोलत ती रोपं जणू गर्भवतीचा साज लेऊन सस्मित शहारली! फार मजा आली ती दिगुण-तिगुण हिरवट पिवळी कोवळी चवळीची चवदार उसळ खाताना!

या चवळ्यांनंतरच्या एका वर्षीची नवरात्र! अंगणातील झेंडूला भरभरून बहर आलेला होता. दसऱ्याच्या दिवशी तर ऊत आल्यासारखी फुलं! झेंडूच्या वासाखेरीज दसऱ्याची सकाळ झाली, असं वाटतंच नाही. टोपल्यांनी वेचला पहाटे, तरी फुललेल्या बागेची परडी तशीच! भरगच्च हार, सगळीकडची पूजा करून वर एक छोटी बास्केट मी ऑफिसमध्ये नेली. सहकारी मैत्रिणींनी उत्साहाने खोलीच्या सगळ्या खिडक्यांमध्ये झेंडूच्या माळा ठेवल्याप्रमाणे सजवली, फुलांची रांगोळी काढली. बॉसने कुतूहलाने फोटो काढले. आजूबाजूचे देशी लोकही खूश...अगदी फेस्टिव्ह फीलिंग म्हणून!

टेक्ससमध्ये साधारण ऑक्टोबरच्या मध्यानंतर येऊ घातलेल्या हिवाळ्याबरोबर दसरा, दिवाळीचा सण-उत्सव! आठवडाभराच्या हवामान पालटाला अनुरूप पडायला लागलेल्या थंड रात्रीनंतर सकाळी मस्त पिवळं उबदार ऊन, डोलणारी कर्दळ! मोदक, फुनके वा कोथिंबरीवडी उकडताना खाली पसरलेल्या कर्दळीच्या पानांचा तो स्वाद! पावसाने तरारून वाढलेली ही कर्दळपाने काही दिवसात थंडीने थिजून जातील त्याआधीची अशीच एक आठवण! दुपारच्या जेवणाचा तसा साधाच बेत! घरच्या कारल्याच्या काचऱ्या, मिश्र भाज्यांची खिचडी, त्यातला दुधी परसदारीचाच, पापड, चटण्या, काकडी, नाचणीची भाकरी, बागेतल्या दोडक्याची खीर हे सगळं पानावर मांडलं. धमाल येते खरी असं जेवायला! पोपटी-हिरवी पाने अन् त्यावर वाढलेला हा स्वयंपाक...आहा!

सायली मोकाटे-जोग / +१(८१८) ६२०-७११९

अडीच वर्षांपूर्वी चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाली त्यावेळी भारतीय मनाला अनुभवास आलेली शीतलता खास होती. मात्र त्यावेळची आमची पृथ्वीवरची स्थिती वेगळी झालेली होती. चेरापुंजी, मेघालय, सोलापूर, पुणे, मुंबई असा पाऊस झेलून न्यूयॉर्कला राहून मी ऑस्टिनला पोहोचले ते 'कडक उन्हाळ्याची तयारी ठेवा' हा इशारा ऐकत! टेक्ससच्या उन्हाने उष्म्याचा उच्चांक गाठलेला असताना दिवसा बाहेर बघवत नव्हतं. त्यात पाणी वापरावर तिसऱ्या पातळीचा नियंत्रण आदेश जारी झालेला! घराभोवतीची सगळी लॉन सुकून पिवळी, जमिनीला मोठ्या मोठ्या भेगा गेलेल्या, झाडांची दशा बघवत नाही अशी!

यावेळी एका बाजूच्या कोपऱ्यात कारलीबाई गरम वाऱ्यावर न वैतागता, भुरभुरलेले केस दिसावीत अशी पाने उडवीत उभी!

वातावरणानं मांडलेला हा दुष्काळ पाहात कारली लागण्याची शक्यताही नाकारून मी तिच्याकडे जाण्याचं टाळत होते. ती मात्र मला हाका मारतच राहिली. शेवटी ३-४ दिवसांनी सकाळी गेले. तिच्या पानांवर हात फिरवायला तर ही ५-६ कारली हाती लागली, कर्टुली असतात ना त्या आकाराची. १-२ बाळं ठेवून मोठी झालेली ही भाजी, नुसतीच पिकून बी होऊन जाऊ नये, म्हणून काढली. हाताच्या पंजात मावलेली ही इटुकली पिटुकली कारली सांबारात 'स्वाहा' होऊन पोटात गेली. निसर्ग हा आहेच मुळी किमयागार! त्या महिन्याच्या सुरुवातीला (ऑगस्ट २०२३) ना. धों. महानोर गेले. त्यांच्या लेखनातल्या काही ओळी...

ह्या शेताने लळा लाविला असा की,
सुखदुःखाला परस्परांशी हसलो-रडलो...
आता तर हा जीवच अवघा असा जखडला,
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो...



## मनमोहक गुलाब

गेल्याच आठवड्यात व्हॅलेंटाईन डेचा उत्साह सर्वत्र ओसंडून वाहात होता. प्रिय व्यक्तिला लाल गुलाब देऊन मनातील भावना व्यक्त करण्याचा, प्रेमाची कबुली देणारा किंवा प्रेमी जीवांसाठी समर्पित असणाऱ्या या दिवशी युवा मंडळीची इतर साहित्यासह गुलाब खरेदीकडे ओढ वाढलेली असल्याने फुलांच्या राजाचा भाव वाढला होता.

प्रेमाचे प्रतिक असणारे गुलाब पुष्पाची विश्वासाने देवाण घेवाण होते. खरं तर हा मैत्री दिवसही आहे. आपल्याबद्दल सद्भावना असणारे मित्रमैत्रिणी, परिवारजन यांच्याबद्दल स्नेह, प्रेम, आपुलकी, दया आणि आभार व्यक्त करण्याची संधी असते. पण, ते सर्व बाजूला सारून भलतीकडेच युवकांचा कल दिसतो. काही देशात २२ सप्टेंबर हा दिवस 'गुलाब दिवस' म्हणून साजरा करतात. आपल्याकडे ती परंपरा नाही पण, इतर वेळीही गुलाबाची फुलं आपल्याला सहज आकर्षित करतात ते त्याच्या टवटवीत पाकळ्या, मंद सुगंध व विभिन्न मोहक रंगामुळे! या रंगावरून त्याचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी बारा जाती भारतीय असून अन्य विदेशी आहेत. पांढरा गुलाब सर्वात प्राचीन समजला जातो. गुलाबी रंगाच्या पाकळ्यांच्या वर्णावरूनच 'गुलाब' हे नाव त्याला मिळाले. हाच गुलाबी गुलाब देशी व औषधीदृष्ट्या उपयोगीही आहे.

लाल गुलाब हजारो वर्षांपासून प्रेमाचे प्रतिक मानला गेला आहे. या फुलामुळे मन मोहरतं तसं इतर प्रकारच्या लाल फुलांनी होत नाही. गुलाबाच्या जन्मस्थानाबद्दल अनिश्चितता असली तरी पाच हजार वर्षांपासून भारतीयांना गुलाब चांगलाच परिचित होता. म्हणूनच आयुर्वेद ग्रंथामध्ये गुलाबाचे सविस्तर वर्णन केले असून औषधी उपयोग सांगितले आहेत. आयुर्वेद संहितेत गुलाबाला विभिन्न नावे आली आहेत. जसे अनेक पाकळ्यांमुळे 'शतदला' म्हणतात तर सुगंधी पिवळे असंख्य व सुंदर केशर असल्याने 'चारूकेशर' म्हणतात. शोभिवंत व मनाला प्रसन्न करणारा असल्याने 'सुमना' म्हणतात. म्हणूनच रूग्णालयात आप्तांच्या भेटीला जाताना, यशवंतांचे अभिनंदन करताना,पाहुण्यांचे स्वागत करताना व मुख्य म्हणजे आपल्या प्रिय व्यक्तीसमोर प्रेम व्यक्त करताना, गुलाबाचा भरीव पुष्पगुच्छच देतात. मंद सुगंध असल्याने 'गंधाढ्या' म्हणतात तर मुख्य संस्कृत नाव आहे 'तरुणी' असे आहे. सर्व फुलांमध्ये सरस व आकर्षक असल्यामुळे तरुणी कुलातील म्हणजेच रोजेसी फॅमिलीतील हे झाड आहे. वनस्पती शास्त्रात 'रोजा सेण्टी फोलीया' नावाने ओळखले जाते.

शतपत्री तरुण्युक्ता कर्णिका चारूकेशरा ।
महाकुमारी गन्धाढ्या लाक्षा पुष्पतिमंजुला ॥

भारताचे मुकुट असणारा काश्मिर प्रांत गुलाबासाठी प्रसिद्ध आहे. अमेरिकेच्या काही प्रांतात कुंपण नसलेल्या बागेत किंवा रस्त्याच्या कडेने नवनवीन आकर्षक रंगाचे गुलाबाचे झुपके शीतवाऱ्याला साद घालतात. देशी गुलाब तोडल्यावर लवकर कोमेजतो पण, कलम केलेला किंवा संकरीत गुलाब अधिक काळ टवटवीत राहतो. म्हणून पुष्प सजावटीत त्याचा अधिक उपयोग होतो. त्याचा भावही तसाच कडकडीत असतो. बरेच आधुनिक शेतकरी गुलाबाची शेती करतात व मोठा नफा मिळवत व्यापार करतात. बाकी बागेची शोभा वाढविण्यास रंगीबेरंगी गुलाब फुलविणारे हौशी बरेच असतात.

तलम गुलाबाला काटे मात्र कणखर असतात.नाजूक देहाच्या संरक्षणासीठी ते गरजेचे ही असते. गुलाब आरोग्यासाठी हितकर व सौंदर्य प्रसाधनात विशेष उपयोगी आहे. गुलाबाचा शरीरावर शीत परिणाम होत असल्याने उन्हाळ्यातील उष्णतेच्या त्रासापासून संरक्षण होण्यास गुलकंदाचा आभ्यंतर व गुलाबजलाचा बाह्य उपयोग करतात. या फुलांमध्ये शारीरिक विकासासाठी आवश्यक जीवनसत्व ए, बी३, डी, ई तसेच ओलीयम रोजी तैलसोबत टानिक व गैलिक एसिड असते. गुलाब पाकळ्यांचा उपयोग सौंदर्य प्रसाधनं जसे सुगंधी फेसपॅक, साबण, अत्तर, परफ्युम बनविण्यासाठी केला जातो तर औषधात गुलकंद, गुलाबजल, गुलाबअर्क बनविण्यासाठी करतात. कुठलेही हानीकारक प्रिझरवेटीव्ह न वापरता गुलाब पाकळ्या साखरेच्या पाकात भिजवून स्वादिष्ट व मोहक रंगाचे सरबत तयार होते. तर वाळलेल्या पाकळ्यांचे बाष्पीभवन प्रक्रियेने गुलाब अर्क तयार करतात. सौंदर्य प्रसाधनात अग्रेसर असणाऱ्या गुलाबासारखा टवटवीतपणा प्रत्येक स्त्रीला हवाहवासा वाटतो. त्यासाठी गुलाबाच्या ताज्या पाकळ्यांची पेस्ट करून त्यात चंदन पावडर मिसळून फेसपॅकप्रमाणे चेहऱ्यावर पातळ लेप पसरवून लावावा. तो वाळण्यापूर्वीच चेहरा थंड पाण्याने धुवून घ्यावा. उन्हाळ्यात दोनतीन चमचे गुलाबजल थंड पाण्यात टाकून त्याने चेहरा धुवावा. चेहरा फ्रेश राहतो. गुलाब पाकळ्या दुधात भिजवून डोळ्यावर ठेवल्यास, डोळ्यांची लाली व दाह कमी होतो.

मेकअप करण्यापूर्वी गुलाब जलात कापूस भिजवून क्लिंझिंग मिल्कप्रमाणे चेहरा स्वच्छ पुसून घ्यावा.मेकअप काढतांना ही गुलाब जलानेच हळूवार टिपून चेहरा स्वच्छ करावा.यामुळे त्वचेवरील छिद्र मोकळे होवून पुरळ ,पिंपल्स न येता त्वचा मुलायम व टवटवीत राहाते.ज्यांना खूप घाम येतो त्यांनी स्नानाच्या पाण्यात गुलाब जल टाकावे. सोबत गुलाब साबण व अत्तर वापरणे उत्तम! गुलाबाचा मंद सुगंध हवाहवासा वाटतो. म्हणून इतर अत्तरांपेक्षा गुलाब अत्तराची मागणी अधिक आहे. एक लाख फुलांतून एकच तोळा अस्सल अत्तर मिळते म्हणून महागडे असते. उत्तम स्वादासाठी गुलाब पाकळ्या औषधात व खाद्यपदार्थांत वापरतात. गुलकंदाचा उपयोग मिठाईत, विड्यात वापरून छान आस्वाद घेता येतो. पुढे येणाऱ्या उन्हाळ्याचा त्रास टाळण्यासाठी प्रत्येक आईने मुलांना दोन चमचे गुलकंद सकाळी खाण्यास द्यावा. ऊन लागणे, ताप येणे, डोळे लाल होऊन आग होणे, तळहाताचा दाह कमी होऊन उन्हाळा सुसह्य होतो. परीक्षांच्या दिवसात होणारे जागरण त्यामुळे भूक मंदावणे, तोंडात फोड होणे, कठीण मलप्रवृती होणे, डोळ्यांची आग, तळहातपायांची सालं निघणे ही सर्व लक्षणे गुलकंद खाण्याने कमी होतात. देशीगुलाबांपासून तयार केलेल्या उत्पादनांमुळे हृदयविकार, अल्सर, पित्ताचा त्रास टाळण्यास मदत होते.

हृदयातील मनाला प्रसन्न ठेवत असल्याने गुलाबाला 'हृद्य' म्हटले आहे. टवटवीत गुलाबाच्या नुसत्या दर्शनाने मन प्रसन्न होते. हृदयाची ज्ञानेंद्रांची तृप्ती होते, शेवटी खरे सौंदर्य अंतर्मनाच्या प्रसन्नतेवरच अवलंबून आहे. मन प्रसन्न असेल तर चेहराही प्रसन्न, आनंदी व डोळे भावूक दिसतात. म्हणूनच एक गुलाबाचे फूल देवाला मनोभावे वाहिल्यास देवघर पर्यायाने वास्तू प्रसन्न होते. युवतीने वेणीत लावलेली गुलाबाची टपोरी कळी तिचे सौंदर्य नक्कीच खुलविते.

डॉ. माधुरी वाघ / ९४२२१०९९९३

## आहार-विहार

डॉ. सीमा पांडे/ ९९२२९९९७२०

# पीसीओडीने त्रस्त आहात का?



हल्ली घराघरात आढळणारी समस्या म्हणजे पीसीओडी! एकदा पीसीओडी झाला की त्यातून आपली सुटका होईल का, काय खावं, काय करावं किंवा काय करू नये असे अनेक प्रश्न भेडसावतात. असं काय केलं म्हणजे आपल्याला ही समस्या होणार नाही? या प्रश्नाचं उत्तर मिळविण्यासाठी पीसीओडी हा विषय समजून घेणं आवश्यक आहे. पॉलिसिस्टीक ओव्हरीयन डिसीज याचंच संक्षिप्त रुप म्हणजे पीसीओडी! पीसीओडी किंवा पीसीओएस ही स्त्रियांशी संबंधित समस्या आहे. यात स्त्रियांच्या अंडाशयावर विपरित परिणाम झालेला असतो. अंडाशयाचं कार्य बिघडल्यामुळे शरीरामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. पीसीओडी ही सर्वसामान्य समजली जाणारी समस्या आहे. पीसीओडी म्हणजे नक्की काय? हे अगदी सोप्या शब्दात सांगायचं झालं तर, पॉली म्हणजे एकापेक्षा अधिक! सिस्टीक यातला 'सिस्ट'चा अर्थ गाठ असा होतो. ओव्हरी म्हणजे अंडाशय आणि डिसीज म्हणजे रोग. स्त्रियांच्या शरीरात एकापेक्षा अधिक अपरिपक्व अंडे तयार होतात आणि ते अधिक काळपर्यंत एकाजागी जमा झाल्यामुळे त्याची गाठ तयार होते. या गाठीमुळे अंडाशयाचा आकार वाढायला लागतो आणि अंडाशयातून मोठ्य प्रमाणात पुरुषी हार्मोन स्त्रवायला लागतो. याचा परिणाम म्हणून मासिक पाळी अनियमित होते. वंध्यत्व, केस गळणं, वजन वाढणं अशा तक्रारी उद्भवू लागतात.

प्रजोत्पादन प्रक्रियेमधील अंडाशय हा एक महत्वाचा अवयव आहे. अंडाशयात इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन हे हार्मोन तयार होतात. हे हार्मोन मासिक पाळी नियमित येण्यावर नियंत्रण ठेवतात. त्याचबरोबर काही हार्मोन कमी प्रमाणात तयार करतात. जसं इनहिबिन, रिलॅक्सिन आणि आणि ॲण्ड्रोजेन्स! यामध्ये ॲण्ड्रोजेन्स हा पुरुषी हार्मोन आहे.

### पीसीओएस

पीसीओएस हा शब्द आपण बरेचदा ऐकतो. जेव्हाही झउजऊचा विषय निघतो तेव्हा आपण पीसीओएस बद्दल ऐकतो. पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोम याचं संक्षिप्त रुप म्हणजे पीसीओएस! यातील सिन्ड्रोम या शब्दाचा अर्थ लक्षणांचा समूह असा होतो. चयापचयाशी संबंधित अशी ही एक गंभीर समस्या आहे. यामध्ये अंडाशयावर आणि अंडे तयार होण्याच्या प्रक्रियेवर परिणाम झालेला असतो. साधारणत: वयाच्या बाराव्या वर्षापासून ते ५१ वर्षांपर्यंत स्त्रियांना ही समस्या उद्भवू शकते.

### यामागची कारणं

पीसीओडी किंवा पीसीओएस का होतो? यावर अनेक संशोधनं सुरू आहेत. परंतु याचे कारण अजून संशोधकांना ज्ञात झालेले नाही. अनुवंशिकता, चुकीची जीवनशैली यासारख्या काही गोष्टींमुळे ही समस्या होऊ शकते. योग्य आहार आणि व्यायाम यामुळे आपण या समस्येवर नियंत्रण ठेवू शकतो.

### काय करावे?

◆ **कर्बोदकांची योग्य निवड** : कार्यशक्ती देणारा गट म्हणून कर्बोदकांचा गट ओळखला जातो. आपल्याला कर्बोदके तृणधान्यातून मिळतात. तृणधान्ये म्हणजे गहू, ज्वारी, बाजरी वगैरे! याबरोबरच डाळी, फळं आणि भाज्या यामधूनही आपल्याला उत्तम प्रकारची कर्बोदकं मिळतात. अन्नपदार्थांची निवड करताना सालीसहित धान्याचा वापर करावा. जी फळे सालीसह खाऊ शकतो ती आवर्जून खावीत. फळांच्या बिया खाणे शक्य असेल तर खाव्यात. उदा. टरबूज! असे केल्याने आपल्याला फायबर मिळेल. फायबरचा आहारात योग्य प्रमाणात समावेश केल्याने वजन कमी करण्यास मदत होईल. मैदा आणि त्यापासून तयार झालेले पदार्थ खाऊ नयेत.

◆ **उत्तम स्निग्धाम्ले** : आहारात उत्तम स्निग्धाम्लांचा वापर करावा. जसे साजूक तूप, तीळ, जवस, सूर्यफूलाच्या बिया! असं केल्याने अन्नाचं पचन चांगलं होईल आणि शरीराला चांगलं पोषण मिळेल.

◆ **संतुलित आहार** : सर्व अन्नगटांचे आहारातील प्रमाण योग्य असावे. अन्नगट - तृणधान्य, डाळी, कडधान्य, भाज्या, फळे, दूध आणि दूधाचे पदार्थ, अंडी, मांस, मासे इत्यादी!

आपल्या ताटातील अर्धा भाग हा भाज्या आणि फळांनी भरलेला असावा. आहारात सुकामेवा जसे अक्रोड, बदाम, अंजीर, काळ्या मनुका यासारख्या सुक्या मेव्यांचा आवर्जून समावेश करावा.

◆ **पाणी** : पाणी आणि पेय पदार्थांचा आहारात वापर करावा. पाण्याच्या योग्य प्रमाणामुळे पाण्यात विरघळणारी जीवनसत्वे जसे जीवनसत्व ब आणि जीवनसत्व क यांचे शरीरात शोषण होईल. पीसीओडी या समस्येसाठी लाभदायक ठरतील असे काही विशेष अन्नपदार्थ म्हणजे दालचिनीचं पाणी, ओव्याचं पाणी, जिऱ्याचं पाणी!

◆ **नियमित व्यायाम** : नियमित व्यायाम केल्याने शरीर सुदृढ राहण्यास मदत मिळेल. योगा, सूर्यनमस्कार आणि प्राणायाम केल्याने ताणतणावावर मात करता येईल.

◆ **काय करू नये** : जंक फूडचे सेवन टाळावे. मैदा आणि मैद्यापासून बनविलेल्या पदार्थांचा वापर टाळावा. अति साखरेचे, अती मीठ असलेले पदार्थ खाऊ नयेत.

### पीसीओडी आणि पीसीओएसची सामान्य लक्षणे

१. अनियमित पाळी
२. पाळी न येणे
३. पाळीच्या वेळी अतिरक्तस्त्राव
४. चेहरा, पोट, पाठ, छाती या ठिकाणी केसांची वाढ होणे
५. चेहऱ्यावर फोड येणे
६. केस गळणे
७. मान, छातीच्या खालची त्वचा काळी पडणे

### पीसीओएसमुळे निर्माण होणाऱ्या तक्रारी

१. वंध्यत्व
२. मधुमेह
३. वेळेपूर्वी बाळाचा जन्म
४. चयापचयाशी संबंधित लक्षणे (जसे रक्तातील साखर वाढणं, अतिरक्तदाब, हृदयाच्या समस्या, मधुमेह)
५. झोपेमध्ये अडथळा
६. गर्भपात होणे
७. अति ताण

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# बहुगुणी नागफळा



निसर्गाचे कितीही धन्यवाद मानले तरी कमीच आहे. या पृथ्वीतलावर कशाचीच त्याने कमी केली नाही. जिकडे बघावे तिकडे सर्व काही छानच बघायला मिळते. मग ती वाहणारी नदी असो किंवा फुलझाडे अगदी मन मोहून टाकतात आणि मनुष्यप्राणी त्याच्याकडे बघून आनंदीत होतो. एवढेच नाही तर त्या निसर्गराजाने मानवी जीवनाच्या आरोग्यासाठी विविध प्रकारच्या वनस्पतींची निर्मिती केली आहे. आणि गेल्या काही वर्षात याच दुर्मिळ व गुणकारी असलेल्या वनस्पतींचा उपयोग आधीचे माणसं करत असत. पण, आजकाल जसजसे माणसाचे विचार बदलत चालले आहे तसतसे या वनस्पतींचे महत्वसुद्धा कमी होत आहे, हेही नाकारता येत नाही.

अशीच एक बहुगुणी असलेली वनस्पती आहे आणि ती सर्व परिचित आहे. त्या वनस्पतीला 'नागफळा' या नावाने ओळखले जाते. झाडीबोलीत 'नांगफळा' या नावानेही ओळखली जाते. या वनस्पतीची कोणीही लागवड करत नाही, कोणी खतपाणीसुद्धा टाकत नाही. तिच्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही. निसर्गाच्या सान्निध्यात राहून ती वाढते. रस्त्याच्या कडेला किंवा एखाद्या मोकळ्या जागेत, झाडाझुडुपात, गावखेड्यातच ती जास्त प्रमाणात बघायला मिळते. गेल्या काही वर्षांत ही वनस्पती बऱ्याच प्रमाणात बघायला मिळत असे. या वनस्पतीच्या पानांवर टोकदार काटे असतात. जशी पाणफुटी वनस्पती, पानांपासून वाढते तशीच या वनस्पतीचीसुद्धा वाढ होते. ही वनस्पती खाता येत नाही कारण, ती खूप विषारी आहे. तिचा उपयोग फक्त बाह्य आजारावर उपचार केला जातो. हातपाय दुखत असतील त्यासाठी नागफळा वनस्पती रामबाण उपाय आहे. तिचा उपयोग कशाप्रकारे केला जातो ते येणेप्रमाणे! हातपाय दुखत असतील तर नागफळाची दोन किंवा तीन पानं तोडून घ्यायची व त्या पानांना मध्यभागातून फाडून घ्यायचं. नंतर, एकमेकांवर मांडून घ्यायचं व गरम राखडीत हलकेसे भाजून घ्यायचं. ही पानं भाजून झाल्यावर हातपायाच्या दुखऱ्या जागेवर ती पानं व्यवस्थितपणे मांडून, फडक्याने बांधून घ्यायचं. साधारण दररोज तीन तास असे तीन दिवस बांधल्याने दुखणं कमी होते. त्या बांधलेल्या पानांचे कोणतेही डाग पडत नाही. ही नागफळ्याची पानं ते दुखणं कमी करते, असा जाणकारांचा सल्ला आहे.

आपल्या आजूबाजूला अशा कितीतरी गुणकारी वनस्पती, कंद-मुळं, रानभाज्या, रानफळं आणि गावरान भाज्या असतात. आजकाल सारेचजण त्याचे फायदे विसरले आहेत. भावी पिढीला या गुणकारी वनस्पतींची माहिती मिळेलच, असेही नाही. हे कटू असले तरी वास्तव आहे. नागफळा ही काटेरी पण, अतिशय गुणकारी वनस्पती आहे. मात्र, मानवी जीवनासाठी ती बहुपयोगी आहे. अशा दुर्मिळ वनस्पतींचं जतन करणं व भावी पिढीला या गुणकारी वनस्पतींचं महत्व पटवून देणं काळाची गरज आहे.

# वीरांगना सुजा कंवर राजपुरोहित

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१

सदा अवज्ञा रही इतिहास में,
राजस्थानी विरांगनाओं की
युद्ध क्षेत्र में लडी बराबर
प्रथम युद्ध सेनानी थी
सुजा कंवर नाम था उसको
विरांगना वो अद्भुत थी
अपना लाडनू बचाने के लिए
आमरण वो लडी थीं

खरंच इतिहास कित्येक वीरांगनांना विसरला आहे. पण, त्यांनी देशासाठी, स्वतःच्या राज्यासाठी, स्वातंत्र्यासाठी दिलेलं बलिदान न विसरण्याजोगं आहे. ब्रिटिशांनी १५० वर्षे आपल्यावर राज्य केलं पण, त्यांना या देशातून हद्दपार करण्यासाठी किती वीर-वीरागनांनी आहुती दिली. त्याची खरोखरच मोजदाद होऊ शकत नाही. असंच एक नाव आहे वीरांगना सुजा कंवर राजपुरोहित्‌चं! त्यांना मारवाडची राणी लक्ष्मीबाई म्हटलं जात असे.

साधारणतः १८३७ च्या आसपास तत्कालीन मारवाड राज्यातील लाडनू या नागौर जिल्ह्यातील गावात एक आदर्श परिवारात तिचा जन्म झाला. तिचे वडील हनुमंत सिंह राजपूत आणि त्या गावचे ठाकूर बहादूर सिंह राजपूत यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. किंबहुना, दोघांमध्ये एक आदर्श मैत्री होती. त्यामुळेच असेल सुजा राजपूत परिवारातील मुलाबरोबरच लहानाची मोठी झाली आणि लहानपणापासूनच तिने बंदूक चालवणे, घोडेस्वारी करणे, तलवारबाजी या सर्वांचं एक उत्तम प्रशिक्षण घेतलं. ती एक आत्माभिमानी आणि वीर बालिका तर होतीच, तिला मुलांचा पेहराव करायला अतिशय आवडत असे. कंबरेला बांधलेल्या म्यानात तिची तलवार नेहमीच असायची. एका घटनेने तिचं संपूर्ण आयुष्य बदललं.

त्यांचा विवाह तत्कालीन किशनगढ संस्थानातील अजमेर जिल्ह्यांतर्गत विला गावामधील बैजनाथ सिंह राजपुरोहित यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या आपल्या पतिगृही निघाल्या होत्या. अचानक रस्त्यात अनेक डाकूंनी त्या दाम्पत्याला घेरलं आणि शस्त्राच्या धाकावर ते त्यांच्याकडून अमूल्य वस्तूंची मागणी करू लागले. ते आपल्याला मारून टाकतील या कल्पनेने तिचे पती बैजनाथ सिंह तिला म्हणाले,'सारं धन आणि आभूषण त्यांना देऊन टाक अन्यथा आपला जीव जाईल.' सुजाने भयभीत झालेल्या पतीकडे बघितलं आणि तिच्यातली वीर स्त्री जागृत झाली होती. पतीच्या कंबरेची तलवार तिने उपसली आणि क्षणातच डाकूंच्या सरदाराचं शीर धडावेगळं केलं. आपल्या प्रमुखाची ही अवस्था बघून, सारे डाकू पळून गेले. पण, आपल्या नवऱ्याचं हे रूप बघून सुजा दुःखी आणि हताश झाली. अशा नवऱ्याबरोबर राहण्यापेक्षा आजन्म कुमारी राहीन, ही प्रतिज्ञा करीत लग्न गाठ तिनेच सोडवली आणि पित्याकडे ती परत आली.



१८५७ क्रांतीची ज्वाला धगधगत होती. अशातच एकेक गाव आपल्या अखत्यारीत आणत इंग्रज सैन्याने आपली एक तुकडी लाडनू क्षेत्रात पाठवली आणि तिथल्या लोकांवर अत्याचार सुरू केले. या बातमीने ठाकूर बहादुर सिंह हतप्रभ झाले. अशा कठीण प्रसंगी तिने ठाकूर बहादूर सिंह यांना दिलासा दिला. ठाकूर बहादूर सिंह यांच्याजवळ एवढी सेना नव्हती पण तिच्या सल्ल्यानुसार त्यांनी विश्वस्त मातब्बर सरदार यांची आपत्कालीन सभा बोलावली. त्यांना आश्वासन दिलं की, प्राणात प्राण असेपर्यंत ती या लाडनू गावाचं संरक्षण करेल. तिने आपल्या नेतृत्वात सैन्यदलाचं गठन केलं आणि लाडनूच्या राहू दरवाजावर तिने मुख्य मोर्चा बांधला होता. आपल्या सैन्याला धीर देत तिने युद्धाची घोषणा केली. पुरुषी वेश, हातात बंदूक आणि कंबरेला समशेर अशा रूपात तिने मोर्चा सांभाळला. साक्षात रणचंडीसारखी ती गर्जत होती.

सुजा कंवरचं सैन्य कमी होतं पण, मातृभूमीच्या रक्षणासाठी प्रत्येक सैनिक प्राणपणाने लढत होता. शत्रूला कल्पना नव्हती की, अशा तऱ्हेचा प्रतिकार कोणी करू शकेल. शत्रूसेनेत तिच्या या आक्रमणाने हाहा:कार माजला होता आणि गोऱ्यांच्या सैन्याने भयभीत होऊन पलायनाला सुरुवात केली. या युद्धात तिचेही अनेक सैनिक मारले गेले तर काही जखमी झाले. सुजाही या युद्धात जखमी झाली पण, विजयाचा संदेश घेऊन ही वीस वर्षाची मुलगी जेव्हा लाडनूत परतली तेव्हा ठाकूर बहादूर सिंह भारावले. तिचा सन्मान करताना त्यांनी तिच्या मस्तकावर राजस्थानी पगडी घातली, तिच्या कंबरेला तलवार बांधली आणि सुजा कंवर राजपुरोहितला 'सुरज सिंह राजपुरोहित' हा खिताबही दिला. तिच्या सन्मानात त्यांनी काही घोषणाही केल्या. जसे सुजा कंवर राजपुरोहित नेहमी पुरुषी वेशात आणि कंबरेला समशेर अशा स्वरूपात असेल. सुजा दरबारात आल्यानंतर अन्य दरबारी लोकांसोबतच सर्व राजपरिवार उभा राहून तिला सन्मान देईल. महिलांमध्ये होणाऱ्या भांडणात सुजाताचा अंतिम निर्णय असेल. त्या क्षेत्रात आयोजित प्रत्येक सभा समारोहात तिला सन्मानपूर्वक आमंत्रित करावं लागेल. अशा विविध सन्मानाने ठाकूर बहादूर सिंहांनी तिला सन्मानित केलं होतं. काळ पुढे धावत होता. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाने जोर पकडला होता. मारवाडमधील बरेच संस्थानिक लढा देत होते. लाडनूमध्ये चकमकी घडत होत्या. पण, युद्ध प्रशिक्षणाच्या शिबिराची ती पाहणी करताना सरसरत आलेल्या अनेक गोळ्यांनी तिच्या शरीराचा वेध घेतला. एक वीरांगना देशासाठी शहीद झाली.

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

# शंभो, शंकरा, करुणाकरा...



नमस्कार! आपण भगवान शंकराची महाशिवरात्र साजरी केली आणि आता १९ फेब्रुवारी हा आपल्या जाणत्या राजाचा अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मदिवस, शिवजयंती! काय योगायोग आहे ना मंडळी! शिवा आणि शिवाजी दोन्हीही अगदी उदात्त, अफाट व्यक्तिमत्त्व, अचाट कर्तृत्वाचे धनी! एक दैवी आणि दुसरा? तो पण तर दैवीच की हो! शिवाई देवीचा प्रसादच! पराक्रम, कर्तृत्व सारंच कल्पनातीत! चला तर मग, आज अशाच एका छानशा गीतावर बोलू या.'थोरली जाऊ' या चित्रपटातली, सुधीर मोघे यांची रचना, अनुराधा पौडवाल यांचा स्वर लाभलेलं हे गीत...

शंभो शंकरा, करुणाकरा...जग जागवा!

या पृथ्वीतलावर शिवशंभो आणि छत्रपती शिवरायांसारखी व्यक्तिमत्वं पुन्हा जन्माला येणं खूप गरजेचं आहे. सध्याच्या ती काळाची ती गरज आहे, असं म्हणायला हरकत नाही. एकाने भक्तांसाठी विषपान केलं तर दुसऱ्याने सन्मानाने जगण्याचं वरदान दिलं. या गीतातील 'करुणाकरा' हा शब्द मनाला भावतो.

भगवान शंकराला दिलेली ही उपाधी पण आहे आणि मागणं पण आहे.

अंधार हा लपवा, द्यावा प्रकाश नवा!
चराचरा उजळाया, चैतन्याची ज्योत चेतवा.. हे शिवा...

भगवान शंकराकडे मागणं मागितलं ते या गीतातून! सर्वत्र बोकाळलेला स्वार्थाचा, विषयांचा, अंध:काराचा लोप तुम्हीच करू शकता, शंकरा! तो तुम्ही नक्की करा. शिवरायांनी पण केला होता. सगळ्या अनिष्ट गोष्टींचा आणि स्वराज्याची स्थापना करून सन्मानाने जगायचं ध्येय पेरलं साऱ्यांच्याच मनात! त्याच चैतन्यज्योतीची आज खरी निकड आहे. त्या श्रद्धेची आज नितांत गरज आहे. साऱ्या चराचराला हे आत्मभान येणं गरजेचं आहे. हा शिवभाव येणं प्रत्येकासाठीच खूप आवश्यक आहे.

विचारांनी, कृतीने अचेतन होऊ पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनात, चैतन्य जागवण्यासाठी, शंकरा तुझं अवतार घेणं गरजेचं आहे.

सांब सदाशिव, हे त्रिपुरारी शंभो!
हे भवतारक, दुःख निवारी शंभो...
सारं काही व्यापून उरणारी ही चैतन्य शक्ती!

भवसागरातलं, संसारातलं दुःखहरण करणारा सांब सदाशिव! त्याला आर्जवाने,'भोळा सांब' म्हटले जाते पण, याचा क्रोधाग्नी भडकला की, तांडवदेखील करणारा हाच असतो, बरं का! आणि तिसऱ्या नेत्राने, सारं भस्म करू शकणारादेखील हाच! पण, भक्तांबद्दल अपार करुणा भाव मनात बाळगणारासुद्धा सांब सदाशिवच! असाच कळवळा शिवरायांनादेखील आपल्या तमाम प्रजेबद्दल होता.

संमार्जली अंगणे, पान्हावली गोधने...
आसावला आसमंत, अमृताने चिंब न्हाहवा
हे शिवा...

काय भन्नाट शब्दरचना आहे, मंडळी! बघा, येथे अंगणाचा उल्लेख आहे. हे घरासमोरचे अंगण, सडा घालून, रांगोळ्यांनी सजवून सज्ज केलं आहे. अशी आपल्या मनाची भूमीसुद्धा शिवरायांनी राष्ट्र प्रेमाच्या विचारांनी, साऱ्या मावळ्यांची केली होती आणि म्हणूनच हे मावळे आपल्या राजासाठी प्राण हातावर घेऊन लढत होते. सारे गोधन आतुर आहेत, भगवान शंकराला दुधाचा अभिषेक करण्यासाठी! मला इथे सहजच व्यंकटेश विजय या ग्रंथातील वारुळावर गायीने केलेल्या दुधाच्या अभिषेकाची कथा आठवली.

तर या भगवान शंकराला त्याच्या कृपेच्या अमृताचा वर्षाव करण्याची आर्जव केली जाते कारण, तो दयाघन आहे. जरी त्याने स्वत: विष प्राशन केले, तरी तो भक्तांना कृपामृतच देणारा आहे. हा त्याच्याबद्दलचा विश्वास आहे आणि म्हणूनच त्याच्याजवळ हे मागणं मागितलं जात आहे. तो आपल्याला वारणारा, तो दुःखितांना तारणारा होय.

तू आपदा वारणारा...
तू दु:खीता तारणारा,
होई कृपावंत...
विश्वातले आर्त
अभयंकर शांतवा
हे शिवा...

शंभूला भक्ताने साद घातल्याबरोबर तो धावला आहे प्रत्येक वेळी त्यांच्यासाठी! संकटकाळी तारले त्यांना! आपल्या भक्तांच्या दुःखाचे निवारण केले त्याने!

म्हणूनच तर 'तुज वीण शंभो, मज कोण तारी?' हा त्याच्या बद्दलचा विश्वास डोकावतो. त्याने आता कृपेची पाखर घालावी, समस्त चराचरावर आणि सगळीकडे माजलेला दुराचार, अनाचार, दुःख यांचा सर्वनाश करावा. एखाद्या जादूगाराप्रमाणे नाहीच हो मंडळी!

तर हे सारं, ज्या ज्या मानवी कृतीमुळे, विचारांमुळे होते आहे, त्यांचे विचार परिवर्तन करा, साऱ्यांना सद्बुद्धी द्या आणि हो, त्याला आर्ततेने साद घातली की तो भक्तांसाठी धावतो कारण, तो 'करुणाकर' आहे. स्वतः विषपान करून पण, त्याने भक्तांपर्यंत अमृत कण पोहचवले आहेत. मंडळी! घेऊ न हो, हा वसा आपण पण? या महाशिवरात्री आणि शिवजयंतीच्या निमित्ताने? काय हरकत आहे?

## अभिजात मराठी

प्रा. सुनंदा पाटील/८४२२०८९६६६



# युगलगीत, द्वंद्वगीत किंवा संवादगीत

मंडळी, आत्तापर्यंत आपण मराठीतील कवितेचे अनेक प्रकार पाहिलेत. मुळातच मराठी भाषा ही गर्भश्रीमंत आहे. या भाषेत वर्णमाला, स्वर, जोडाक्षरे, अनेक शब्द आहेत. यामुळे ही संपन्न भाषा आहे. तसेच, विविध विरामचिन्हेही मराठीची एक खास ओळख आहे. संस्कृत भाषा भगिनी असलेली ही मराठी भाषा आज अभिजात मराठी म्हणून ओळखली जाते, हा खरा अभिमानाचा विषय आहे. आजपर्यंत आपण कितीतरी काव्याचे प्रकार पाहिले. त्याचाच एक विशेष प्रकार आज आपण बघणार आहोत.

कविता किंवा गाणं हे एकल स्वरूपात असतं, हे आपण बघितलं आहे. कधी कधी ते समूहगान असतं. पण, आज बघतो आहे ते म्हणजे दोघांनी गायलेले गीत! आता युगलगीत म्हणजे काय? तर दोन गायक, दोन गायिका किंवा एक गायक आणि एक गायिका यांनी मिळून गायलेलं गीत होय. या गाण्यांमध्ये सहसा स्त्री आणि पुरुष अशी जोडी असते. जी सहसा संवादाच्या स्वरूपात भावना व्यक्त करत असते. बरेच वेळा केवळ चित्रपटांमध्ये युगल गाणी अधिक आढळतात. ही कविता चित्रपटांमधील लोकगीतातील किंवा भावगीतामधील गाणी असतात. जी प्रेमाच्या, विरहाच्या किंवा आनंदाच्या भावना व्यक्त करत असते.

यात दोन व्यक्ती एकत्र गात असतात. दुसरं वैशिष्ट्य म्हणजे संवादशैली आणि आनंद! या गीतामधून दोन व्यक्तींमध्ये संवाद साधला जात आहे, असं वाटतं. तिसरं वैशिष्ट्य म्हणजे भावना. अशा गीतांमधून-जी आधी कविता असते, प्रेम, मैत्री, विरह किंवा आनंद यासारख्या भावना प्रभावीपणे मांडल्या जाऊ शकतात. थोडक्यात काय तर 'दोन आवाजांच्या सुरांनी गुंफलेले गाणे म्हणजे युगलगीत होय' यातलंच एक गीत बघा.

सांग कधी कळणार तुला, भाव माझ्या मनातला
रंग कधी दिसणार तुला, लाजणाऱ्या फुलातला
गंधीत नाजूक पानांमधुनी,
सूर छेडिते अलगद कोणी
अर्थ कधी कळणार तुला, धुंदणाऱ्या सुरातला
निळसर चंचल पाण्यावरती,
लयीत एका तरंग उठती
छंद कधी कळणार तुला, लाजणाऱ्या जळातला
जुळता डोळे एका वेळी,
धीट पापणी झुकते खाली
अर्थ कधी कळणार तुला, दोन वेड्या जीवातला

मराठी कविता किंवा गीताचा द्वंद्वगीत हा एक प्रकार मानला जातो. अर्थात, युगलगीत आणि द्वंद्वगीत या दोन्हीसाठी इंग्रजीत ड्युएट साँग असाच शब्द आहे. चित्रपट-भावगीत यासोबतच नाटकामध्येही ही गाणी लोकप्रिय आहेत. नाटक आणि चित्रपटांमध्ये गायक-गायिका आपापली भूमिका गाण्यातून सादर करतात. त्यातले शब्द एकमेकांशी बोलण्यासारखे असतात. यात प्रेम आणि भावनिक संवाद हे अधिक असतात. महत्त्वाचं म्हणजे दोन सुरांची सुंदर सांगड अशा गाण्यांमधून आपल्याला ऐकायला मिळते. आपण काही द्वंद्व गीतांची उदाहरणे बघणार आहोत.

युगलगीतांचाच आणखी एक प्रकार म्हणजे संवाद गीत किंवा संवाद काव्य! यात आई-वडील, मुले, बहीण-भाऊ, पती-पत्नी, आई-मुलगा, आई-मुलगी, विशेष म्हणजे प्रियकर-प्रेयसी अशा प्रकारे अनेकांचे परस्परांमध्ये संवाद असतात. कथानकाच्या आवश्यकतेनुसार या काव्याची रचना केली जाते. यातलं एक सुरेख उदाहरण साठच्या दशकाच्या मागेपुढे जन्मलेल्या अनेक लोकांना आठवत असेल आणि ते गीत म्हणजे 'सांग मला रे सांग मला...' बहिण-भावाच्या/मुलांच्या मनातील आपल्या आई-बाबांच्या विषयी असलेल्या भावना या गीतात उत्तम प्रकारे मांडलेले आहेत. अर्थात सध्याच्या पिढीला आई आणि बाबा अशी वेगळी काम करतात, त्यांच्या भूमिका वेगळ्या आहेत हे पटणंसुद्धा कठीण आहे. त्यांच्यासाठीच हे गीत! तेव्हा हे गीत बघाच!

सांग मला रे सांग मला...
आई आणखी बाबा यातून
कोण आवडे अधिक तुला,
सांग मला रे सांग मला...
आई दिसते गोजिरवाणी, आई गाते सुंदर गाणी
तऱ्हेतऱ्हेचे खाऊ येती, बनवायाला सहज तिला
आई आवडे अधिक मला ॥
घरात करते खाऊ आई, घरात त्याला गंमत नाही
च्युइंगम अन् चॉकलेटही, बाबा घेती रस्त्याला ॥
आवडती रे वडील मला, कुशीत घेता रात्री आई
थंडी वारा लागत नाही, मऊ सायीचे हात आईचे
सुगंध तिचिया पाप्याला,
आई आवडे अधिक मला॥
निजता पण रे बाबांजवळी,
भुते राक्षसे पळती सगळी
मिशा चिमुकल्या करती गुदगुल्या,
त्यांच्या अपुल्या गालाला
आवडती रे वडील मला ॥
आई सुंदर कपडे शिवते, पावडर तीट तीच लावते
तीच सजवते सदा मुलींना,
रिबीन बांधून वेणीला ॥
आई आवडे अधिक मला,
त्या रिबिनीला पैसे पडतीते
तर बाबा मिळवूनी आणती,
कुणी न देई पैसा दिडकीघरात बसल्या आईला,
आवडती रे वडील मला ॥
बाबांचा क्रम वरती राही,
त्यांच्या पाया पडते आई
बाबा येता भिऊन जाई, सावरते ती पदराला ॥
आवडती ते वडिल मला...

हे गीत संवाद गीताचं अतिशय उत्तम उदाहरण आहे. अर्थात हे गीत ८-९ कडव्यांचे मोठे गीत आहे. विस्तारभयास्तव मोजकीच कडवी इथे घेतली आहेत. तसेच,

तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा
हे गाणंही सर्वांना ठावूक आहे.

हे सर्व संवाद आजच्या पिढीला निश्चितच पुराणकाळातील वाटण्याचा संभव आहे. ही संवाद गीते किंवा युगलगीते आपल्याला जागीच खिळवून ठेवतात. अनेक संवाद गीतांनी इतिहास रचलेला आहे, हे आपल्या लक्षात येईल. या कविता चित्रपट किंवा नाटकातीलच असायला हव्यात, असं नाही. तर शुद्ध भावगीतेसुद्धा संवाद गीतांची उत्तम उदाहरणे आहेत. यातीलच एक गीत म्हणजे 'शुक्रतारा मंद वारा'! या गीताची आठवण झाली की अरुण दाते या अष्टपैलू गायकाची आठवण होतेच होते. शुक्रतारा आणि अरुण दाते म्हणजे गायक आणि गीताचं अद्वैत! मंडळी, अशी खूप गाणी अन् कविता आहेत. जरा आठवून बघा. मात्र, आज इथेच थांबू या.

## संवादातून दिशेकडे...

सान्वी सागर बडगे/८२०८३०९१६४

# व्हीबीवायएलडी - २०२६ च्या युवा प्रतिनिधीचा अनुभव



**लेखिकेने भारत मंडपम, नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत 'विकसित भारतासाठी भविष्योन्मुख कार्यबल निर्मिती' या चॅलेंज ट्रॅकमध्ये सहभाग घेतला. लेखिका शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे बीएएमएसची विद्यार्थिनी असून आयुर्वेद आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांतील आंतरशाखीय संशोधनात सक्रिय आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंचांवर त्यांना मान्यता मिळाली आहे.**

जेव्हा भारताच्या प्रत्येक कोपऱ्यातून आलेले युवक एका छताखाली एकत्र येतात. केवळ विविधतेचा उत्सव साजरा करण्यासाठी नव्हे तर, विचार करण्यासाठी धोरणांवर चर्चा करण्यासाठी आणि भविष्यातील भारताची कल्पना करण्यासाठी तेव्हा केवळ एक कार्यक्रम नव्हे, तर एक राष्ट्रीय चैतन्य निर्माण होते.

भारत मंडपम येथे आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद (व्हीबीवायएलडी) २०२६ हा असाच एक ऐतिहासिक क्षण होता.

महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत 'विकसित भारतासाठी भविष्योन्मुख कार्यबल निर्मिती' या चॅलेंज ट्रॅकमध्ये सहभागी होण्याचा मला सन्मान लाभला. या संवादादरम्यान मला प्रकर्षाने जाणवले की, भारताचा युवा वर्ग आता केवळ भावनिक राष्ट्रवादाचा वाहक राहिलेला नाही, तर तो विचारशील, संशोधनावर आधारित आणि धोरणात्मक दृष्टिकोन असलेला घटक बनतो आहे.

व्हीबीवायएलडीसारख्या मंचांमुळे युवकांना विकसित भारत २०४७ या संकल्पनेचा केवळ विचार करण्याची नव्हे तर, त्या भारताच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळते. तो भारत देश जो आजच्या युवा पिढीला प्रत्यक्ष अनुभवायला मिळणार आहे आणि घडवायचा आहे. चॅलेंज ट्रॅकमध्ये मांडण्यात आलेल्या चर्चांनी भारताच्या भविष्यासंबंधी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलनाच्या युगात कौशल्यांची संकल्पना कशी बदलायला हवी? राष्ट्रीय विकासाच्या उद्दिष्टांशी कार्यबल नियोजन कसे संलग्न करावे? आणि भारताचा लोकसंख्यात्मक लाभ भविष्यात ओझे ठरू नये, यासाठी धोरणात्मक उपाययोजना कशा आखाव्यात?

या चर्चांनी युवकांच्या विचारसरणीत होत असलेली परिपक्वता स्पष्ट केली जिथे आकांक्षांसोबत विश्लेषणाची जोड दिसून येते. आमच्या संघाने कौशल्य विकासासाठी स्तरनिहाय रचना, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी तसेच, संशोधन आणि केस स्टडीवर आधारित धोरणात्मक चौकट सादर केली. परीक्षक आणि विषयतज्ज्ञांशी झालेल्या संवादातून एक आशादायक वास्तव समोर आले. योग्य मंच मिळाल्यास भारतीय युवक दूरदृष्टी आणि व्यवहार्यता यांचा समन्वय साधणाऱ्या कल्पना मांडू शकतात.

परंतु, व्हीबीवायएलडीचे सार केवळ धोरणात्मक चर्चांपुरते मर्यादित नव्हते. सांस्कृतिक सादरीकरणे, राज्यांमधील संवाद आणि सामूहिक उत्सवांनी भारत मंडपमला भारतीय संस्कृतीच्या बहुरंगी स्वरूपाचे प्रतीक बनवले. अपरिचित भाषांतील लोकगीतं, विविध राज्यांचे पारंपरिक पोशाख आणि युवकांमधील सहज संवाद यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा अनुभव निर्माण केला जो कोणत्याही पाठ्यपुस्तकातून मिळू शकत नाही.

संवादाच्या काही क्षणांनी विशेष बौद्धिक आणि भावनिक खोली निर्माण केली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्या भाषणानंतर मी त्यांना 'आधुनिक भारताचे बहिर्जी नाईक' असे संबोधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान गुप्तचर रणनीतीकाराच्या स्मृती जागवणारी ही उपमा होती. तसेच, गगनयान मोहिमेशी संबंधित अनुभव सांगणाऱ्या ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्या भाषणानंतर राष्ट्रनिष्ठेच्या भावनेला अभिव्यक्त करणाऱ्या काही ओळी मी समर्पित केल्या,

तन से, मन से, धन से,
तन-मन-धन-जीवन से,
हम करें राष्ट्र आराधन...

या क्षणांनी सिद्ध केले की, युवकांचा सहभाग केवळ टाळ्यांपुरता मर्यादित नसून, तो राष्ट्राशी असलेल्या जाणीवपूर्वक नात्याचा आविष्कार आहे.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात बीएएमएसचे शिक्षण घेत असलेला विद्यार्थी आणि आयुर्वेद व कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या संगमावर संशोधन करणारा अभ्यासक म्हणून, मला व्हीबीवायएलडी हा सभ्यता, विज्ञान आणि धोरण यांचा संगम असलेला दुर्मिळ मंच वाटला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंचांवर मिळालेल्या मान्यतेने माझा हा विश्वास अधिक दृढ झाला की, भारताचे भविष्य परंपरा आणि नवकल्पना यांच्या समन्वयातच दडलेले आहे.

तथापि, व्हीबीवायएलडीने एक महत्त्वपूर्ण वास्तवही समोर आणले. भारतातील युवा मंच विकसित होत आहेत परंतु, त्यांची क्षमता अजूनही त्यांच्या वर्तमान स्वरूपापेक्षा कितीतरी अधिक आहे. सादरीकरणे समृद्ध होती परंतु, राज्यांमधील संरचित सहकार्य अधिक बळकट होऊ शकते. तज्ज्ञांशी संवाद प्रेरणादायी होता. दीर्घकालीन मार्गदर्शन व्यवस्था प्रेरणेला स्थायी प्रणामात रूपांतरित करू शकते. सांस्कृतिक कार्यक्रमांनी एकात्मता वाढवली. सर्वसमावेशक सहभागाच्या संधी अधिक व्यापक करता येऊ शकतात.

ही टीका नसून शक्यता आहेत. योग्य दिशेने विकसित झाल्यास व्हीबीवायएलडी हा वार्षिक कार्यक्रम न राहता, युवक धोरणनिर्मिती आणि सांस्कृतिक एकात्मतेचा सातत्यपूर्ण राष्ट्रीय परिसंस्था बनू शकतो. सर्वात प्रभावी क्षण म्हणजे पंतप्रधानांच्या उपस्थितीत झालेली प्लेनरी सभा! अनेक युवकांसाठी राष्ट्रनेतृत्वाला प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव हा लोकशाहीचा एक जिवंत प्रत्यय होता. जेव्हा युवकांच्या कल्पना राष्ट्रनेतृत्वासमोर मांडल्या जातात, तेव्हा आकांक्षा आणि अधिकारांचा दुर्मिळ संगम घडतो.

ज्या देशात अर्ध्याहून अधिक लोकसंख्या तीस वर्षांखालील आहे, तिथे प्रश्न असा नाही की युवकांकडे कल्पना आहेत की नाहीत? तर प्रश्न असा आहे की, त्या कल्पनांना सामावून घेण्याची तयारी व्यवस्था कितपत दाखवते? व्हीबीवायएलडी २०२६ ने हे दाखवून दिले की, युवक बुद्धिमत्ता आणि संस्थात्मक दृष्टिकोन यांचा संगम झाल्यास काय शक्य आहे. जर भारताला खरोखरच 'विकसित' व्हायचे असेल, तर व्हीबीवायएलडी सारखे संवाद केवळ उत्सवापुरते मर्यादित राहू नयेत. ते विचार, सहकार्य आणि धोरणात्मक कल्पनांचे स्थायी प्रयोगशाळा बनले पाहिजेत. युवक तयार आहेत. प्रश्न इतकाच आहे की, त्यांच्या क्षमतेला साजेशी उंची गाठण्यासाठी मंच किती दूर जाण्यास तयार आहे?



# देवघर आणि पितरांची पूजा

पृथ्वीराज धवड/ ९१३०८ ३९७८०

आपला मृत्यू होतो. मृत्यूनंतर देह जरी भस्मिभूत होत असला तरी आत्मा हा त्याच्या इच्छा अपूर्ण राहिल्यास इथेच ऐहिक जगात घुटमळतो. त्याची इच्छा हा त्याचा वारस पूर्ण करू शकतो. त्याचा वारस अर्थात त्याचा वंश वाढवणारा पुत्र असतो. त्यामुळे, आपल्या स्त्रीद्वारे पुरुष अपत्य व्हावे यासाठी 'पुंसवन' विधिसुद्धा सांगितला आहे. आश्वलायनगृह्यामध्ये या विधीचे वर्णन आले आहे. गरोदर पत्नीने गरोदरपणाच्या तिसऱ्या महिन्यात पुनर्वसु नक्षत्रावर उपोषण करावे आणि पुष्य नक्षत्रावर तिच्या पतीने ज्या गाईचे वासरू त्या गाईच्याच रंगाचे असेल अशा गाईच्या, एका ओंजळभर दह्यात जवाच्या २ शेंगा आणि एक दाणा घालून ते दही पत्नीला भक्षण करण्यास सांगावे. 'तू काय भक्षण करीत आहेस?' असे पतीने विचारल्यावर पत्नीने 'पुंसवन' असे तीन वेळा उत्तर द्यावे. ही विधी विशेष यासाठी की, सूत्रांच्या काळात स्त्री जन्माला येऊ नये ही कल्पना स्थिरावली होती. त्यामुळे पुरुषाला आपल्यानंतर आपले कार्य करणारी संतानपुत्राची असावी, असे निश्चित वाटत असे. त्यामुळे, मृत झालेल्या व्यक्तीचे अंत्यविधीचे अधिकार हे त्याच्या पुत्राकडे नेतात, असे स्मृतींचे म्हणणे आहे. स्मृतींच्या मतानुसार जर त्या मुलाचे उपनयन झाले नसेल तरी तो आपल्या पित्याच्या अंत्यविधीत वेदोक्त मंत्र उच्चारू शकतो. अर्थात श्राद्धाचा अधिकार कोणाचा आहे? विष्णुधर्मसूत्रानुसार जो कोणी मृताची संपत्ती स्वीकारतो त्याने मृताला उद्देशून पिंड दिले पाहिजे. जनरीतीप्रमाणे वडिलांच्या संपत्तीचा वारसदार हा पुत्रच असे. त्यामुळे उपरोक्त सांगितल्याप्रमाणे स्मृतींमधील श्राद्धासंबंधीचे विचार पुत्राकडूनच का असावे? याचे उत्तर मिळते.

पुरातात्विक पुराव्यांच्या आधारे मानव पितरांचा विशेष आदर कसा ठेवत असे हे आपण पाहिलेच. परंतु, पितृपूजनाची ही चाल ग्रंथांच्या आधारे किती मागे नेता नेऊ शकतो?यावर विद्वानांमध्ये मतभेद आहेत. सूत्रग्रंथात श्राद्धापासून म्हणजेच पितरांसाठी केलेल्या विधींच्या योगाने दीर्घायुष्य, स्वर्ग, किर्ती आणि वैभव मिळते असे म्हटले आहे. 'श्राद्ध' हा शब्द श्रद्धा या शब्दापासून आला आहे. श्राद्धामध्ये जे काही दान केले जाईल, ते पितरांना मिळते अशी ती श्रद्धा! मनूच्या मते, पितृयज्ञ केल्यानंतर आहिताग्नी ब्राह्मणांनी प्रतिमासी अमावस्येच्या दिवशी 'पिंडान्वाहार्य' नावाचा और्ध्वदेहिक यज्ञ करावे. आपद्धर्मसूत्राप्रमाणे श्राद्ध प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षात केले पाहिजे. याज्ञवल्क्यमध्ये म्हटले आहे की, पितर म्हणजे श्राद्धामध्ये देवता असणारे वसू, रुद्र आणि आदित्य श्राद्धाच्या रोगाने संतुष्ट होऊन मनुष्यांच्या पूर्वजांना संतोष देतात. या सर्व मान्यता आपण धर्मसूत्र आणि स्मृतींच्या काळातील पाहिल्या म्हणजेच सामाजिक स्तरावर या सर्व गोष्टी इ.स.पूर्व काळापासून अस्तित्वात होत्या, हे मान्य करावे लागते.

पूर्वजांच्या स्मृतींचा ठेवा हा वैविध्यतेने आपल्या संस्कृतीने अशाप्रकारे जपून ठेवलेला दिसून येतो. यात पूर्वजांची मूर्ती/प्रतिमासुद्धा बनवली जात असे. इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकात भारतावर कुशाण घराण्याची राजवट होती. कुशाण घराण्याच्या मथुरेतील एका लेखात 'देवकुल' स्थापल्याचा उल्लेख येतो. एका देवकुलामध्ये कुशाणराजा हुविष्क याची प्रतिमा स्थापली होती. मथुरेजवळील माट येथे कुशाणराजांच्या स्मरणार्थ देवकुले उभारली होती. 'देवकुल' याचा अर्थ भासाच्या 'प्रतिमा' नाटकात मिळते. प्रतिमा नाटकात देवकुल हा शब्द 'प्रतिमामंदिर' या अर्थी आला आहे. यावेळी, भरत हा शुभ वेळेसाठी ज्योतिष शास्त्रानुसार अयोध्येबाहेर थांबलेला असतो. भरत परत आल्यावर घरातील प्रतिमा मंदिरात जातो. त्यावेळी तिथे असलेला देवकुलिक त्याला सांगतो की, हे पूजास्थान नसून 'प्रतिमामंदिर' आहे. त्याला त्याच्या पूर्वजांचे पुतळे तिथे असलेले दिसतात. त्यात शेवटचा पुतळा हा त्याचे वडील दशरथ यांचा असतो. दशरथांच्या पुतळ्यामुळे आपले पिता मृत झाल्याचे त्याला कळते. पूर्वजांच्या मूर्तीसंबंधीचे आणखी एक मध्ययुगीन उदाहरण जिजाऊंच्या वडिलांच्या संबंधीचे सांगितले पाहिजे. जिजाऊंचे वडील लखुजीराजे जाधव यांची दौलताबाद इथे निजामाने हत्या केली. त्यानंतर त्यांच्या भावाने जगदेवराव जाधवांनी लखुजीराजे यांचे स्मारक उभे केले. या स्मारकाचे काम कृष्णा कारागीर आणि त्याचे २१ सोबती यांनी पूर्ण केले. स्मारक बांधण्यासाठी जवळपास १० वर्षे लागली. त्यातील ३ वर्षे स्वर्गी लखूजीराजे यांचा पुतळा बनवण्यात गेली. पीळदार दंड व मांड्या, रुंद भरदार छाती, विशाल, पाणीदार नेत्र, सरळ नासिका व मोठे झुपकेदार कल्ले, पीळदार मिशा, भव्य मस्तक, डोक्यावर पीळदार मराठी पगडी, मोठे कानचापे, मुखावर वीरतेज झळाळत असलेले, अंगात घोळदार अंगरखा, कमरेच्या शेल्यात तलवार बांधलेली अशा थाटात डावा गुडघा सिंहासनावर टेकून व डावा हात मांडीवर टेकून, उजवा गुडघा उभा करून, उजव्या हाती जंबिया धारण करून ऐटीत बसलेल्या लखुजीराजांचा पुतळा कृष्णा कारागिराने घडविला होता. परंतु हा पुतळा आज नाही, ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

वर्तमान काळात पितरांबद्दल असणारी श्रद्धा व्यक्त करण्यासाठीच आपण पितृपक्ष पाळत असतो आणि आपल्या पूर्वजांना 'तर्पण' देतो. ही पूजा अश्विनमध्ये नवरात्री अथवा दुर्गा पूजेच्या आधी होते. एका कथेनुसार महाभारताचे युद्ध समाप्त झाल्यानंतर कर्ण स्वर्गात गेला. तेव्हा त्याला खुप भूक लागली. पण, तो कोणत्याही वस्तूला हात लावत असताना ती वस्तू सोने बनत असे. तेव्हा कर्ण आणि सूर्य यामागचे कारण विचारायला इंद्राकडे गेले. इंद्राने सांगितले की, कर्णाने जीवनभर सोने दान केले परंतु आपल्या पूर्वजांना त्याने कधी अन्नदान करून श्राद्ध केले नाही. त्यामुळे कुरुंचे पूर्वज क्रोधीत असून त्यांनी कर्णाला शाप दिला आहे. कर्णाने १५ दिवस पृथ्वीवर जाण्यासाठी आज्ञा मागितली आणि पूर्वजांचे श्राद्ध पूर्ण केले. याच काळाला पुढे पितृपक्ष म्हणून ओळखले जाऊ लागले. पूर्वज पूजण्याच्या प्रथेचा धांडोळा इतका मागे जाऊन घेण्याचे कारण म्हणजे 'मराठ्यांचे देवघर' हे पुस्तक लिहीत असताना माझ्यासमोर देवघरातील पूर्वजांचे टाक उपलब्ध होते. त्यामुळे आपल्या प्रिय व्यक्तींची स्मृती या प्रकारे धातूच्या, छोट्या टाकांच्या स्वरूपात अशा प्रकारे जतन केलेली आहे, असे लक्षात आले. पूर्व मध्ययुगीन काळापासून बनवण्यात येणाऱ्या स्मृतीगळांची पूर्वपिठीका या टाकांच्या इतिहासात आहेच. याची मांडणी केली असल्यामुळे त्याची पुनरोक्ती इथे नको. परंतु ज्याला आपण कल्चरल कंटिन्युटी म्हणतो ती अशी! पितर पूजण्याचा हजारो वर्षांचा ठेवा आपण आजही जपून ठेवलेला आहे. अगदी आपल्या देवघरात आपल्या प्रिय व्यक्तींना आपण पुजतो आणि त्यांचा आदर करतो. पूर्वजच आपले रक्षणकर्ते आहेत, ही त्यामागची भावना असते. सामूहिक रूढी-परंपरेचे वैयक्तिक जीवनात अशाप्रकारे स्थान अबाधित असलेले आपल्याला दिसून येते.

## भयकथा

श्रेया सरनाईक / ८६००२७७८८८

# रिंगा रिंगा रोझेस




पावणे बारा वाजले होते. मायकेल अजूनही गाढ झोपेतच होता. प्लॅन्चेट बोर्डजवळच्या मेणबत्त्या अचानक टिमटिम करू लागल्या. खोलीत हलकीशी थंडी पसरली. कागदाने जागा बदलली. स्टेन्सिल थरथरू लागली. हळूहळू अक्षरं उमटू लागली रिंगा रिंगा रोझेस...मायकेल दचकून उठून बसला. 'तिकडे प्रवासात काय चालू असेल रुथचे? झोपली असेल की जागी? देवा, माझ्या रूथला सुरक्षित ठेव.'

'छान आहे तुझा हा शेवाळी मिंक कोट! नाव काय तुझं?' रूथ तरुणीला म्हणाली.

'कियारा...'

'कियारा म्हणजे देखणी स्त्री!'

'ओह! मला माहितच नव्हतं माझ्या नावाचा अर्थ,' कियारा हलकंसं हसत म्हणाली.

'हो! तू खरंच देखणी आहेस. पुरुषच काय, स्त्रियाही तुझ्या प्रेमात पडतील. अगदी मीसुद्धा!'

'ओह! सो स्वीट ऑफ यु मिसेस रूथ!'

क्षणभर थांबून ती म्हणाली,'मी तुम्हाला एक रिक्वेस्ट करू शकते का?'

'हो, बोला ना!'

'स्टेशन येईपर्यंत अजून वेळ आहे. तुम्ही मला काटे-चमचे कसे वापरायचे ते नीट शिकवाल का?'

'इथे? ट्रेनमध्ये?'

'हो...त्यात काय!'

ती थोडीशी घाईत बोलू लागली.

'उद्या सकाळी मला आंटसोबत नाश्ता करावा लागेल. मी अजिबात गोंधळलेली दिसायला नको. ती माझ्या हालचाली न्याहाळणार आहे. मी काटा-चमचा कसा धरते, चूक तर करत नाही ना, हे सगळं! तुम्ही शिकवा ना मला, प्लीज! आय बेग युअर पार्डन!'

'ओके...ओके! पण, इथे काटे-चमचे कुठे आहेत?' रूथने हसत विचारलं. 'मिसेस मायकेल, एक सुरी आहे ना माझ्याकडे! अव्होकॅडो कापायला ठेवली होती आणि हा नीबवाला फाऊंटन पेन! तो चमचा समजा. सुरी म्हणजे काटा!

ही तुमची बॅग म्हणजे टेबल! माझ्या डोक्यावरचा स्कार्फ बॅगवर टाकते. तो आपला टेबलक्लॉथ! झाली ना जय्यत तयारी! लेट्स स्टार्ट अवर डिनर!

कियाराने डोक्याला घट्ट बांधलेला स्कार्फ काढला. काढताना केसांचा ब्रॉचही निघाला, खेकड्याच्या आकाराचा, मोत्यांनी मढवलेला सुंदर ब्रॉच होता तो!

अंबड्यात घट्ट बांधलेले तिचे डार्क ब्राऊन केस एकदम मोकळे झाले. तिचे केस खरंच खूप सुंदर होते. चंद्राभोवती करडे ढग जमावेत आणि त्याचं सौंदर्य अधिक खुलावं, असं रूथला वाटलं. कियारा आता आधीपेक्षा अधिकच आकर्षक दिसत होती. रूथने समजावून सांगायला सुरुवात केली.'हे बघ, प्लेटच्या एका बाजूला काटा आणि दुसऱ्या बाजूला चमचा ठेवलेला असेल, तर त्याचा अर्थ तुम्ही जेवायला तयार आहात. काटे-चमचे प्लेटमध्ये क्रॉसमध्ये ठेवले तर समजायचं जेवण थोडं थांबवलं आहे. दोन्ही सरळ रेषेत ठेवले, तर जेवण संपलं आणि एकाच बाजूला आडवे ठेवले, तर समजायचं जेवण फार आवडलं.' 'ओह! असं धरायचं का?' इतक्यात कियाराने अचानक रूथच्या हातातील सुरी ओढून घेतली. बेसावध असल्याने रूथला काही कळलंच नाही. तिने घाईघाईने सुरी परत ओढली. सुरीचं पातं कियाराच्या हाताला लागलं. क्षणात तिच्या हातातून रक्त वाहू लागलं. 'अरेच्चा! सो सॉरी! रूथ गोंधळून गेली. कियाराने एका हाताने दुसऱ्या हाताची जखम धरली पण रक्त काही थांबेना. रूथला काय करावं, तेच कळेना.

'मिसेस मायकेल, तुमच्या कोटाच्या खिशात रुमाल दिसतोय. तो बांधा ना, प्लीज! माझा रुमाल बॅगमध्ये खूप आत आहे. ड्रेस खराब झाला तर, उद्या आंटसमोर फार वाईट दिसेल.' 'येस...ऑफो कोर्स!' म्हणत रूथने क्षणाचाही विचार न करता कोटाच्या खिशातून रुमाल काढला आणि तिच्या हाताला घट्ट बांधून दिला. क्षणात कियाराच्या चेहऱ्यावर प्रसन्न हसू उमटलं आणि ती म्हणाली,'ओह थँक यू...सो स्वीट ऑफ यू'!

## काही असं, काही तसं

ज्योती पुजारी / ९७६५०३१४३५

# वरदक्षिणा



वधुपित्याने भावी जावयाला विवाहाच्या वेळी वरदक्षिणा देण्याची परंपरा आपल्याकडे पूर्वापार चालत आली आहे. वरदक्षिणा हे हुंड्याचं एक गोंडस नाव! वरदक्षिणा म्हणजे वराला विवाहाच्या वेळी दिली जाणारी रक्कम, सोनं वा तत्सम वस्तू वगैरे! अलिकडे मराठीतील बऱ्याच जुन्या शब्दांप्रमाणे वरदक्षिणा हा शब्द लुप्तप्राय झाला आहे. आजच्या हुंडा पद्धतीचे मूळ या वरदक्षिणेच्या प्रथेत दडलेलं आहे. पूर्वी उपवर मुलीसाठी वर शोधताना उपवर मुलींच्या बापाच्या पायाचे तुकडे पडायचे. कधी पहिल्याच स्थळाकडून मुलीला पसंती यायची. कधी अनेक स्थळांकडून आलेले नकार पचवून झाल्यावर शेवटी मुलीचं लग्न जमायचं. मुलाची, त्याच्या घरच्यांची मुलीला आलेली पसंती ही लग्न या व्यवहारातील पहिली पायरी असायची. लग्न हा संस्कार आहे तसा तो व्यवहारही आहे.

पसंती झाली की, मुलाची पसंती ही महत्वाची असायची. मुलीला पसंतीची सवलत नव्हती. मुलगा सुरूप आहे की कुरूप, कमावता आहे की वडिलोपार्जित इस्टेटीवर ऐश करणारा आहे, काळा आहे की गोरा या सगळ्या बाबी मुलीच्या बापाच्या दृष्टीने गौण असायच्या. लग्नाच्या बाजारात मुलीचे रूप आणि मुलाची सांपत्तिक स्थिती या दोन गोष्टी महत्वाच्या असायच्या. मुलाची पसंती आली की लग्नाची बैठक बसायची. मुलीची पसंती गृहितच असायची. कसंही करून मुलगी उजवणे, हे मुलीच्या आईवडिलांसाठी एक मोठं आव्हान असायचं. या बैठकीत देणंघेणं ठरायचं. वडिलांनी मुलीच्या अंगावर किती तोळे सोनं घालायचं, कार्य कुठे आणि कसं करायचं याचा व्यवहार ठरायचा. मुलीच्या वडिलांची आर्थिक परीस्थिती जेमतेम असेल आणि त्यांच्या पदरात दोन-चार उपवर मुली असल्या तरी कमीत कमी दोन तोळे सोनं तरी मुलीच्या अंगावर घातलं जायचं. ज्या वधूपित्यांची सांपत्तिक स्थिती उत्तम असायची ते दोन तोळ्यांहून अधिक सोनं तिच्या अंगावर घालायचे. दोन्हीकडील खर्च वधुपक्षाने करायचा हे ठरलेलंच असायचं. मुलीच्या वडिलांनी सालंकृत कन्यादान करण्याचा करार व्हायचा. वधूसाठी मंगळसूत्र वराने करायचं अशी पद्धत होती. त्या मंगळसुत्रातील एका वाटीचा खर्च तेवढा मुलाकडच्यांनी देण्याची पद्धत सुरू झाली आणि वराकडच्यांना सोन्याच्या मंगळसुत्रातील फक्त एका डोरल्याचा खर्च देण्याची पळवाट कोणीतरी शोधून काढली. त्याबरोबर, मणिमंगळसुत्र म्हणजे काळ्या मण्यांत ओवलेले चार सोन्याचे मणी, नवऱ्यामुलाने वधुसाठी करण्याची पद्धत जवळपास गेल्या सहा दशकांपासून होती. अर्थात याला अपवाद असू शकतात. पण एकंदरीत आपल्याकडील लग्नात ही रीत परंपरेने चालत आलेली होती.

काळा बदलला. साधारण २०-२५ वर्षांआधी मुलाच्या पसंतीइतकेच मुलीच्याही पसंतीला महत्व आले कारण, मुलगी शिकली प्रगती झाली. ती कमावती झाली. लग्नाच्या बाबतीत तिचं मत विचारात घेतलं जाऊ लागलं. वरदक्षिणा दिली जायची पण आता मुलाकडचेही भावी सुनेसाठी दोन-चार दागिने हौसेने करायला लागले. मंगळसुत्र मुलाकडून येणार ही अपेक्षा न ठेवता मुलीकडचे मुलींच्या आवडीने इतर दागिन्यांबरोबर सुबक, नाजूक मंगळसूत्र करतात. लग्नातला मानपान ज्याचा त्यांनी करायचा, अशी नविन पद्धत रूढ झाली.

काळ पुढे सरकला. आता लग्न हा संस्कार राहिला नाही तर तो व्यवहार आणि इव्हेंट झाला. आलिशान हॉटेल, बँक्वेट हॉल, लॉन लग्नासाठी ठरवले जायला लागले. पैशाला आणि हौसेला पूर आला. दागिन्यांचे सेट दोन्ही पक्षांकडून खरेदी केले जातात. काही वरपक्ष लग्नाचा अर्धा खर्चही देतात. वधूच्या शालू पैठणीबरोबर ३०-३५ हजारांवर किंमत असलेला लाछा खरेदी केला जातो. लग्नानंतर तो लाछा वधूच्या वॉर्डरोबमध्ये जातो आणि सहसा बाहेर येत नाही. आता मंगल कार्यालयं आउटडेटेड झाली आहेत. बँक्वेट हॉलमध्ये लग्न नावाचा इव्हेंट साजरा होतो. वधूवर मराठी असले तरी त्यांचा पोषाख पंजाबी किंवा राजस्थानी पद्धतीचा असतो. लग्नाच्या आणि सप्तपदीच्या वेळीच तेवढा वर रेशमी कद आणि वधू पैठणी अथवा शालूत असते. लग्नात वराचे जोडे लपण्याचा एक आवश्यक विधी 'हम आपके हैं कौन'मध्ये दाखवल्यामुळे आपल्या लग्नांमध्येही वराचे जोडे लपवणे हा आवश्यक विवाह विधी गणला जाऊ लागला. आपल्याकडील लग्नात हिंदी भाषकांप्रमाणे संगीत हा प्रकार अत्यावश्यक झाला आहे. लग्नातील जेवण म्हणजे स्वरूची भोज पनीर, मेथी मलाई बटर, कुलछा, नान या पंजाबी पदार्थांशिवाय पूर्ण होतच नाही.

मुलामुलींच्या बापमंडळींचे काही लाख खर्चून लग्न नावाचा इव्हेंट पार पडतो. एवढा खर्च आणि तामझाम करून पार पडलेलं लग्न वर्षभर टिकलं तरी खूप झालं अशी स्थिती आज निर्माण झाली आहे. वरदक्षिणा म्हणून जावयाला जे काही त्याच्या सासऱ्यांकडून दिलं जायचं ते आजच्या मानाने फारच किरकोळ असायचं. पण, त्या काळची एकूण सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तेव्हा तेही वधुपित्यासाठी डोईजडच असलं तरी सामाजिक प्रतिष्ठेसाठी खर्च केला जायचा. एवढा खर्च करून मुलगी दिल्या घरी सुखी राहीलच याची खात्री नसायची. नणंदा, जावा, सासू, सासरे आणि नवरा ही सगळी मिळून आपल्या मुलीची कशी वाट लावतील, याची खात्री कुणालाच देता यायची नाही. सासऱ्यापुढे सतत हे द्या, ते द्या म्हणत हात पसरणारे आपल्या बायकोला तिच्या माहेरहून पैसे आणायचा तगादा लावणारे महाभाग जावई तेव्हाच्या काळातही होते. सुनेला सासुरवास करणे हि पूर्वापार चालत आलेली रीत म्हणायला हरकत नाही. प्रत्येक कुटुंबात सुनांना सासुरवास व्हायचाच असं नाही. आपल्या कुटुंबात आलेल्या सुनेला घरची लक्ष्मी मानणारे, तिला सन्मानाने वागवणारेही या समाजात होते आणि आहेत.

लग्न म्हणजे अंधारात घेतलेली उडी असायची. ती खडकावर पडून कपाळमोक्ष होईल की, फुलांच्या गालीचावर पडेल हे आधी कळायचं नाही. एक मात्र होतं की, वाट्याला किती दुःख येऊ दे...पोरी लग्न निभवायच्या. माहेरी सासरच्या तक्रारी सांगायच्या नाही कारण, सासरी जातानाच सासरचे गाऱ्हाणं घेऊन माहेरी यायचं नाही, अशी तंबीच नववधूला दिली जायची ती वाट्याला आलं, ते सोसत रहायची. अति झालं तरच पोरी माहेरचा आधार घ्यायच्या नाही तर नदी-विहीरीत स्वतःला संपवायच्या.

पुढच्या काळात मुलींनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला दबक्या आवाजात का होईना पण, विरोध करायला सुरुवात केली. पटलं नाही तर वेगळ्या झाल्या. हळूहळू सासुरवासाच्या अशा घटना कमी झाल्या. पण, त्या पूर्णपणे आजही संपलेल्या नाही तर फक्त त्याचे रूप बदलले. मध्यंतरी झालेल्या हगवणे हुंडा बळी प्रकरणाने ते अधोरेखित झाले. नात्यात समजुतदारपणा आला. आधीचे तापट, कोपिष्ट नवरे इतिहासजमा झाले. आता काही मुली स्वतःच्या पसंतीच्या मुलाशी प्रेमलग्न करतात. शक्यतो आपल्या आईवडिलांनी आपले प्रेमप्रकरण मान्य करावे. राजीखुषीने आपले लग्न लावून द्यावं, असं त्यांना वाटतं. तसं न झाल्यास मुली त्या मुलाबरोबर पळून जातात किंवा 'लिव्ह इन'मध्ये राहतात. यामुळे समाजात मुलीच्या माहेराची अप्रतिष्ठा होते आणि ती टाळण्यासाठी काही पालक मुलीचं तिच्या पसंतीच्या मुलाशी लग्न लावून देतात. प्रेमविवाह असला तरी भावी जावई वरदक्षिणा म्हणजेच भरपूर हुंडा मागतो. पोरीच्या सुखासाठी पोरीचा बाप कर्जबाजारी होऊन जावयाच्या मागण्या पुरवतो. मुलगी सासरची तक्रार घेऊन आली तर काही पालक तिला आधार देतात. बहुसंख्य पालक तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करतात.

मुलीच्या संसारात लुडबुड करून तिचा संसार उध्वस्त करणारेही पालक आहेत. तसंच, ती एकदा सासरी गेल्यावर 'ती आणि तिचे नशिब' म्हणून पाठ फिरवणारे पालकही आहेत. तसेच, मुलीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे पालकही आहेत. मुलगी सासरी गेली तरी पालकांची जबाबदारी संपत नाही. तिला सासरी त्रास असेल तर तू एकटी नाहीस. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत, हा विश्वास तिला पालकांनी द्यायला हवा.

पूर्वी वरदक्षिणेच्या नावाखाली जावयाला दिलेला हुंडा म्हणजे वाळूत ओतलेल्या पाण्यासारखा असायचा. हुंड्यासाठी पोरींचा छळ व्हायचा, त्यांना जाळून विष देऊन मारलं जायचं. शेवटी सरकारला हुंडाबंदी कायदा करावा लागला पण, कायद्याला पळवाटा असतात. हुंडाबंदीलाही सप्रेम भेट ही पळवाट आहे. सासऱ्याकडून रोख रक्कम किंमती वस्तू भेटीदाखल दिलं जातं, हाही एकप्रकारे हुंडाच असतो. मुलीची सासरी पाठवणी करताना, सासरचं घर हेच तुझं घर आहे, असं सांगितलं जायचं. आता मुलींची सासरी पाठवणी करताना माहेर हेही तुझं हक्काचं घर आहे, आम्ही कायम तुझ्यासोबत आहोत, हे सांगायला हवं.

